वर्ष ११ वें अंक २ रा

२४ नोव्हेंबर १९५९

# संजीवन

**जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक**



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

## ९ ऑक्टोबर १९५९

(दुर्गा–पूजा)

मर्त्य हृदयामध्यें देवत्वाचें बीज सुप्त असतें;
वसुधा–वृक्षावर देवत्वाचें पुष्प विकसित होतें :
आत्म्यामध्यें व वस्तुमात्राचे ठायीं सकलांना भगवंताचा साक्षात्कार होईल ;
परंतु जगाच्या साह्यार्थ जेव्हां भगवंताचा दूत येतो
आणि पृथ्वीच्या आत्म्याला उच्चतर वस्तूंकडे घेऊन जात असतो,
तेव्हां त्यालाहि तें जूं घ्यावें लागतें, जें उतरविण्यासाठीं तो आलेला असतो;
तेव्हां त्यालाहि त्या वेदना सहन कराव्या लागतात, ज्यांचें निवारण
करण्यासाठीं त्याचें आगमन झालेलें असतें :
पार्थिव दैवगतीपासून निसटून आणि अनाहत राहून,
कधींहि न अनुभवलेल्या अनर्थांचें निर्मूलन एरवीं तो कसें करूं शकेल ?
''सावित्री''

-- श्रीअरविंद

## ११ ऑक्टोबर १९५९

(विजया दशमी)

पृथ्वीवरून दु:ख–दैन्य विनष्ट होईल;
पाशवी क्रोधापासून हें जग मुक्त होईल,
आणि दैत्याची क्रूरता व अत्याचार यांपासूनहि;
शांति आणि आनंद येथें चिरकाल नांदत राहतील.
''सावित्री''

-- श्रीअरविंद

वर्ष ११ अंक २ रा                                        २४ नोव्हेंबर १९५९

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक

संपादकः

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

# २४ नोव्हेंबर १९५९

अमर देवता व प्रकृति यांचें परिवर्तन कोणत्या प्रकारें होईल ?

जग तेंच असतें, पण या जगांतील सर्व कांहीं बदलत असतें—
मनुष्य जसा शैशव-अवस्थेपासून वाढत जात असतो, तरी तो तोच असतो.
मानव सर्वांत अधिक परिवर्तित झाला पाहिजे, जो कालाधीन जीव आहे;
आणि त्याच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या देवगणांचें देखील परिवर्तन
झालें पाहिजे.

भूगर्भींच्या त्यांच्या अंधःकारांतून ते बाहेर येतात,
आणि त्यांच्या या नवजन्मीं ते सर्व ज्योतिर्मय सूर्य होतात.
त्यायोगें मनुष्य देखील ज्योतिर्मय जीव होऊन जाईल,
आणि त्याच्या देवदेवतांचें स्वरूप त्याला प्राप्त होईल.

—श्रीअरविंद

वार्षिक वर्गणी—यथाशक्ति

संपादक—भालचंद्र लिमये.
प्रकाशक—'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.
810/10/59/850



श्रीअरविंदांची समाधि

## ९ डिसेंबर १९५०

**आमच्या प्रभूच्या पार्थिव आवरणरूपा, तुजविषयीं आम्ही अपार कृतज्ञ आहोंत; विनम्रतेनें आम्ही तुला वंदन करतो. तूं आमच्यासाठीं काय काय केलें आहेस, कितीतरी कार्य केलें आहेस,--किती झगडा केलास, किती दुःख भोगलेंस, केवढी आशा बाळगलीस, किती सहन केलेंस; सर्व कांहीं सिद्ध व्हावें यासाठीं संकल्प केलास, त्यासाठीं प्रयास केलेंस, त्यासाठीं सिद्धता करून ठेवलीस, सर्व कांहीं आम्हांसाठीं साध्यहि केलेंस; तुझ्या चरणीं आम्ही प्रार्थना करतो कीं, हे प्रभो, हें जें आम्हांवर तुझें सर्व ऋण आहे, त्याचा आम्हांला क्षणमात्रहि विसर पडणार नाहीं असें होऊं दे.**

**--श्रीमाताजी**

श्रीअरविंदांच्या समाधीवर कोरलेली प्रार्थना.

# अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ५ |
| २ मातृवाणी | श्रीमाताजी | ९ |
| ३ गीतेची शिकवण | श्रीअरविंद | १३ |
| ४ श्रीअरविंदांची साधना | श्री० हरिदास चौधरी | १७ |
| ५ श्रीअरविंदांच्या जीवनांतील घटना-प्रवाह | शिशिरकुमार मित्र | २२ |
| ६ सुमधुर समन्वय | गजराज | २९ |
| ७ श्रीअरविंद वाङ्मय | मा. पुं. पंडित | ३१ |
| **विद्यार्थी विभाग** | | |
| ८ निर्मिति आणि नाश (गोष्ट) | श्रीमाताजी | ३६ |
| ९ प्रेम | दत्ता बाळ देसाई | ४१ |
| १० प्रेरक पत्रें–१ | नलिनीकांत गुप्त | ४१ |
| ११ व्यायाम कां घ्यावयाचा ? | प्रणव कुमार भट्टाचार्य | ४५ |
| १२ साहित्य-सत्कार | | ५१ |
| १३ आश्रम-वृत्त | | ५४ |

वर्ष ११ अंक २ रा                                                          २४ नोव्हेंबर १९५९

# संजीवन

**तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,**
**देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.**

**ऋग्वेद–१. ५०. १०**

---

## प्रार्थना आणि ध्यान

१० मार्च १९१४

रात्रीच्या निःस्तब्धतेमध्यें वस्तुमात्रावर तुझ्या शांतीचें साम्राज्य पसरलें होतें; माझ्या हृदयाच्या नीरवतेमध्यें तर तुझ्याच शांतीचें सदैव अधिराज्य असतें; आणि ज्यावेळीं या दोन्हीं निःस्तब्धतांचें मीलन झालें, त्यावेळीं तर तुझी शांति इतकी सामर्थ्यपूर्ण झाली कीं, कोणतीच पीडा तिला बाधक होऊं शकत नव्हती. या जहाजाचें रक्षण करून, सुरक्षित मार्ग दाखविण्यासाठीं जे रक्षक होते, त्यांच्याविषयीं माझ्या मनांत त्यावेळीं विचार आला; आणि कृतज्ञताभावानें मीं अशी इच्छा केली कीं, त्यांच्या अंतःकरणांत तुझी शांति निर्माण होऊन तेथें ती प्रतिष्ठित व्हावी. त्यानंतर, जे लोक निश्चिंतपणें, निष्काळजी राहून गाढ अवचेतनेमध्यें झोंपी गेले होते, त्यांच्याविषयीं मी विचार करूं लागलें; त्यांच्या दुःखकष्टां-विषयीं मला करुणा वाटली. जे दुःख-कष्ट ते झोंपेमध्यें विसरले आहेत, त्या दुःखयातना ते जागे झाल्यावर पुनः निर्माण होणार, म्हणून त्यांच्याविषयीं कींव वाटून मीं इच्छा केली कीं, तुझ्या शांतीचा थोडासा तरी अंश त्यांच्या हृदयामध्यें स्थापित होऊं दे आणि तिमिरनाशक प्रकाशाचें, आत्म्याचें जीवन त्यांच्यामध्यें त्या शांतीमुळें उदित होऊं दे. त्यानंतर, या विशाल सागरांतील दृश्य आणि अदृश्य प्राण्यांच्या विषयीं मी विचार करूं लागलें आणि मीं अशी तीव्र इच्छा केली कीं, तुझ्या शांतीचें साम्राज्य त्यांच्यापर्यंतहि पोंहचूं दे. ज्यांना आम्ही दूर दूर सोडून आलों आहोंत, पण ज्यांच्या सद्भावना आम्हांबरोबर आहेत, त्यांच्याविषयीं नंतर

माझ्या मनांत विचार आला आणि अत्यंत कोमल भावनेनें मीं त्यांच्याबद्दल अशी इच्छा केली कीं, त्यांनीं जागरूक राहून तुझी चिरस्थायी शांति प्राप्त करून घ्यावी, त्यांच्या क्षमते-प्रमाणें त्यांना तुझी शांति विपुल प्रमाणांत लाभावी. त्यानंतर, ज्यांच्याकडे आम्ही जात आहोंत, जे अज्ञान आणि अहंकार यांना वश होऊन कांहींतरी बालिश उद्योगांत गर्क झाले आहेत व त्यामुळेंच विकल झाले आहेत, जे क्षुद्र स्वार्थी चढाओढीनें झगडत, भांडत आहेत, त्या सर्वांविषयीं माझ्या मनांत विचार आला आणि त्यांना तुझ्या शांतीचा संपूर्ण प्रकाश मिळावा म्हणून तीव्र अभीप्सेनें मीं प्रार्थना केली. ज्या व्यक्ती आम्हांला माहीत आहेत आणि ज्या आम्हांला अज्ञात आहेत, जें अखिल जीवन स्वतःच स्वतःस विकसित करीत आहे, ज्या जीवनानें आपल्या स्वतःचें रूप बदललेलें आहे, किंवा जें अजून आकारालाहि आलेलें नाहीं, किंवा जें माझ्या चिंतनशक्तीच्या पलीकडे आहे, अचिंत्य आहे, ज्याचें ज्याचें मला स्मरण आहे किंवा जें कांहीं माझ्या विस्मृतींत लोपलें आहे, त्या सर्वांबद्दल मीं विचार केला आणि त्या सर्वांसाठीं महान् एकाग्रतेनें व मौन भक्तिभावानें तुझ्या शांतीची काकुळतीनें प्रार्थना केली.

★

१२ मार्च १९१४

विश्वचालका, प्रभो !

दररोज मी तुला अधिकाधिक जाणून घ्यावें आणि तुझी अधिकाधिक सेवा करावी, हीच माझी केवळ एकमेव अभीप्सा आहे. प्राप्त परिस्थितीचें येवढें काय विशेष ? मला बाह्य गोष्टी दिवसानुदिवस अधिकच पोकळ आणि मिथ्या वाटूं लागल्या आहेत आणि म्हणूनच त्यांच्यामधील आसक्ति दररोज कमी कमी होत चालली आहे. अत्यंत महत्त्वाच्या वाटत असलेल्या एकाच गोष्टींत केवळ मला आनंद आहे. तुझी अधिक चांगल्या रीतीनें सेवा करण्यासाठीं, तुझें अधिक ज्ञानपूर्ण दर्शन ! सर्व बाह्य व्यवहार याच एका ध्येयावर केंद्रित झालें पाहिजेत, केवळ एकाच ध्येयावर ! अर्थातच त्यांच्याकडे बघण्याच्या आमच्या दृष्टीवर हें सारें अवलंबून आहे. प्रत्येक गोष्टीमध्यें सतत तुझाच शोध घेत रहाणें, कोणत्याहि परि-स्थितीमध्यें तुझेंच अधिक आविष्करण करण्याची इच्छा करणें, याच वृत्तीमध्यें असीम शांति, संपूर्ण निवांतता, आत्मप्रसाद आणि खरा संतोष आहे. या वृत्तीनें जीवन उमलतें-प्रफुल्लतें, विशाल होतें आणि इतकें भव्य रूप धारण करतें, इतक्या महान् लाटा त्यावर उसळूं लागतात कीं, भयंकर वादळाचेंहि त्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं.

जीवनेशा, तूंच आमचा रक्षक आणि तूंच आमचें सुखसर्वस्व. तूंच आमचा देदीप्यमान् प्रकाश, जाज्वल्यमान् ज्योत, पवित्र प्रेम, आमची एकमेव शक्ति; तूंच आमचें जीवन आहेस, आमच्या अस्तित्वाचें वास्तव-स्वरूप आहेस.

आदरयुक्त , सानंद पूजनभावानें मी तुला नमन करतें.

★

१३ मार्च, १९१४

'चेतनेचे' किती भिन्न भिन्न प्रकार आणि अवस्था आहेत ! जी व्यक्ति तुझ्याशीं एकरूप झालेली आहे, तुझ्या 'केवळ' पूर्ण चेतनेमध्यें जी भाग घेऊं शकते, तिच्या ठिकाणीं ज्या अवस्थे-मध्यें तुझ्या सान्निध्याचा प्रकाश उजळला आहे, जी अवस्था ज्ञानपूर्ण आहे, गौतम बुद्ध जिला "पूर्णतया जाग्रत" अवस्था म्हणतात, अशा अवस्थेसाठींच वास्तविक 'चेतना' हा शब्द राखून ठेवला पाहिजे.

ह्या अवस्थेखेरीज खालीं खालीं उतरत जाऊन, पूर्ण अंधःकाराच्या अवस्थेपर्यंत पोहों-चणाऱ्या, चेतनेच्या अनेक श्रेणी आहेत. ह्या खऱ्याखुऱ्या निश्चेतन अवस्थेच्या क्षेत्रांत अजून-पर्यंत तुझ्या दिव्य प्रेमाच्या प्रकाशाचा स्पर्श झालेला दिसत नाहीं; (आणि भौतिक जड-तत्त्वामध्यें तें अशक्यप्रायहि वाटतें) किंवा निदान अज्ञानाच्या विशिष्ट प्रभावामुळें ती अवस्था म्हणजे आमच्या व्यक्तिगत अनुभवाच्या पलीकडला प्रांत आहे.

अर्थात् ही एक बोलण्याची पद्धति झाली; आणि ती सुद्धां एक अपूर्णच पद्धति आहे. कारण जेव्हां एकादी व्यक्ति तुझ्या सान्निध्याविषयीं जागृत होते आणि तुझ्या चेतनेशीं ती तादात्म्य पावते, त्यावेळीं, त्याक्षणीं ती सर्वत्र आणि सर्वदा वस्तुमात्रामध्यें जागृत असते. पण ही सर्वोच्च चेतना क्षणमात्र टिकते; कारण आमचें अस्तित्व हें अत्यंत जटिल आहे; त्यांत अनेक भिन्न भिन्न तत्त्वें आहेत; तीं सर्वच सारख्या प्रमाणांत प्रकाशित झालेलीं नाहींत आणि तीं निरनिराळ्या वेळीं क्रमशः क्रियाशील होतात. पण या क्रमयुक्त क्रियाशीलतेमुळेंच तीं हळुंहळुं आंतरिक व बाह्य अनुभव घेऊन (वास्तविक दोन्हींचा अर्थ शेवटीं एकच) स्वतः-विषयीं जागरुक होऊं लागतात; म्हणजेच स्वतःच्या अगाध अशा सारभूत अवस्थेमध्यें त्यांना तुझी प्राप्ति होऊं शकते.

अवचेतना ही मधली अवस्था, मधलें क्षेत्र आहे. सम्यक् ज्ञान आणि अज्ञानाचा संपूर्ण अंधःकार यांच्यामधला हा प्रांत आहे; बहुतेक सर्व प्राणी, बहुसंख्य मनुष्यप्राणीहि, ह्या अव-चेतन क्षेत्रांतच सतत राहत असतात; कांहीं थोडे त्यांतून बाहेर पडतात. हाच विजय आम्हांस मिळवावयाचा आहे; कारण खऱ्या अर्थानें 'सचेतन' होणें म्हणजे सर्वांगांनीं, पूर्ण-रूपानें 'तूंच' होणें; आणि खरोखरी, या पृथ्वीवर जें महान् कार्य करावयाचें आहे, त्याची व्याख्या याच शब्दांत करावी लागेल, नाहीं कां ?

हे प्रभु, आम्हांला अंधःकारांतून मुक्त कर; आम्ही संपूर्णतया जागृत होऊं असें आम्हांला वरदान दे.

हे प्रेममया, हे प्रेमरूपा, अशी कृपा कर कीं, माझी समस्त चेतना तुझ्यामध्यें केंद्रित होईल; त्यायोगें मी केवळ तुझ्याच प्रेमामुळें व प्रकाशामुळें जीवन जगेन आणि तें प्रेम व प्रकाश माझ्यामधून सर्वत्र फैलावून, आमच्या या प्रवासामध्यें आमची भेट झालेल्या सर्व व्यक्तींमध्यें तुझेंच प्रेम व प्रकाश उदय पावेल. हा भौतिक प्रवास म्हणजे, आमच्या नियो-जित कार्याचें एक प्रतीक ठरूं दे; आणि आम्ही जेथें जेथें जाऊं, तेथें सर्वत्र तुझ्या प्रकाशाच्या व प्रेमाच्या किरणांच्या रूपानें, आमच्या मागें तुझेंच पदचिह्न उमटत जाऊं दे.

हे दिव्य स्वामी, सनातन गुरुदेव, तूं अखिल वस्तूंमध्यें, सर्व प्राण्यांमध्यें रहातोस आणि अत्यंत अज्ञ जनांच्या डोळ्यांनाहि तुझें प्रेम स्पष्टपणें प्रतीत होतें. असें वरदान दे कीं, सर्वांना

त्यांच्या अंतर्यामीं, त्याचा स्पष्ट अनुभव येईल; त्याविषयीं ते जागरूक होतील आणि त्यांच्या अंतःकरणांतून असूया कायमची नष्ट होईल.

एकाद्या अविश्रांत स्तवन-गीतालापाप्रमाणें माझी आर्त कृतज्ञता तुजसमीप वर वर येत आहे.

*

१४ मार्च १९१४

वाळवंटांतील अपरिवर्तनीय एकांतामध्येंहि तुझ्या उदात्त भव्य उपस्थितीचा अंश विद्यमान् असल्याचें प्रतीत होत आहे आणि तुझी प्राप्ति करून घेण्याचा एक अत्युत्तम उपाय म्हणून नेहमींच या अफाट मरुभूमीचा आश्रय लोक कां करीत आले आहेत हें, त्यामुळें आतां मला समजून येत आहे.

पण ज्यानें तुला जाणलें आहे, त्याला सर्वत्रच आणि सर्व वस्तूंमध्येंच तुझी उपस्थिति आहे; आणि तुझा आविष्कार करण्यासाठीं एकादीच विशिष्ट वस्तु, इतर वस्तूंपेक्षां अधिक उपयुक्त, योग्य आहे, असेंहि त्याला वाटत नाहीं. कारण, अस्तित्वांत असलेल्या सर्वच गोष्टी —आणि अजून अस्तित्वांत न आलेल्याहि कित्येक गोष्टी—तुझी अभिव्यक्ति होण्यास आवश्यकच आहेत. प्रत्येक वस्तूमध्येंच तुझ्या दिव्य प्रेमाचा आंतरप्रवेश झाल्यानें, त्या प्रत्येक वस्तूचें अस्तित्व म्हणजे, भगवदभिमुख असें जीवन जगण्याचाच तो प्रयत्न आहे. आमची दृष्टि जेव्हां उघडते, तेव्हां वस्तुमात्राचा, सतत चाललेला हा प्रयत्न स्पष्टपणें आमच्या दृष्टीस पडतो.

हे प्रभो, माझें हृदय तुझ्यासाठीं तहानलें आहे, माझें चिंतन सतत तुझाच शोध घेत आहे. निवांत, निःशब्द भक्तिभावामध्यें मी तुला प्रणिपात करीत आहे.

—श्रीमाताजी

---

उषेचा प्रकाश आणणाऱ्या अवताराला स्वतः तमसाछन्न रात्रींतून जावें लागतें.

*

जागा हो, हे आत्म्या, जागा हो आणि काळ व मृत्यु यांवर विजय प्राप्त कर.

—श्रीअरविंद

# मातृवाणी

(मागील अंकावरून पुढें)

**"या जीवनांतून एकदां आपण गेलों होतों आणि आतां पुनः हें जीवन जगत आहोंत, अशी आठवण कित्येकांना असते काय ?"**

जाणिवेच्या एका विशिष्ट अवस्थेपर्यंत—पातळीपर्यंत—तुम्ही पोहोंचलांत म्हणजे हें तुम्हांला स्मरतें. ही पातळी अंशतः किंचित् काळ अनुभवणें, तिचा नुसता स्पर्श होणें हें तितकेंसें अवघड नाहीं. खोल ध्यानांत असतांना अथवा स्वप्न किंवा दृष्टांत पहात असतांना, हें जीवन आपण पूर्वी एकदां जगलेलों आहोंत, अमुक एक साक्षात्कार किंवा अनुभूति आपणांस प्राप्त झाली होती, हीं सत्यें आपण जाणलीं होतीं अशी भावना किंवा आठवण होऊं शकते. तथापि असला अनुभव हा संपूर्ण अनुभव नव्हे, संपूर्ण साक्षात्कार नव्हे. तो अनुभव यावयाचा असेल, तर त्यासाठीं आपल्या अंतरीं असलेल्या शाश्वत चेतनेची प्राप्ति साधकानें करून घेतलेली असली पाहिजे. ती चेतना सनातन स्वरूपाची असते; आणि भूत-वर्तमान-भावि अस्तित्व तिनें एकत्रित धारण केलेलें असतें.

**"आपण जेव्हां मानसिक कार्यांत किंवा बौद्धिक व्यासंगांत एकाग्रचित्त झालेले असतो, त्यावेळीं कधीं कधीं भगवंताशीं असलेला संबंध आपण विसरतों किंवा गमावतों; असें कां व्हावें ?"**

तुम्ही तो विसरतां कारण तुमची जाणीव अजूनहि विभागलेली असते; तुमच्या मनोभूमींत भगवंतानें अजून स्थायीभावानें वास्तव्य केलेलें नसतें. तुम्ही दिव्यजीवनार्थ स्वतःस संपूर्णतया सर्मपित करून टाकलेलें नसतें. अन्यथा अशा प्रकारच्या विषयावर तुम्ही कितीहि एकाग्रचित्त झालेलें असलांत तरी देखील, आपल्याला भगवंताचें साह्य होत आहे, भगवन्ताचा आधार मिळत आहे, अशातऱ्हेची जाणीव तुम्हांला राहीलच.

बौद्धिक क्रिया असो अथवा बाह्य कृति असो, ती करतांना तुमचें एकमात्र ब्रीदवाक्य हें पाहिजे : "स्मरण ठेवणें आणि समर्पण करणें." तुम्ही जें कांहीं करत असाल, तें भगवंतास समर्पण होऊं द्या. तुमच्याकरितां ती एक उत्तम साधनाच होईल; आणि तीमुळें असमंजसपणाच्या आणि निरर्थक अशा अनेक गोष्टी टळतील.

**"कर्माच्या सुरुवातीसच हें पुष्कळदां शक्य होतें, पण जसजसें कामांत गर्क होत जावें, तसतसें त्याचें विस्मरण पडतें. तरी स्मरण ठेवण्यासाठीं काय करावें ?"**

भगवंताखेरीज दुसरें कांहींहि करणें अशक्य होऊन जाईल अशी स्थिति, अशी जाणीव प्राप्त करावयाची हें ध्येय आहे. योगानें प्राप्त व्हावयाची ती खरी सिद्धी आहे. इतर सर्वकांहीं अंतिम पूर्णतेची नि सिद्धीची पूर्वतयारी आहे. कारण त्यानंतर जर तुम्ही भगवंताच्या

आधाराशिवाय राहिलांत, तर तुमच्या कृतीचें मूळ कारणच मुळीं नाहींसें होऊन जातें. ज्ञान, सामर्थ्य सर्व नाहींसें होतें. पण ज्या शक्तींचा तुम्ही वापर करतां, त्या तुमच्याच आहेत अशी जोपर्यंत तुमची भावना असेल, तोपर्यंत परमेश्वराच्या आधाराची आवश्यकता तुम्हांस भासणार नाहीं.

योगाच्या प्रारंभकाळीं भगवंताचें वरचेवर विस्मरण होण्याकडेच प्रवृत्ति असणें शक्य आहे; तथापि सततच्या अभीप्सेनें तुमचा स्मरणाचा काळ वाढतो आणि विस्मरणाचा काळ कमी कमी होत जातो. पण एकादी कठोर तपस्या किंवा कर्तव्य म्हणून तुम्ही हें करता कामां नये. प्रेमाची आणि आनंदाची अशी ती साधना झाली पाहिजे. अशा प्रकारचा प्रयत्न होत राहिल्यास लवकरच तुम्हांला अशी एक अवस्था प्राप्त होईल कीं, जीमध्यें प्रति-क्षणीं, तुम्ही कांहींहि करीत असतांना, जर भगवन्ताचें सान्निध्य अनुभवतां आलें नाहीं, तर लगेच तुम्हांला एकाकी, दु:खी, उदास वाटेल.

भगवंताच्या सान्निध्याचा अनुभव न घाटतां, स्वस्थ चित्तानें एकादें कर्म करतां येणें शक्य आहे असें जर तुम्हांला कधीं आढळून आलें, तर तुमच्या व्यक्तित्वाचा तो विशिष्ट भाग समर्पित झालेला नाहीं, असें तुम्हीं समजलें पाहिजे. ईशशक्तीची कसलीहि गरज न वाटणें, ही तर सामान्य मानवजातीची पद्धति आहेच. पण दिव्य जीवन हें ज्याचें साध्य आहे, अशा साधकाची स्थिति याहून अगदीं वेगळी असणार. ज्यावेळीं भगवंताशीं संपूर्ण ऐक्य प्रस्थापित झाल्याचा साक्षात्कार होईल, त्यावेळीं जर कां भगवन्त तुमच्यापासून क्षणमात्रहि दूर झाला तरी तुम्ही मृतवत् होऊन पडाल. कारण त्यावेळीं भगवंत म्हणजे तुमच्या प्राणांचा प्राण, तुमचें सारें अस्तित्व, तुमचा एकमेव आणि पूर्ण आधार असणार. भगवच्छक्तीच्या अभावीं सारें शून्यच होऊन जाईल.

**"योगाच्या सुरुवातीच्या अवस्थांत साधकांनीं सर्वसामान्य पुस्तकें वाचणें हितावह ठरतें काय ?"**

पवित्र ग्रंथांचें वाचम करून देखील भगवंतापासून खूप दूर असणें शक्य असतें; उलट अगदीं अर्थशून्य पुस्तकें वाचूनहि तुमचा भगवंताशीं संयोग असूं शकतो. स्वभावाचें परिवर्तन म्हणजे काय, याच्या अनुभवाची चव चाखलेली असल्याशिवाय परिवर्तित जाणीव आणि तिच्या क्रिया-प्रतिक्रिया यांविषयीं कल्पना बांधतां येणें शक्य नाहीं. भगवंताशीं संयोग पावलेल्या जाणिवेची अशी एक अवस्था असते कीं, जीमुळें कोणत्याहि प्रकारच्या वाचनांत किंवा दृश्यांत तुम्हांला आनंद अनुभवतां येतो, रुचि घेतां येते––मग त्या पाहिलेल्या वस्तू किंवा वाचावयास घेतलेलीं पुस्तकें अगदींच रूक्ष आणि निरर्थक का असेनात ! अगदीं सामान्य दर्जाचें संगीत, ज्यापासून दूर पळून जावें असें वाटेल, असें संगीतहि तुम्ही रसिकतेनें ऐकूं शकाल, त्याचा आनंद अनुभवूं शकाल; मात्र तो आनंद त्या संगीताच्या बाह्यांगाचा असणार नाहीं, तर त्या संगीताच्या मागें असलेल्या दिव्यांशामुळें असेल. चांगलें संगीत आणि सामान्य संगीत हा भेदच तुम्हांस कळणार नाहीं असें नाहीं. पण त्या दोन्हींच्याहि पाठीमागें जाऊन, तें संगीत ज्यामुळें व्यक्त होतें त्या स्थितींत तुम्ही जाऊं शकतां. कारण जगांत असें कांहींहि नाहीं कीं ज्याचें अंतिम सत्य आणि आधार भगवंत नाहीं. कोणत्याहि वस्तूचें भौतिक, नैतिक अथवा

सौंदर्यात्मक रूप पाहूनच तुम्ही थबकून राहिला नाहींत, त्या रूपाच्या मागें आत्मतत्त्वाचा, वस्तुमात्राच्या अंतर्गत असलेल्या दिव्य अंशाचा स्पर्श तुम्हांला करून घेतां आला, तर जें सामान्य जाणिवेला अगदीं सामान्य, दुःखद अथवा विसंवादी वाटतें, त्यांतहि तुम्हांला सौंदर्य आणि आनंद यांचा लाभ करून घेतां येईल.

**"एखाद्याच्या आयुष्यांत जें जें कांहीं घडून गेलें आहे, तें तें घडावयाचेंच होतें असें, त्याच्या गतायुष्याविषयीं समर्थनपर म्हणतां येईल काय?"**

हें स्पष्टच आहे कीं, जें घडलें आहे तें घडावयाचें होतें; तसा उद्देश नसतां तर तसें घडलें नसतें. आपल्या हांतून ज्या कांहीं चुका घडल्या असतील आणि ज्या कांहीं विपत्ती कोसळल्या असतील, त्या देखील तशाच पद्धतीनें घडून यावयाच्या होत्या; कारण तशी आवश्यकता होती, आपल्या आयुष्याला त्याची कांहीं उपयुक्तता होती. तथापि अशा घटनांचें स्पष्टीकरण बौद्धिक पातळीवरून खरोखरीच करतां येत नाहीं आणि करूंहि नये. कारण जें कांहीं घडलें असेल त्याची आवश्यकता, मनाला जाणून घेतां येईल अशा कोणत्याहि कारणासाठीं नव्हती, तर मनाच्या कल्पनेच्या पलीकडे असलेल्या कशासाठीं तरी होती. पण सर्व होऊन गेल्यावर स्पष्टीकरणाची तरी गरज राहते काय? सारें विश्वच प्रतिक्षणीं प्रत्येक घटनेचा अर्थबोध करून देत आहे. अखिल विश्वाची जी कांहीं घडण आहे, ती तशी आहे म्हणूनच एखादी विशिष्ट घटना घडून येते. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, प्रकृतीच्या कठोर कायद्यास अविवेकी संमति देण्यास आपण बांधले गेलेलों आहोंत. गतायुष्य, भूतकाळ ही एक ठरून गेलेली घटना होती असें मानून, तुम्ही तिचा स्वीकार करूं शकतां आणि तिची काय आवश्यकता होती याचें आकलन करून घेऊं शकतां आणि तरीहि त्यांतून तुम्हांला जो अनुभव मिळाला असेल, त्याचा उपयोग तुम्ही अशी शक्ति निर्माण करण्यांत करूं शकतां कीं जीमुळें तुमच्या वर्तमानकाळाला आणि भावि आयुष्याला बुद्धिपुरस्सर, जागृत राहून मार्गदर्शन करण्याची व वळण देतां येण्याची क्षमता तुमच्या ठिकाणीं निर्माण होईल.

**"भगवन्ताच्या योजनेंत एखाद्या प्रसंगाच्या काळाची देखील योजना, व्यवस्था केलेली असते काय?"**

ज्या पातळीवरून आपण बघतों आणि बोलतों त्या पातळीवर सर्व कांहीं अवलंबून असतें. दिव्य भागवत चेतनेची अशी एक भूमिका असते कीं तेथें सर्व कांहीं परमार्थतः जाणलेलें असतें, सृष्टीची समग्र योजना पूर्वदृष्ट आणि पूर्वनियोजित असते. अतिमानस शक्तीच्या विज्ञानमय लोकाच्या परमोच्च पातळीवर पोहोंचल्यानंतरच अशा प्रकारची दृष्टि साध्य करतां येते. ती परम श्रेष्ठ भगवत्-शक्तीची, पुरुषोत्तमाची स्वतःची दृष्टि असते. पण ती श्रेष्ठ चेतना जोंवर आपल्याला आत्मसात् झालेली नाहीं, तोंवर त्या सर्वश्रेष्ठ क्षेत्रांतील भाषा बोलणें निरर्थक आहे; कारण ती भाषा, केवळ त्या भूमिकेवरच उपयोगी पडते आणि आपल्या वर्तमानकालीन वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान तीमुळें आपल्याला होणें शक्य नसतें. चेतनेच्या खालच्या खालच्या थरावर कशाचेंहि पूर्वज्ञान होत नाहीं अथवा कांहींहि अगोदर निश्चित केलेलें असत नाहीं; सारें तयार होण्याच्या स्थितींत असतें. येथें कांहींहि ठरून गेलेलें नसतें,

तर केवळ शक्यता-अशक्यतांचा खेळ चाललेला असतो; आणि या शक्यता-अशक्यतांच्या संगरांतून जें घडून यावयाचें असतें, तें सिद्ध होत असतें. या पातळीवर आपण पसंती आणि निवड करूं शकतों, एक शक्यता टाकून दुसरी शक्यता स्वीकारूं शकतों, एक मार्ग अनुसरून दुसरा सोडून देऊं शकतों. अर्थात् जें कांहीं प्रत्यक्ष घडत असतें, तें एखाद्या उच्च पातळीवर पूर्वदृष्ट आणि पूर्वयोजित असलें तरीहि अशा तऱ्हेची निवड आपण करूं शकतो.

अतिमानस चेतनेस (The Supreme Consciousness) प्रत्येक घटनेचें पूर्वज्ञान असतें, कारण त्या चेतनेच्या अनंतत्वांत प्रत्येक घटना आधींच सिद्ध झालेली असते. पण तिनें चालविलेल्या एकंदर लीलेसाठीं व तिच्या परमोच्च अस्तित्वांत जें अगोदरच नियुक्त केलें गेलें आहे, तें प्रत्यक्ष या भौतिक पातळीवर पूर्णत्वाप्रत नेण्यासाठीं, जणुं काय आपल्याला हें सारें माहीतच नाहीं अशा मिषानें ती या जगामध्यें वावरत असते; कधीं करून न पाहिलेला असा नवीनच विणकामाचा नमुना करायला घ्यावा, त्याप्रमाणें ती येथें कार्य करीत असते. उच्चतर पातळीवर जें कांहीं अगोदरच जाणलेलें असतें, त्याच्या विस्मरणाच्या आभासामुळेंच, जगांतील क्रियाशील जीवनांत आपण स्वतंत्र, स्वाधीन असल्याची व आपण एकादी गोष्ट स्वतंत्रपणें सुरू करूं शकतों अशी कार्यारंभ-क्षमतेची जाणीव व्यक्तीला राहते. व्यक्तीच्या ठिकाणच्या या गोष्टी म्हणजे त्या श्रेष्ठ चेतनेचीं व्यावहारिक साधनें अथवा युक्त्या असून, या सामग्रीच्या साह्यानें, इतरत्र अन्य पातळीवर योजिलेल्या आणि पूर्वदृष्ट अशा क्रिया व परिणाम या जगांत प्रत्यक्ष घडवून आणले जातात.

नटाच्या उदाहरणावरून हें समजून येण्यास साह्य होईल. नटाला जी भूमिका वठवावयाची असते, तिचें समग्र ज्ञान त्याला असतें; तसेंच रंगभूमीवर जें घडायचें असतें, त्याचा अचूक क्रम त्याच्या मनश्चक्षूसमोर असतो; पण रंगभूमीवर पदार्पण केल्यावर, आपल्याला कांहीं माहीतच नाहीं, अशारीतीनें त्यानें वागावयाचें असतें. ज्या घटना घडत असतात, त्या आपण जणुं प्रथमच अनुभवीत आहोंत, सर्व संभाव्य प्रसंग आणि चकित करणाऱ्या गोष्टी यांनीं युक्त असलेलें जग, हें एक अगदीं अभिनव जग असून, तें जणुं आपल्या डोळ्यासमोर उलगडलें जात आहे, असें वाटून घेऊन, त्याला आपली भूमिका वठवावयाची असते.

**"तर मग खरें स्वातंत्र्य अगदीं नाहींच कां? प्रत्येकच गोष्ट, आपलें स्वातंत्र्यदेखील पूर्वीच ठरून गेलेलें असतें काय? आणि शेवटीं प्रारब्धवाद हेंच सर्वश्रेष्ठ गुह्य सत्य आहे काय?"**

(अपूर्ण)

—श्रीमाताजी

---

हे मना, शाश्वत शांतीच्या पूर्णतेनें तूं परिप्लावित हो!
हे महाध्वनि, आनंदोल्लासानें चिरंतन प्रार्थना गुंजारित कर!
ज्योतिर्मय बालकाचा आविर्भाव झालेला आहे,
सुवर्णमंदिर आज बांधून पूर्ण झालेलें आहे.

—श्रीअरविंद

# गीतेची शिकवण

(मागील अंकावरून पुढें)

**भौतिक-जीवनप्रिय मनाला गीतेचा उपदेश**

प्राणिक आणि भौतिक जीवनामागें असलेल्या मनाला गीता सांगते कीं, खरोखरीच सर्व जीवन म्हणजे व्यक्तीमध्यें निवास करीत असलेल्या विश्वशक्तीची अभिव्यक्ति आहे. विश्वात्माच जीवनाचा उगम आहे, परमेश्वराचा किरण या जीवनांत व्यक्त होतो—तथापि विश्वात्मा आणि परमेश्वर मायेनें आच्छादलेला, मायेनें भलता वेष दिलेला असाच जीवनांत साकार केला जातो; असें हें जीवन खालच्या प्रतीचें, कनिष्ठ दर्जाचें जीवन असतें: या जीवनासाठींच या जीवनामागें लागणें म्हणजे कंटकमय मार्ग, खांचखळग्यांचा मार्ग हट्टानें चालत राहणें आहे, आमच्या प्रकृतींतील अंधकारमय अज्ञानाला आम्ही सिंहासनावर बसविण्यासारखें आहे. जीवनाचें खरेंखुरें सत्य, जीवनाचा पूर्ण कायदा अशा हट्टांत नाहीं आणि अशा हट्टानें तो मुळींच हातीं लागणार नाहीं. "कसेंहि करून जगायची इच्छा धरा, वासनातृप्तीची कांस धरा, केवळ पाशवी बळ हेंच थोर सामर्थ्य आहे, अहंची पूजा हीच खरी पूजा, त्याची कधीं न थकणारी आत्मगौरवबुद्धि आणि स्वार्थबुद्धि शिरोधार्य माना, त्याचा अतिरेकी हट्टी भोग्यसंग्रहाचा हव्यास पूज्यबुद्धीनें पुरवीत चला"—असा प्राणिक भौतिक वासनांचा बेछूट पाठपुरावा करणारा संप्रदाय खरोखरी आसुरी संप्रदाय आहे. महाभयंकर विनाश आणि अकल्याण हा या संप्रदायाचा एकमेव परिणाम ठरलेला आहे. भौतिक व प्राणिक मानवानें आपलें जीवन धार्मिक, सामाजिक आणि ध्येयनिष्ठ व्यवहारनियमांनीं नियंत्रित करावयास हवें; असें केल्यानें तो आपल्या वासना आणि स्वार्थ पुरवितांना कांहीं योग्य बंधनें पाळीत जाईल; त्याच्या खालच्या पातळीवरील व्यक्तित्वाला तो या नियंत्रणानें दाबांत ठेवून, चांगलें वळण लावूं शकेल; आणि वैयक्तिक जीवनाचा आणि सामाजिक जीवनाचा जो श्रेष्ठ धर्म आहे, श्रेष्ठ कायदा आहे, त्याच्या तंत्रांत खालचें व्यक्तित्व सुखानें वागेल असें संवादित्व या नियंत्रणाचा कांटेकोरपणें उपयोग करून तो त्यांत आणूं शकेल.

**नीतिनिष्ठ व धर्मनिष्ठ मनाला गीतेचा संदेश**

बुद्धिमान्य, नीतिमान्य, समाजमान्य व्यवहारनियम पाळण्याच्या मागें असलेल्या मनाला, रूढ नीतिधर्म पाळून, नित्य आणि नैमित्तिक सामाजिक कर्तव्यांचा रूढ धर्म पाळून किंवा बंधनातीत सात्विक बुद्धीनें सुचविलेलें व्यवहारनियम पाळून मुक्ति मिळवितां येते व मिळवावी असा आग्रह धरणाऱ्या मनाला गीता सांगते कीं, हे धर्म पाळणें ही एक मानवाला आवश्यक अशी विकासाची अवस्था आहे, हे धर्म पाळले पाहिजेत आणि योग्य रीतीनें, न चुकतां पाळले पाहिजेत, या धर्मांच्या पालनानें मानवाच्या आत्म्याची उंची वाढते, त्याच्या आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी म्हणून हें धर्मपालन उपयोगी आहे,—पण अस्तित्वाचें आणि

जीवनाचें अंतिम, पूर्ण सत्य या अशा धर्मपालनांत नाहीं. या अशा रूढ धर्मांच्या पालना-पलीकडे मानवी आत्म्यानें पाऊल टाकलें पाहिजे, या रूढ धर्मांहून श्रेष्ठ, सर्वश्रेष्ठ असा अमर आध्यात्मिक प्रकृतीचा धर्म मानवाला आहे, पण हा सर्वश्रेष्ठ धर्म पाळावयाचा तर प्रथम आम्हांला बरीच अंतःशुद्धि करावयास हवी. आमच्या मनाचीं कनिष्ठ अंगें ज्या अज्ञानदूषित अनेक रचना उभ्या करतात, त्या आम्ही दाबून, दडपून टाकल्या पाहिजेत, नाहींशा केल्या पाहिजेत; अहंमय व्यक्तित्व ही एक असत्यमय रचना आहे, ती आम्ही नाहींशी केली पाहिजे. अशी अंतःशुद्धि करून मग बुद्धि आणि इच्छाशक्ति यांचें काम निर्व्यक्तिकतेनें झालें पाहिजे. सर्वत्र एकच एक असलेल्या आत्म्याशीं, सर्वात्म्याशीं एकरूप होऊन जीवनव्यवहार केला पाहिजे. थोडक्यांत अहंघटित सर्व घटनांतून बाहेर पडून, अहंशून्य परमात्म्यांत प्रवेश केला पाहिजे. त्रिगुणी अपरा प्रकृति मनाला मर्यादा घालते, मनाच्या हालचाली या प्रकृतीच्या सक्त हुकुमानुसार तिनें घालून दिलेल्या मर्यादांच्या आंत चालतात; तमोगुण, रजोगुण किंवा जास्तींत जास्त सत्वगुण यांच्या आदेशानुसार मन आपले व्यवहाराचे आदर्श निश्चित करते—मानवी आत्म्याची भवितव्यता, नियति याहून वेगळी व उच्चतर आहे. दैवी पूर्णता, दैवी मुक्तता हें मानवी आत्म्याचें पूर्वनियोजित भवितव्य असून, ही पूर्णता व मुक्ति आमच्या सर्वोच्च आत्म्याच्या स्वातंत्र्यावरच अधिष्ठित असूं शकते; मनाच्या पलीकडे असलेली आमच्या सर्वोच्च आत्म्याची विश्वमयता आणि निर्व्यक्तिकता भोगून आणि भोगीत आमचा आत्मा सर्व धर्मातीत सर्वश्रेष्ठ अपरिमेय, अनंत ईश्वराच्या परिपूर्ण प्रकाशांत प्रवेश करता झाला म्हणजेच ही दिव्य पूर्णता आणि मुक्ति आमच्या आत्म्याला मिळूं शकते.

### केवलात्मवादी साधकास गीतेचा उपदेश

आतां अनन्तासाठीं साधना करणाऱ्या केवलात्मवादी साधकांना गीतेचा संदेश काय आहे तें पाहूं. हे साधक अनन्यभावानें निर्व्यक्तिकतेची आत्यंतिक उपासना करतात, जीवन आणि कर्म यांचें शून्य व्हावें अशी त्यांची तळमळ असते, अशी त्यांची परा-कोटीची असहिष्णुता असते; वैयक्तिक अस्तित्व सर्वथा संपवन, अनिर्वचनीय विश्वातीत आत्म्याच्या विशुद्ध शांतींत बुडून जाणें हीच त्यांना एकच एक अंतिम ध्येयभूत गोष्ट असते; अशा साधकांना गीतेचें सांगणें असें आहे कीं, तुमची ही धडपड हा एक अनन्ताच्या प्राप्तीचा मार्ग आहे यांत संशय नाहीं; पण हा मार्ग फार अवघड आहे, अति दुर्गम आहे; शिवाय, कर्मशून्यतेचा आदर्श जगापुढें उदाहरणानें वा उपदेशानें ठेवणें फार धोक्याचें आहे; हें खरें कीं, हा तुमचा मार्ग थोर आहे, पण मानवाच्या दृष्टीनें हा कांहीं सर्वोत्तम मार्ग नव्हे; आणखी असें कीं, तुमचें आध्यात्मिक ज्ञान (ज्यावर हा मार्ग आधारलेला आहे) खरें आहे, सत्यमय आहे—पण हें ज्ञान कांहीं पूर्ण ज्ञान नाहीं, सर्वसत्य व्यापणारें नाहीं. सर्व आणि पूर्ण सत्य असें आहे कीं, अनिर्वचनीय दूरस्थ आत्मरूप अस्तित्व हें अनन्ताचें, ईश्वराचें, सर्वज्ञ, सर्वश्रेष्ठ आत्म्याचें एक स्वरूप आहे, पण एवढेंच कांहीं त्याचें स्वरूप नाहीं. हा अनन्त आत्मा या विश्वांतहि भरलेला आहे. येथें तो व्यक्त आणि अव्यक्त दोन्ही स्वरूपांत वावरत आहे. मनुष्य, देव, सर्व भतें आणि जें कांहीं आहे, त्यांत आणि त्याच्या द्वारां अव्यक्त अनन्ताची अभिव्यक्ति होत आहे. पूर्ण सत्य असें असल्यानें

मनुष्यापुढें, क्रियाशील जीवनाचा बाह्य प्रश्न आणि आत्म्याचा आणि ईश्वराचा आंतरिक कूटप्रश्न, असें जे दोन प्रश्न उभे असतात, ते त्याला पुढीलप्रमाणें एकदम सोडवितां येतात. अनन्त आत्मा, अनन्त ईश्वर, एकरस अक्षर शांतीच्या–नीरवतेच्या स्वरूपांत आहे, तसा तो विश्वांत, विश्वांतील भूतांत, सर्व आत्म्यांत, सर्व निसर्गांत (प्रकृतींत) पण आहे, हें ओळखून मनुष्यानें विश्वगत अस्थिर आणि विश्वातीत सुस्थिर (अक्षर) या दोन्ही स्वरूपांचा साक्षात्कार करून घ्यावा आणि आपल्या बुद्धीच्या, हृदयाच्या इच्छाशक्तीच्या, जीवनाच्या सर्व हालचाली या दोन स्वरूपाच्या ईश्वराशीं संपूर्ण सर्वोत्तम एकता संपादून कराव्या. असें केल्यानें त्याच्यापुढें असलेले दोन्ही प्रश्न एकदम सुटतात. याप्रमाणें मनुष्य ईश्वरसदृश झाला, मनुष्यानें ईश्वरत्व संपादलें म्हणजे सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक जाणिवेची अनन्त आनन्दमय व्यापकता तो अनुभवूं शकतो; ही व्यापकता प्रेममय भक्तीनें आणि ज्ञानानें जशी प्राप्त होते, तशी ती कर्ममार्गानेंहि प्राप्त होऊं शकते. याप्रमाणें अमरत्व आणि मुक्ति मिळविलेला हा मानव, आपलें मानवी कर्म आपल्या श्रेष्ठ पातळीवरून चालू ठेवूं शकतो—आपल्या मानवी कर्माला सर्वोत्तम, सर्वव्यापी दिव्य कर्माचें स्वरूप तो देऊं शकतो. अशा प्रकारचें दिव्य कर्म मनुष्यानें मुक्त होऊन (दिव्यजन्म घेऊन–ईश्वरत्व संपादून) करावें, हेंच वस्तुतः या संसारांत सर्व कर्माचें, सर्व जीवनाचें, सर्व यज्ञाचें विश्वाच्या सर्व धडपडीचें अंतिम प्रयोजन आणि अंतिम सर्वोत्तम फल आहे.

**गीतेचें सर्वांना आश्वासन**

हा मुक्त कर्माचा संदेश, हा सर्वश्रेष्ठ संदेश प्रथम महापुरुषांकरितां, महान् आत्म्यांकरितां गीतेनें दिला आहे. या संदेशानुसार वागण्याला लागणारी शक्ति या महापुरुषांजवळ असते. ईश्वराचें ज्ञान ज्यांनीं करून घेतलें आहे, ईश्वरासाठीं कर्म करण्याचें ज्यांनीं कंकण बांधलें आहे, ईश्वराचें प्रेम ज्यांच्या हृदयांत आलें आहे, अशा महान् आत्म्यांकरितां हा सर्वश्रेष्ठ संदेश आहे. हे महापुरुष ईश्वराचे ठिकाणीं राहून, ईश्वराकरितां जीवन खर्च करूं शकतात, विश्वांत त्याच्याकरितां मोठ्या आनंदानें आपला सर्व व्यवहार करूं शकतात—मानवी मनाचा चंचल अंधकार आणि त्याच्या अहंच्या खोट्या मर्यादा पार करून, हे महापुरुष हें दिव्य कर्म करीत असतात; गीता आणखी असें सांगते कीं, तिनें प्रतिपादलेला योग कोणालाहि अभ्यासण्यासारखा व साधण्यासारखा आहे. अगदीं खालच्या पातळीवरले, अतिपापी जे असतील त्यांनाहि, त्यांनीं निश्चय केल्यास, हा योग असाध्य नाहीं. खरें आत्मसमर्पण आणि आपल्या ठिकाणीं वास करणाऱ्या ईश्वरावर पूर्ण निरहंकारी श्रद्धा एवढ्याच गोष्टी गीता-प्रतिपादित योगमार्गांत यश येण्यास आवश्यक आहेत. परमात्म्यावर अमर श्रद्धा, परमेश्वराच्या अंतरंगांत, त्याच्या निकट सान्निध्यांत नित्य राहण्याची प्रामाणिक सुस्थिर इच्छा; आपला आत्मा परमेश्वराशीं एकरूप व्हावा आणि रहावा ही दृढ इच्छा, आपली प्रकृति* परमेश्वराच्या श्रेष्ठ आध्यात्मिक प्रकृतीशीं एकरूप व्हावी व रहावी ही अनिवार्य इच्छा, आपलीं

---

*आपली प्रकृति म्हणजे अपरा प्रकृति. या प्रकृतींत असतांनाहि आपण ईश्वराचे शाश्वत अंश असतो. ( ममैवांशो .... १५-७ )

सर्व अंगें ईश्वरांकित व्हावीं, आपण सर्वथा ईश्वरसदृश व्हावें, ही प्रामाणिक सुस्थिर इच्छा––या गोष्टी खऱ्या आत्मसमर्पणाशीं निगडित आहेत. अशा स्वरूपाचें पूर्ण श्रद्धायुक्त आत्मसमर्पण गीता-प्रतिपादित योगमार्गांत निश्चित यश मिळवून देण्यास समर्थ आहे––गीतेच्या या सार्वत्रिक संदेशांत कोणत्याहि मनुष्याला पूर्णता संपादन करतां येईल असें सांगितलें आहे. अर्थात् मानवजातीला सामूहिक दृष्टीनें देखील पूर्णतेची आशा आहे असा या सांगण्याचा अर्थ होऊं शकतो. तेव्हां, मनुष्य व्यक्तिशः पूर्णतेकडे धांव घेतो, तसा तो समूहशः देखील धांव कां घेऊं शकणार नाहीं ?––असें गीतेचें मत असल्याचें अनुमान गीतेच्या सार्वत्रिक संदेशांतून काढतां येईल असो.

गीता आपल्या मध्यवर्ती कल्पनेची क्रमशः फोड करून, आपला एकंदर विचार मांडतांना अनेक प्रश्न सहजच आपल्यापुढें उभे करीत आहे. जीवाची प्रकृतितंत्रता किंवा प्रकृतीचा नियतिवाद, विश्वाच्या अभिव्यक्तीचा अर्थ, मुक्त आत्म्याची अंतिम अवस्था––हे गीतेनें उभे केलेले प्रश्न गीतेच्या पूर्वीपासून आतांपर्यंत सारखे चर्चिले जात आहेत, या चर्चेला अंत नाहीं, या चर्चेंतून अंतिम निर्णयात्मक असें कांहीं निघत नाहीं, निघालेलें नाहीं. आमच्या या गीता-विषयक निबंधावलींत वरील चर्चेंत फारसें शिरण्याचें कारण नाहीं, गीतेचा दृष्टिकोन, गीतेचें निर्णय आम्हांला कितपत संमत आहेत, आमचा व गीतेचा कोठें मतभेद आहे, गीतोत्तर-कालीन अनुभवाच्या आधारावर गीतेचें तत्त्वज्ञान आणि तिचा योग आम्हांला कोठें अपुरा वाटतों, इत्यादि चर्चा या निबंधावलींत आम्हांला फारशी आवश्यक वाटत नाहीं. कारण या निबंधावलींत आमचा उद्देश गीतेच्या अंतरंगाचें बारीक निरीक्षण करून, तिचा सारभूत अर्थ स्पष्ट शब्दांत मांडण्याचा व तिनें मानवतेच्या अविनाशी आध्यात्मिक विचारसंपदेंत घातलेली भर वेगळी काढून दाखविण्याचा आहे. तेव्हां आतां पुढच्या शेवटल्या निबंधांत आम्हीं आजच्या साधक-मानवासाठीं असलेला जिवंत संदेश आमच्या शब्दांत सांगणार आहों : मानव हा नित्याचा साधक व शोधक आहे, नवें नवें ज्ञान मिळविणारा आहे; ज्या क्षेत्रांत आज हा मानव वाटचाल करीत आहे, तेथें त्याला मार्गदर्शक होईल असा जिवंत संदेश गीतेपाशीं आहे; मानवाच्या आत्म्याचा प्रकाशमय उंच प्रदेश मानवाला गांठावयाचा आहे, या प्रदेशांत पोंचण्यासाठीं कदाचित् छातीवरची चढण चढावी लागणार आहे; ही चढण चढतांना मानवाला मार्गदर्शक होईल असाहि संदेश गीतेपाशीं आहे; हा द्विविध संदेश पुढच्या निबंधांत देऊन आम्ही वाचकांची रजा घेणार आहों.

अनुवादक : सेनापति पां. म. बापट ––श्रीअरविंद

---

शरीराचीहि पूर्णता होणें हा आत्म्याचा अखेरचा विजय समजला पाहिजे. दैहिक जीवनाला देखील दिव्य बनविणें ही सृष्टिकर्त्या भगवंताची आपल्या परिश्रमांवर अखेरची मुद्रा आहे.

––श्रीअरविंद

# श्रीअरविंदांची साधना

भारताच्या इतिहासांत असें एक युग होतें, कीं ज्यावेळीं चिरंतन सत्याच्या प्राप्तीचा, अध्यात्मसाधना हाच एकमेव मार्ग समजला जात असे. आत्मज्ञान व ब्रह्मज्ञान यांच्या ज्वलंत प्रकाशांतच समाजाच्या सर्व स्तरांना उन्नत करावयाचें हा सर्वसंमत आचार होता. राष्ट्र व समाजाचें पुनरुत्थान म्हणा किंवा शिक्षण व राज्यपद्धतीचें नियंत्रण म्हणा, या तेजोमय ब्रह्मज्ञानाच्या मार्गदर्शनानेंच व्हावयाचें. परंतु पाश्चात्य विचारप्रणालीच्या संपर्कामुळें आमची दृष्टि आज पुष्कळच बदलली आहे. तर्कप्रधान बुद्धीलाच आज आम्ही सत्यदर्शकाच्या गौरवान्वित आसनावर बसविलें आहे. ब्रह्मविद्या किंवा अध्यात्मज्ञान म्हणजे एक रहस्यमय मृगजळ आहे असें आम्हांला वाटूं लागलें आहे. योगसाधना वगैरे कांहीं नसून, तो केवळ कल्पनाविलासी लोकांचा व्यर्थ प्रयास तरी आहे किंवा कांहीं मूठभर स्वार्थपरायण लोकांचा आत्मतृप्तीलाभासाठीं केलेला प्रयत्न तरी आहे अशीच साधारणतः प्रत्येकाची कल्पना आहे. प्राणशक्तीचें वैपुल्य वाढवून शरीराला निरोगी व दीर्घजीवि करावयाचें, सशक्त, सुंदर व बलवान करावयाचें आणि मनाचा विकास घडवून बाह्यप्रकृतीकडून भोगविलासाची व सुखैश्वर्याची किल्ली हस्तगत करावयाची हाच सध्यांचा सर्वोच्च आदर्श आहे. याच कारणामुळें आम्ही जेव्हां प्रथम ऐकलें कीं, सर्वमान्य राजकीय पुढारी म्हणून वंदनीय बनलेल्या श्रीअरविंदांनी राजकारणांतून अंग काढून घेऊन, अनिश्चित काळाकरितां स्वतःला अध्यात्मसाधनेस वाहून घेतलें आहे, तेव्हां आम्ही क्षुब्ध झालों, संतप्त झालों; एका प्रतिभावान् व्यक्तीच्या या संकल्पित विमुखतेबद्दल आम्हांला हळहळ वाटली. राष्ट्रगुरू अरविंद घोषांच्या प्रचंड कर्मशक्तीचें व अलौकिक बुद्धिमत्तेचें आम्हांला आलेलें प्रत्यंतर अगदीं ताजें असल्यामुळें तर आमचा क्षोभ व संताप अधिकच तीव्र झाला. वाटलें, या अध्यात्मिकतेनेंच आमच्या देशाचा सर्वनाश केलेला आहे! धार्मिकतेची ही आत्मग्लानीच भारताच्या हातापायांत दास्यत्वाच्या शृंखला बांधूं देण्यास कारणीभूत झाली आहे!

परंतु कांहींशा शांतपणानें विचार केला, तर आपणाला कळून येईल कीं, वास्तविक आध्यात्मिकता ही केव्हांहि जीवनाच्या अवनतीचें किंवा पंगुत्वाचें कारण होऊं शकत नाहीं. आमचें जीवन म्हणजे आत्म्याची अभिव्यक्ति होय; हें संपूर्ण विश्व एका अखंड भूमा चेतनेचाच बहिःप्रकाश आहे—'सर्वं खल्विदं ब्रह्म'. त्यामुळेंच आत्म्यांत प्रतिष्ठित झालेलें जीवन पंगु न होतां, उलट सर्वांगीण विकासप्राप्त व्हावें, अनंत ज्ञान, अमर्याद शक्ति, निरुपम सौंदर्य व महत्तम गौरव इत्यादींनीं तें समृद्ध व्हावें हीच चरम ज्ञानाची गोष्ट होऊं शकते. भारताच्या वैदिक व पौराणिक युगांचा इतिहास या गोष्टीला साक्ष आहे. दार्शनिक युगानंतरच्या काळांत व्यावहारिक क्षेत्रांत भारताची जी अक्षमता व अधोगति दिसून आली, त्याला अनेक ऐतिहासिक कारणें आहेत. आतां एवढें मात्र खरें कीं, दर्शनयुगीन आध्यात्मिकतेमध्यें निवृत्तिपर संन्यासमार्गाचा अवलंब केला जाणें हें वरील व्यवहारिक अक्षमतेचें एक कारण असूं शकेल. तरीपण भारताच्या व्यावहारिक अवनतीचें मुख्य कारण, आध्यात्मिकतेची अपूर्ण,

आंशिक व विकलांग स्वरूपांतच साधना केली जाणें हें होय, असें विचारांतीं आपणांस दिसून येईल. पुरातन काळापासून चालत येणाऱ्या अध्यात्मसाधनेच्या या प्रवासांत अशी एक वेळ येऊन ठेपली, कीं जेव्हां लीलेचा त्याग करून केवळ लीलामयाचाच ध्यास साधकानें घेतला. भगवंताच्या अनंत रूपांना विसरून, जीवनांतील त्याच्या, बहुविध रूपांना विसरून, केवळ त्याच्या निराकार निर्विकार अस्मितेचें रहस्य जाणण्याचीच कांस जेव्हां त्यानें धरली, तेव्हांच साधनेची असीम शक्ति सीमाबद्ध झाली. कोणी सांगावें, पूर्णतम सिद्धिलाभासाठीं स्थळकाळ-विशेषानें साधनेला अशा रीतीनें सीमाबद्ध करण्याची त्यावेळीं कदाचित् आवश्यकताहि असेल. याच कारणामुळें व्यावहारिक पंगुत्वाचा स्वीकार करूनहि, भारताच्या अस्मितेनें या विचित्र प्रकारें आत्मोपलब्धीचा प्रयास सार्थक करून दाखविला. परंतु भारतीय साधनेच्या विभिन्न प्रवाहांना एकत्र करून, त्यांना समन्वयाच्या सर्वांगीण सागरांत परिणत करावयाची वेळ आलेली आहे. अध्यात्माच्या पूर्णतम विकासाचें फलस्वरूप म्हणून आमचें पार्थिव जीवन-देखील अभिनव छंदांनी व सौंदर्याच्या सुमधुर झंकारांनीं प्लावित व्हावयाची वेळ आज येऊन ठेपली आहे. याच चरम परिणतीचें इंगित श्रीअरविंदांच्या साधनेंत पहावयास मिळतें.

आपल्या देशांत योगसाधना म्हटली, कीं सर्वप्रथम संन्यासाचा आदर्शच आपल्या डोळ्यां-पुढें येतो; कर्माचा त्याग करावयाचा, संसाराला तिलांजलि द्यावयाची, या मायामय जगाला सोडून जाऊन, गहन अरण्याचा, निर्जन एकांतवास पत्करावयाचा किंवा पर्वताच्या अंधाऱ्या गुहेचा आश्रय घ्यावयाचा, हाच चित्रपट दृष्टीपुढून सरकतो. जीवनाला विसर्जित करूनच जीवनाची पूर्णतम परिणति प्राप्त करावयाची असते, हाच सिद्धांत आमच्या हाडींमांसीं खिळला आहे. निर्वाणाचा आदर्श भगवान् बुद्धांनीं लोकांना दिला. जीवन-प्रदीप निःशेषरूपानें विझवून टाक-णारा धर्म बुद्धांनी पसरविला. जीवन जगण्याची एक अंध आस्पृहाच सर्व अनर्थाचें मूळ आहे, हें त्यांनी प्रतिपादन केलें. 'जगद्धिताय कर्म' करण्याची भाषा बौद्ध धर्मांत आहे; विश्वव्यापी करुणा व विश्वबंधुत्वाची सुद्धां भाषा आहे. परंतु ती भाषा, पृथ्वीवर राहूनच मानवी जीव-नाला महीयान करण्यासाठीं नव्हे, तर 'सर्वं दुःखं', 'सर्वं शून्यं', 'सर्वं क्षणिकं' व 'सर्वं स्वलक्षणं' या चार महामंत्रानीं विश्वमानवाला उद्‌बोधित करून त्याला निर्वाणाकडे घेऊन जाण्यासाठीं आहे.

आचार्य शंकरांनीं सांगितलें––'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या'. शंकरांचें 'ब्रह्म' हें सच्चिदानंद-स्वरूप आहे, बुद्धाच्या निर्वाणाप्रमाणें कांहीं तें सर्वग्रासी महाशून्यवत् नाहीं हें खरें; परंतु जीवनज्योति ब्रह्मतेजांत विलीन करावयाची किंवा परब्रह्माशीं जीवात्म्याची सायुज्यता प्राप्त करावयाची हाच बुद्धाप्रमाणें शंकराचार्यांचा देखील आदर्श होता. या आदर्शाप्रत जाणाऱ्यानें हें लक्षांत ठेवावयाचें असतें, कीं जीवन म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून, मृगजळापाठीमागें धांवत सुटणें अथवा भ्रमाच्या भोंवऱ्यांत सांपडणें. जगत् केवळ मिथ्या आहे, मायेची सृष्टि आहे––कल्पित रज्जू सर्पवत्. जीवन्मुक्तीची कल्पना शंकरांनी मानली आहे खरी, पण जीवन्मुक्त पुरुषाच्या दृष्टींत जीवन म्हणजे भंगलेल्या दुस्वप्नाची केवळ शेवटची स्मृति-रेखाच होय. अतीत कर्माच्या अंध आवेगांत, त्या अवस्थेंत देखील जीवन स्पंदन करीत असलें, तरी या जीवनाची तुच्छता व असारता महापुरुषानें अनुभवली असल्यामुळें लवकरच तें सुद्धां गळून जाणार असतें.

आचार्य रामानुजांनीं जीव व जगत् या दोहोंचाहि स्वीकार केलेला आहे. जीव व जगत्

हीं परमेश्वराचीच विशेषणें असून, तीं त्याच्यावरच निर्भरशील आहेत. पण त्यांच्या मतेंसुद्धां जीवनाचा चरम हेतु संसारांतून व इहजीवनापासून मुक्त होऊन, स्वर्गांत देवतांचें सान्निध्य प्राप्त करावयाचे व त्यांच्या आज्ञानुवर्ती राहून कृतकृत्य व्हावयाचें, हा आहे. जीवनाचा पूर्णतम विकास करावयाचा किंवा मनुष्यांमध्येंच देवजन्म सिद्ध करून दाखवावयाचा त्यांनी देखील प्रयत्न केला नाहीं. रामानुजांनी मर्त्य लोकाचा स्वीकार केला पण स्वर्ग व मर्त्य या दोहोंमध्यें त्यांनी दुर्भेद्य अशा अंतराळाची कल्पना केली. त्यामुळें देवजीवन प्राप्त करावयाचें झाल्यास, पार्थिव देह-मन-प्राणाचा त्याग करून, शुद्धसत्त्वाच्या उपकरणांनीं युक्त असें नवीन देह-मन-प्राण घ्यावयाचे असतात. मर्त्य-धामाला रूपांतरित करून यावरच स्वर्गाची प्रतिष्ठा करणें शक्य आहे, तसेंच, इहजीवनाला भागवत् छंदांनी लीलायित करून, पृथ्वीच्या उदरींच भगवंताला प्रकट करणें हेंच विश्वप्रकृतीचें गूढतम रहस्य आहे याची आचार्यांना कल्पनाहि शिवली नाहीं.

आपल्या देशांत ज्याप्रमाणें साधना म्हटली कीं साधारणतः संन्यासाची व संसारत्यागाची कल्पना येते, त्याचप्रमाणें पाश्चिमात्य देशांत साधना म्हटली, कीं एका विशालतर भोगैश्वर्यासाठीं केला जाणारा प्राकृत प्रयत्नविशेष हीच सर्वसाधारण लोकांना कल्पना येते. आमच्या या सीमित देह-मन-प्राणाद्वारां पृथ्वीची जितकी कांहीं भोगसामुग्री लुटतां येईल, तितकी लुटावयाची हीच पाश्चात्यांची सर्वोच्च आकांक्षा आहे. मनुष्यांकडून जें कांहीं संभव असेल त्याला साधनभूत करावयाचें आणि माणसांमध्यें आंतरिक अशा ज्या कांहीं शक्ती असतील, त्यांचा पूर्ण विकास करावयाचा, हाच तिथला सर्वोच्च आदर्श समजला जातो. पार्थिव सुखोपभोगांचा त्याग करून, अपार्थिव काल्पनिक आनंदाच्या पाठीमागें लागण्यासाठीं जितके कांहीं प्रयत्न होतील, त्या सर्वांकडे ते संशयाच्या दृष्टीनें पाहतील, कल्पनाविलासी लोकांचा निष्फळ, वेडगळ व वृथा प्रयत्न म्हणून त्याची हेटाळणी करतील.

श्रीअरविंदांच्या जीवनांत प्राच्य व पाश्चात्य विचारप्रणालींचा अपूर्व समन्वय साधला आहे. पौर्वात्यांच्या आदर्शांत पाश्चिमात्य कर्मप्रेरणेला जागृत करावयाचें आणि पाश्चिमात्यांच्या प्रचंड कर्मस्रोतांमध्यें पौर्वात्यांचें देवजन्माचें स्वप्न मूर्त करावयाचें, विकसित करावयाचें हा श्रीअरविंदांच्या योगाचा उद्देश आहे. ही पृथ्वीच आमचें कर्मक्षेत्र आहे, केवळ कर्मक्षेत्रच नसून, ती इष्टसिद्धीचे भोगक्षेत्रदेखील आहे—पाश्चात्यांची सहज प्रेरणा येथें अचूक आहे—परंतु मनुष्याच्या तुच्छ शक्तीच्या सहाय्यानें प्रकृतीपासून यथासंभव सुखभोग प्राप्त करणें हा आदर्श नव्हे; प्रकृतीच्या पार्श्वभागीं जो विश्वात्मा आहे, त्याच्याशीं स्वतःची एकरूपता प्राप्त करून, अनंत शक्तींनी शक्तिमान् व्हावयाचें हा श्रीअरविंदांच्या साधनेचा हेतु आहे. पृथ्वीची स्थूलता व संकीर्णता यांचा असहायपणें स्वीकार करून, मनुष्य-प्राण्याला जेथपर्यंत शक्य असेल तेथपर्यंत विकासाची व प्रगतीची सीमा गांठावयाची हा देखील आदर्श नव्हे. माणसामध्यें जी सुप्त देवता आहे, तिला जागृत करून मानव प्रकृतीचें रूपांतर शक्य करून दाखविणें हा त्यांच्या साधनेचा उद्देश आहे. पार्थिव चेतनेंत गुप्तपणें दडलेल्या असीम भागवत चेतनेला उद्‌बोधित करून, याचठिकाणीं स्वर्गाचें राज्य प्रस्थापित करणें, हा त्यांचा आदर्श आहे. स्थूल प्रकृतीच्या हृदयगह्वरांत ज्या सच्चिदानंदमयी विश्वशक्तीचा संकल्प प्रतिमुहुर्ताला कार्य करीत आहे, त्याच विश्वशक्तीच्या प्रचंड संकल्पानें क्रमविकासामधून

प्रकृति जडापासून चेतनाकडे जात आहे. वसुंधरेच्या वक्षःस्थळावर सच्चिदानंदाच्या पूर्ण-अभिव्यक्तीची तिची साधना अव्याहत चालली आहे. जडापासून उद्भिज व उद्भिजांपासून प्राण्यांची सृष्टि झाली. प्राण्यानंतर मनोमय चेतनेचा अधिकारी अशा मानवाचा आविर्भाव झाला. श्रीअरविंदांच्या अनुभूतीप्रमाणें मानवानंतर, भगवंताच्या अतिमानस शक्तीच्या (Supra-mental power) अवतरणानें अतिमानव (Superman) जन्म घेणार. मनुष्यांच्या सचेतन अभीप्सेंतून व जागृत साधनेमधूनच या नवजन्माची किंवा नूतन अभिव्यक्तीची उपलब्धि होईल. फलस्वरूप, अखिल विश्वमानव या देवजीवनाचा अधिकारी होईल आणि स्वतःला साक्षात् "अमृतस्य पुत्रः" म्हणून ओळखूं लागेल.

जडप्रकृतीच्या गाभाऱ्यांत आणि देह-मन-प्राणापलीकडे जी एक विराट् सच्चिदानंदमय सत्ता आहे, ती पौर्वात्यांच्या गहनगभीर अंतर्दृष्टीला सहजपणें गोचर झाली. परंतु या विराट् सत्तेचें अनुसंधान मिळूनहि, तिच्या गूढ स्पर्शानंदांत निमग्न झाल्यामुळें त्यांनी विश्वप्रकृतीच्या गतीला व जीवनाच्या कर्मप्रवाहाला ठोकर दिली, तिची उपेक्षा केली, तिची अवहेलना केली. आचार्य शंकरांनी प्रचार केला कीं, ब्रह्म सत्य, जगत् मिथ्या; श्रीअरविंद म्हणतात, ब्रह्म सत्य आहे, जगत् देखील सत्य आहे. जगाला ब्रह्मापासून पृथक् व विच्छिन्न करून बघणें आणि त्या अंध अहंमन्यतेमुळें जगताप्रति आसक्त होणें किंवा त्याला लाथाडणें हेंच केवळ मिथ्या आहे. अर्थात् त्याग व संन्यास हे फारच उच्च आदर्श आहेत यांत शंका नाहीं; कारण कामना व वासना यांचें विसर्जन न करतांच अंधकार दूर करतां येणार नाहीं. अहंकारितेच्या या तुच्छतेला अतिक्रम करून जातां येणार नाहीं किंवा 'अवाङ्मनसोगोचर' सत्याचा शोधहि घेतां येणार नाहीं. परंतु त्याग करावयाचा संसाराच्या आसक्तीचा, संसाराचा नव्हे. जीवनाचा सर्वश्रेष्ठ आदर्श कर्मसंन्यास नव्हे; कर्तृत्वसंन्यास, कर्मफलाच्या अपेक्षेचा प्रशांत विलय हाच परमोच्च आदर्श आहे. कारण स्वतः भगवंतदेखील कर्मद्वारेंच विविधतेचा व वैचित्र्याचा आनंद (delight of becoming) अनुभवीत आहे, निरनिराळ्या छंदोमय लहरींतून तो प्रत्यहीं प्रगट होत आहे. कर्मफळ व कर्तृत्वाभिमान या दोन्ही प्रवृत्ती भगवंताला समर्पित करून, त्याच्या लीलेंत सहचर होणें हेंच आमचें उद्दिष्ट असलें पाहिजे. अर्थात् वाटलेंच तर कर्मदेखील विसर्जित करून भागवतचेतनेमध्यें आपणांस राहतां येईल. परंतु त्याहिपेक्षां विश्वलीलेंत भगवंताचा सहचर होणेंच अधिक उच्च प्रतीचें आहे; जगामध्यें धर्मराज्याची स्थापना करण्यासाठीं सहाय्यभूत होणेंच अधिक श्रेयस्कर आहे; कारण भगवंतालाच हे अभिप्रेत आहे. वास्तविक जीवात्मा तर नित्यशुद्ध, नित्यबुद्ध व नित्यमुक्त आहे. संकल्प केला तर त्याला भगवंताच्या विश्वातीत अस्मितेंत स्वतःला डुंबवून ठेवतां येईल, परंतु तसें न करतां भगवंताच्या लीलाप्रवण इच्छेप्रति आत्मोत्सर्ग करून, पृथ्वीवर त्याचें कार्य करीत राहणेंच जीवाचें श्रेष्ठ धर्मकर्तव्य समजलें पाहिजे.

अज्ञान, अहंकार व कर्तृत्वाभिमान यांचा त्याग करून, कर्मजीवन अंगीकृत करावयाचा भगवद्गीतेचा मूलमंत्र आहे. आंतरिक अवस्थेंत ब्राह्मीस्थितीचा प्रशांत कैवल्यानंद आणि बाह्य अवस्थेंत कर्मतरंगाचा विपुल उछ्वास हीच व्यक्तिगत जीवनाची सर्वोच्च अवस्था व चरम सार्थकता होय. ज्ञान-प्रतिष्ठित कर्मयोगाच्या या आदर्शाला वैदिक ऋषींनी देखील श्रेष्ठ स्थान दिलें होतें. संपूर्ण जीवन म्हणजे एक यज्ञच होय अशी त्यांची धारणा होती. प्रत्येक

क्षणाला आपले विचार, आपल्या भावना व आपलीं कर्में भगवंताला अर्पण करावयाचीं आणि या आत्मोत्सर्गांतून व आत्मबलिदानांतूनच मानवामध्यें जन्मग्रहण करण्यासाठीं या भूमीवर येण्यास भगवंताला आवाहन करावयाचें; पृथ्वीवर देवजन्माच्या या स्वप्नाला मूर्तिमंत करण्यासाठींच श्रीअरविंद जीवनव्यापी साधना करण्यास उद्युक्त झाले. त्यांच्या धारणेप्रमाणें, दिव्य जीवन पृथ्वीवर संभवनीय आहे असेंच केवळ नव्हे, तर युगयुगांतराच्या विवर्तनांतून दिव्यजीवन-लाभ करणेंच विश्वप्रकृतीचा निगूढ उद्देश आहे, विश्वसृष्टीचें गुह्य रहस्य आहे. The Supramental is a Truth and its advent is, in the very nature of things, inevitable.

दिव्य जीवन प्राप्त करण्यासाठीं देह-मन-प्राणाचें क्षेत्र सोडून, केवळ उर्ध्व जगतांत किंवा तुरीयावस्थेंत गेल्यानेंच भागणार नाहीं, तर त्याबरोबरच या तुरीय धामाच्या अतिमानस शक्तीला खालीं आणून, मन-प्राण-शरीराला नवीन चेतना, नवीन शक्ति व नवीन आनंदानें इतकें परिप्लावित करावयाचें कीं जेणेंकरून संपूर्ण प्रकृतीचें रूपांतर होऊन, अतिमानवाची नवी जाति (Race or species) अभिव्यक्त व्हावी. श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाचें, अध्यात्म-योगाचें किंवा आत्मसमर्पण योगाचें नाहींतरी हेंच लक्ष्य आहे.

(अपूर्ण)

श्री. हरिदास चौधरी एम. ए. डी. फिल्.
(यांच्या मूळ बंगालीवरून अनुवादित)
अनुवादक––गजराज.

# श्रीअरविंदांच्या जीवनांतील घटना-प्रवाह

(मागील अंकावरून पुढें)

## पांडीचेरी

**१९१० जून** अलीपूर कारावासांत, शारीरक्रियांवर मिळालेल्या प्रभुत्वाचा प्रत्यक्ष अनुभव पाहण्यासाठीं २१ दिवसांचा उपवास. या मुदतींत नित्याचें सर्व काम तितक्याच उत्साहानें व शक्तीनें चालू होतें; आणि एकदम अगदीं नेहमींइतका आहार घेऊन उपवास सोडला.

**१९१० ते १४** चार वर्षें अतिशय खडतर. पोलिसांचा सारखा ससेमिरा. १९३७ पर्यंत तो चालूंच.

तामीळ राष्ट्रीय कवि व क्रांतिकारक सुब्रह्मण्य भारती यांच्यासारख्या कांहीं क्रांतिकार-कांशीं परिचय.

**१९१२** श्रीअरविंदांना न कळत त्यांना पळविण्याची ब्रिटिश सरकारची योजना; पण ती विफल झाली.

**१९१४ मार्च** २९ : श्रीमाताजींचें पांडीचेरीस आगमन; व त्यांची श्रीअरविंदांशीं प्रथम भेट. श्रीअरविंदांच्या ठिकाणचें जगदुद्धाराचें सामर्थ्य प्रतीतीस आलें व आपलें स्वतःचें कार्यहि त्यांच्याबरोबर भारतांतच होणार असल्याची त्यांना आंतरिक खात्री पटली.

**मे**—एका समयीं बोलतांना श्रीअरविंदांनीं म्हटलें कीं, जगाच्या प्रगतीचे सर्व मार्ग बंद होऊन पडले आहेत. मनुष्य जणुं कारागारांत राहून जीवन जगत आहे. 'मग त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता ?' त्यांना विचारलें गेलें. 'युद्ध व सर्वनाश. त्यावांचून नवनिर्मिति शक्य नाहीं'. हें संभाषण झाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांनीं पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला.

**ऑगस्ट १५** 'आर्य' हें तत्त्वज्ञानविषयक मासिक सुरू केलें. सहकारी संपादक— श्रीमाताजी व पॉल रिचर्ड.

**१९१५ फेब्रुवारी २१** : पांडीचेरीस झालेला श्रीमाताजींचा पहिलाच वाढदिवस.

**फेब्रुवारी २२**: फ्रान्सला परत जाण्यासाठीं श्रीमाताजींनीं पांडीचेरीहून प्रयाण केलें.

त्यावेळचे बंगालचे गव्हर्नर लॉर्ड कारमिकोल यांनीं, श्रीअरविंदांना निवांतपणें कायम राहण्यासाठीं बंगालमध्यें दार्जिलिंग येथें एक प्रशस्त बंगला देऊं केला. या मागील उद्देश हा कीं, त्यायोगें त्यांच्यावर पाळत ठेवणें ब्रिटिश सरकारला सुलभ व्हावें. यास श्रीअरविंदांचा नकार. आध्यात्मिक साधनेसाठीं हिमालयाचें वातावरण चांगलें म्हणून श्रीअरविंद या गोष्टीस मान्यता देतील अशा भ्रमांत सरकार त्यावेळीं असावें.

फ्रान्स सरकारकरवीं श्रीअरविंदांना पॅरीसमध्यें हलविण्याचा ब्रिटिश सरकारचा डाव; तोहि फसला.

शारीर क्रियांवर आलेलें प्रभुत्व कसास लावण्याचा आणखी एक प्रयोग. मोठ्या मात्रेनें अफू खाऊन पाहिली. शरीरावर कसलाच, कांहींच परिणाम नाहीं.

**१९१७**—नियतकालिकासाठीं बातमीदारांनीं श्रीअरविंदांची मुलाखत घेतली. त्यांत श्रीअरविंदांनीं अभिप्राय व्यक्त केला कीं, मानवजातीच्या प्रगतीची गुरुकिल्ली भारताजवळ आहे.

काँग्रेसचें पुढारीपण घेण्याविषयीं लोकमान्यांकडून विनंतिवजा निरोप आला. श्रीअरविंदांचा नम्रतापूर्वक नकार.

**१९१७**—बेनेगाल संजीवराव यांच्याशीं बोलतांना, ब्रिटिश साम्राज्याचें भवितव्य व भावी कालांत होणारें स्वतंत्र राष्ट्रांचें मंडळ याविषयीं श्रीअरविंदांनीं भाकित केलें.

**डिसेंबर**—पत्नी मृणालिनी देवी यांना, पांडीचेरीस नेण्यासाठीं तयारी चालली असतां, कलकत्त्यास त्यांचें देहावसान.

**१९१९**—'इंडियन नॅशनॅलिस्ट' या सहीनें, ॲनिबेझंट यांच्या 'न्यूइंडिया' मध्यें मोर्लेमिंटो सुधारणांविषयीं एक पत्र प्रसिद्ध केलें.

जपानमध्यें श्रीमाताजी असतांना, रवींद्रनाथ टागोर हे, विली पियरसन या आपल्या सेक्रेटरीसह, त्यांना भेटले. शांतिनिकेतनच्या सर्वाधिकारिणी होण्याविषयीं रवींद्रनाथांची श्रीमाताजींना विनंति. श्रीमाताजींचा सस्मित नकार.

**१९२० जानेवारी ५** : जोसेफ बाप्टिस्टा यांना, त्यांच्या इंग्रजी वृत्तपत्राचें संपादकत्व कां स्वीकारत नाहीं याचीं सविस्तर कारणें देणारें पत्र पाठविलें.

**एप्रिल ७** : श्रीबारींद्र अंदमानहून सुटल्यानंतर त्यांनीं श्रीअरविंदांना लिहिलेल्या पत्रास श्रीअरविंदांचें उत्तर.

**एप्रिल २४** : श्रीमाताजींचें, पांडीचेरीस पुनरागमन ; "भारतास स्वातंत्र्य कसें व केव्हां मिळणार' याविषयीं श्रीअरविंदांजवळ त्यांचें भविष्यकथन—

**ऑगस्ट ४** : लो. टिळकांविषयींचा सुदीर्घ मृत्युलेख अलाहाबादच्या 'Independent' वर्तमानपत्रास श्रीअरविंदांनीं तारेनें पाठविला.

**ऑगस्ट १५** : श्रीअरविंदांच्या मार्गदर्शकत्वाखालीं चंद्रनगरच्या प्रवर्तक संघाच्या कार्यकर्त्यांनीं श्रीअरविंदांच्या जन्मदिनीं 'स्टँडर्ड बेअरर' नांवाचें इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. संपादक—अरुण दत्त. साप्ताहिकाचें उद्दिष्ट, ध्येय व कार्य या विषयीं विवेचन करणारा 'स्वतः विषयीं' हा लेख पहिल्या अंकांत श्रीअरविंदांनीं स्वतः लिहिला. पूर्णयोग, सामूहिक योग-साधना, भारताचें भावी काळांतील कार्य, आध्यात्मिक पायावर नवसमाजरचना, आध्यात्मिक साम्यवाद व तत्कालीन राजकीय आंदोलनाविषयीं अभिप्राय—असें लेखांचें स्वरूप असें. तीन वर्षांनंतर हें साप्ताहिक बंद पडलें. प्रवर्तक संघाच्या संचालक वर्गाचें कार्याचें धोरण व दिशा बदलल्यामुळें श्रीअरविंदांनीं संघाशीं असलेले संबंध तोडले.

**आक्टोबर** : नागपूरच्या महत्त्वपूर्ण अधिवेशनाचें अध्यक्षपद स्वीकारण्याविषयीं श्रीअरविंदांचें मन वळविण्याच्या उद्देशानें, त्यांचे पूर्वीचे एक सहकारी कार्यकर्ते डॉ० बा. शि. मुंजे यांचें आगमन. श्रीअरविंदांचा नकार.

**१९२० ते १९२६** : नाना क्षेत्रांतील नाना विषयावर शिष्य-साधकांशीं श्रीअरविंदांचे रोज

कांहींवेळ मोकळेपणानें बोलणें होत असें. या सर्व संभाषणांचा केंद्रीय विषय असे—योग आणि त्याचें जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अनुसरण कसें करावयाचें.

**१९२१** : ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद कर्नल जोसुआ वेजवुड व सुप्रसिद्ध क्रांतिकारक अविनाश भट्टाचार्य यांचें आगमन. भट्टाचार्य यांचा कांहीं महिने निवास. बंगालच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल श्रीअरविंदांचें भट्टाचार्यांशीं बोलणें.

**जुलै**—'आर्य' मासिक-पत्रिकेचें प्रकाशन बंद. संपादकीय लेखांत त्याच्या कारणांचें स्पष्टीकरण.

वायली पियरसन यांचें आगमन व साधनेसाठीं निवास.

**१९२२ नोव्हेंबर**—श्रीअरविंदांनीं पुनरपि भारताच्या राजकारणांत लक्ष घालावें, यासाठीं देशबन्धु चित्तरंजन दास यांचेकडून निमंत्रण. पण त्यावेळीं, भविष्यकालीन कार्यासाठीं 'सर्वांगपूर्ण पायावर' 'उच्चतर चेतनेच्या' प्रतिष्ठापनेची पूर्वतयारी करण्याच्या कामीं श्रीअरविंद पूर्णपणें गुंतलेले असल्यानें आमंत्रणाचा अस्वीकार.

**१९२३ जून**—स्वतः देशबंधूंचें आगमन. श्रीअरविंदांशीं आध्यात्मिक व राजकीय समस्यांविषयीं चर्चा. आशियांतील राष्ट्रांची संघटना करण्याविषयींच्या 'ओकाकुरा' च्या योजनेची एक पहिली पायरी यादृष्टीनें सर्वधर्मपरिषद बोलावण्याविषयीं श्रीअरविंदांची देशबंधूंना सूचना.

देशबंधूंच्या स्वराज्य-पार्टीच्या राजकीय कार्यक्रमाला श्रीअरविंदांचा पाठिंबा.

**१९२५ जानेवारी**—लाला लजपतराय व पुरुषोत्तमदास टंडन, कांहीं निश्चित योजना बरोबर घेऊन, त्याबाबतींत श्रीअरविंदांचा सल्ला विचारण्यासाठीं आले.

भारतास स्वातंत्र्य मिळणारच याविषयीं श्रीअरविंदांचें निश्चित स्वरूपाचें आश्वासन.

**१९२६ नोव्हेंबर** २४—सिद्धि-दिन. विजय-दिन. 'जड भौतिकांत श्रीकृष्णशक्तीचें अवतरण'. त्यावेळीं आश्रमांत असलेल्या २४ साधकांनीं हा दिन खाजगीरीत्या साजरा केला. त्यानंतर पुढें वर्षांतील दुसरा दर्शन-दिन म्हणून सिद्धि-दिन साजरा होऊं लागला.

श्रीअरविंद संपूर्ण एकांतवासांत गेले व सर्व कारभार श्रीमाताजींच्यावर सोंपविला.

श्रीमाताजींच्या मार्गदर्शनाखालीं 'आश्रम' या स्वरूपांत या व्यवस्थेस आकार येऊं लागला.

**१९२८ फेब्रुवारी** १६—डॉ० रवींद्रनाथ टागोर यांचें आगमन. त्यांची श्रीअरविंदांना भेटण्याची इच्छा. केवळ त्यांच्याकरितां अपवाद करून, एकांत भंग करून श्रीअरविंदांनीं भेट दिली. टागोरांचें पांडीचेरीस बोटीनें आगमन. या पांडीचेरीच्या यात्रेविषयीं टागोरांचें सुप्रसिद्ध लेखन.

—'The Mother' पुस्तकाचें प्रकाशन. त्यांत श्रीअरविंद म्हणतात "श्रीमाता म्हणून जिची आपण आराधना करतों, ती एक सचेतन दिव्य महाशक्ति आहे." पुढें एका पत्रामध्यें ते म्हणतात, "ती महाशक्ति अतिमानसास खालीं आणण्यासाठीं येत असते."

**१९३०-३८**—साधकांशीं नित्य पत्रव्यवहार. दररोज पत्रांचा ढीग. पत्रोत्तरद्वारां साधकांना योगमार्गावर व्यक्तिगत मार्गदर्शन. रात्रीं फक्त १-२ तास विश्रांति. बाकी सर्व वेळ पत्रोत्तरलेखनांतच खर्च होई. हा बहुतेक सर्व पत्रव्यवहार आश्रमाच्या प्रसिद्धिविभागद्वारां, प्रसिद्ध झाला आहे.

**१९३७-४० :** काव्यलेखन. विशेषतः सुनीतें. त्यांतील बहुतेक सर्व Last Poems या नांवानें प्रसिद्ध झालीं आहेत.

**१९३८ नोव्हेंबर २३ :** दर्शनाचे आदले दिवशीं सायंकाळीं अपघातानें उजव्या मांडीचें हाड मोडलें पुढें श्रीअरविंदांनींच स्पष्ट केलें कीं, विरोधी शक्तींचा हल्ला श्रीमाताजींच्या शरीराच्या रोखानें येत असतां, श्रीमाताजींच्या रक्षणाकडेच संपूर्ण लक्ष केंद्रित केल्यामुळें, त्यांच्या शरीरावर त्या शक्तींचा आघात झाला. श्रीमाताजी व श्रीअरविंद यांचा सर्व यत्न होता, स्वर्गीय दिव्य प्रकाश पृथ्वीवर आणून तो येथें सुप्रतिष्ठित करण्याचा. या त्यांच्या उद्योगामुळें अदिव्य शक्ती खवळल्या होत्या. आपलें प्रभुत्व पृथ्वीवर कायम राखण्याकरितां यांच्या दिव्य कार्याचा केंद्रबिंदूच नष्ट करण्याचा व झालेल्या कार्याचा विध्वंस करण्याचा त्यांचा यत्न होता.

**१९३९ सप्टेंबर**––दुसरें महायुद्ध सुरू.

**नोव्हेंबर**––दिव्य जीवन (Life Divine) ग्रंथाचा प्रथम खंड पुस्तकरूपांत प्रसिद्ध झाला. पहिल्या महायुद्धाचे सुमारास १५ ऑगस्ट १९१४ पासून धारावाहिक रूपानें हा ग्रंथ 'आर्य' मासिकांतून प्रसिद्ध झाला होता; पण श्रीअरविंदांनीं नवसंस्करण करून त्यांत पुष्कळच भर घातली.

दुसरा खंड प्रसिद्ध करण्यासाठीं श्रीअरविंदांनीं 'आर्य' मधील उरलेल्या लेखांचें पुनः-संस्करण व पुनर्लेखन सुरू केलें.

**१९४०** 'दिव्यजीवन' (Life Divine) उरलेला दुसरा खंड प्रसिद्ध झाला.

श्रीअरविंद व श्रीमाताजी यांची संयुक्त घोषणा––"दोस्त राष्ट्रसंघ, हा संस्कृति व तिचीं उच्चतर मूल्यें यांच्या रक्षणार्थ लढत असून, त्यांना आमचा पूर्ण पाठिंबा आहे. नाझी व त्यांच्या बाजूचीं राष्ट्रें हीं संस्कृतीस विरोधी असून त्यांच्या आधिपत्याखालीं, आम्हीं चालविलेल्या नव दिव्यसृष्टीच्या उभारणीच्या पूर्वतयारीच्या कार्याचा नाश होण्याचा धोका आहे."

**१९४० ते १९५०** श्रीअरविंदांचे बहुतेक सर्व प्रमुख ग्रंथ या काळांत प्रसिद्ध झाले. याच काळांत आश्रमाचा व्याप व आश्रमस्थांची संख्या तिप्पटीपेक्षां अधिक वाढली व दर्शनदिनांचे दिवशीं बाहेरून येणाऱ्यांची संख्या सारखी वाढत गेली. याच काळांत आश्रमाचा छापखाना सुरू झाला. शारीरिक शिक्षणाचा उपक्रम वाढत्या प्रमाणावर सुरू झाला. शेती व गायरानें घेतलीं. गोशाळा सुरू झाली. युद्धकाळांतील महर्गता व इतर अनेक अडचणी असूनहि ही वाढ अत्यंत जलद गतीनें झाली.

**१९४२ मार्च ३१**––ब्रिटिश सरकारनें सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स यांच्या द्वारां काँग्रेस पुढाऱ्यांसमोर स्वातंत्र्यविषयक योजना मांडली.

श्रीअरविंदांनीं क्रिप्स योजनेला आपला पाठिंबा असल्याचें जाहीर करून, शिवाय आपल्या एका खाजगी दूताकरवीं काँग्रेस वर्किंग कमिटीस या पाठिंब्याचीं कारणें समजावून देऊन ही योजना स्वीकारण्याची विनंति कळविली.

**जुलै २९ :** एका शिष्याला श्रीअरविंदांचें पत्र––"हें युद्ध, मातृशक्तीच्या कार्यरक्षणार्थ चालू असलेलें युद्ध असून, त्यांत आसुरी शक्तींनीं विरुद्ध पक्षियांना आपल्या हातचें साधन बनविलें आहे"––असें त्यांत निःसंदिग्धपणें उद्घोषित केलें.

**डिसेंबर २** : आश्रमाची शाळा सुरू झाली. महायुद्धाची झळ भारतास लागण्याचा धोका उत्पन्न झाल्यानें, आपल्या कुटुंबियांसह आपणांस श्रीमाताजींचें साक्षात् संरक्षण मिळावें अशी बाहेरच्या कित्येक साधकांना इच्छा झाली. यामुळें आश्रमांत प्रवेश देण्याच्या पूर्वींच्या नियमांतील कडकपणा जरा कमी करून, श्रीमाताजींनीं कांहीं कुटुंबांना आश्रय दिला. त्यांतील लहान बालकांच्या शिक्षणाची कांहीं सोय असावी म्हणून नर्सरी वर्गापासून पुढचे कांहीं वर्ग सुरू करण्यांत आले. त्याचबरोबर शारीरिक शास्त्रशुद्ध शिक्षणाचीहि सोय करण्यांत आली.

दोन खंडांत श्रीअरविंदांचें काव्य व नाटकें (Collected Poems and Plays) प्रसिद्ध झालीं; त्याचीच डी लक्स आवृत्तीहि काढण्यांत आली.

**१९४३ सप्टेंबर ३** : शिष्याला लिहिलेल्या आणखी एका पत्रांत श्रीअरविंद म्हणतात— "नाझी आक्रमण म्हणजे भारतास व जगास धमकी दाखविणारा पुनरुज्जीवित रानटीपणा व निकृष्ट गुलामगिरी."

**१९४४ फेब्रुवारी २१** : श्रीअरविंदांच्या तत्त्वज्ञानाचे अधिकारी प्रतिपादक व आश्रमाचे सेक्रेटरी नलिनीकांत गुप्त यांच्या संपादकत्वाखालीं 'श्रीअरविंदांच्या दिव्यदृष्टीस दिसलेल्या मानव-भवितव्याचें स्पष्टीकरण करण्याच्या ध्येयास वाहिलेलें 'Advent' नांवाचें त्रैमासिक सुरू झालें.

**१९४५ ऑगस्ट १५** : महायुद्धाचा शेवट. श्रीमाताजी संदेशांत म्हणतात "भगवन्ता ! तुझा विजय झाला. तुझ्या या विजयाप्रीत्यर्थ आम्ही सर्व तुझ्या चरणीं अनंत प्रणाम सादर करीत आहों."

**१९४७ ऑगस्ट १५** : भारताचा स्वातंत्र्यदिन. विलक्षण योग हाच कीं, हाच श्रीअरविंदांचा जन्मदिन. स्वातंत्र्यदिननिमित्त श्रीअरविंदांचा, ऐतिहासिक दृष्टचा महत्त्वपूर्ण असा संदेश, ऑल इंडिया रेडिओ, त्रिचनापल्ली स्टेशनवरून, ध्वनिक्षिप्त करण्यांत आला; त्याचबरोबर श्रीमाताजींनीं केलेलें 'भारताच्या आत्मदेवतेस आवाहन' हेंहि ध्वनिक्षिप्त करण्यांत आलें.

श्रीअरविंदांच्या खोलीवर श्रीमाताजींनीं, भारताचें आध्यात्मिक स्वरूप दाखविणारा ध्वज चढविला. रस्त्यावर जमलेल्या सर्वांनीं 'वंदेमातरम्' च्या घोषणेनें ध्वजाचें स्वागत केलें. भावनेनें ओथंबलेल्या आवाजानें श्रीमाताजींनीं 'जय हिंद' असें उद्घोषून प्रतिसाद दिला.

**सप्टेंबर** : श्रीअरविंदांच्या देखरेखीखालीं पांडीचेरी येथें भारतीय व फ्रेंच संस्कृतींच्या अभ्यासार्थ व संशोधनार्थ एक संस्था स्थापन करण्याची योजना घेऊन, फ्रेंच सरकारच्या संदेशानुसार आलेले, सांस्कृतिक कार्याच्या विभागाचे प्रमुख मॉ. मॉरिस श्चुमान यांना श्रीअरविंदांनीं मुलाखत दिली.

दहा वर्षांत भारतामध्यें एकता प्रस्थापित होईल असें श्रीमाताजींजवळ श्रीअरविंदांचें कथन.

**१९४८ डिसेंबर ११** : आंध्र विद्यापीठानें ठेवलेलें सर 'सी आर रेड्डी राष्ट्रीय पारितोषिक श्रीअरविंदांना अर्पण केलें गेलें. त्यावेळीं आंध्र विद्यापीठाला श्रीअरविंदांनीं विशेष संदेश दिला. भारताच्या भविष्यकालीन विकासाच्या व पुनर्रचनेच्या दृष्टीनें कांहीं महत्त्वाच्या सूचना व मार्गदर्शक दिशा त्यामध्यें आहेत.

**१९४९ फेब्रुवारी २१** : श्रीमाताजींच्या मार्गदर्शकत्वाखालीं सचित्र त्रैमासिक Bulletin of Physical Education सुरू. पहिल्या अंकांत श्रीअरविंदांचा 'शारीरिक शिक्षण' या विषयावर संदेशात्मक लेख. पुढील सातहि अंकांतून प्रत्येक वेळीं श्रीअरविंदांचा एकेक संदेशात्मक लेख. अतिमानस, दिव्यशरीर, पूर्णशरीर, विकासक्रम व अतिमानस, मानवविकास व अतिमानस, ज्योतिर्मय मन इत्यादि विषयांवरील हे आठ लेख म्हणजे, त्यांनीं पूर्वींच प्रतिपादिलेल्या नवशक्तीच्या अवतरणाविषयींचें पुनरुच्चारण व दिव्यजीवनाविषयींचें स्पष्टीकरण असून, तद्वारां जगास त्याच्या सत्यतेविषयीं व अटळपणाविषयीं निःसंदिग्ध आश्वासनच आहे—पृथ्वीवरील अतिमानसाच्या अभिव्यक्तीचा तो जणुं तपशीलवार आराखडाच आहे. हे आठहि लेख The Supramenal manifestation upon Earth या नांवानें पुस्तकरुपांत प्रसिद्ध झाले आहेत.

**एप्रिल २४** : चाळीस वर्षांनंतर प्रथमच, सुप्रसिद्ध फोटोग्राफर हेन्रि कार्टिअर ब्रेंसां यांना श्रीअरविंदांनीं स्वतःचे फोटो घेण्यास परवानगी दिली.

**ऑगस्ट ४** : श्रीमाताजींचा अमेरिकेस संदेश. "आपण पाश्चात्य आहोंत व इतर पूर्वेकडील आहेत असें समजणें आतां थांबवा. सर्व मानवप्राण्यांचा एकच दिव्य उगम असून, त्या दिव्य उगमाची मूलभूत एकता अभिव्यक्त करण्यासाठींच त्यांचा जन्म आहे."

**ऑगस्ट ११** : श्रीअरविंदांचा अमेरिकेस संदेशः Messages of Sri Aurobindo and The Mother. series II P. I9-23

**१९५०** : दिव्यजीवन, गीतानिबंध, मानव एकतेचें ध्येय, मानवीय चक्र, योगसमन्वय भा. १ या इंग्रजी पुस्तकांची अमेरिकन आवृत्ति प्रसिद्ध झाली.

**एप्रिल १४** : श्री. क. मा. मुनशी यांना मुलाखत दिली. श्रीअरविंदाच्या ठिकाणीं भगवंताची महान् उपस्थिति दिव्यचेतनेच्या प्रकाशासह, त्यांना अनुभवास आली.

श्री.क.मा. मुनशी यांच्यापाशीं बोलतांना, "भारताचा भौगोलिक दृष्ट्या एकजिनसीपणा—अखण्डत्व-पुनरपि प्रस्थापित होणारच व फ्रेंच वसाहती, लोकमताचा अंदाज घेऊन नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या वाटाघाटींनीं भारतामध्यें विलीन होणार" असें पुनः निश्चयपूर्वक बोलून दाखविलें.

'सावित्री' या, श्रीअरविंदांच्या महाकाव्याचा प्रथम भाग प्रसिद्ध झाला.

**नोव्हेंबर**- क्रीडांगणांतील भिंतीवर श्रीमाताजींनीं स्वहस्तानें अखंड भारताचा आराखडा रेखाटला. त्यावर सिमेंटच्या उठावाचा नकाशा तयार करून मध्यभागीं, भारताच्या आध्यात्मिकतेचें दर्शक असलेलें बारा पाकळ्यांचें, प्रफुल्ल कमळाचें प्रतीक बसविण्यांत आलें.

**डिसेंबर ५** : श्रीअरविन्दांची महासमाधि. रात्रीं १ वाजून २६ मिनिटें. 'अतिमानस तेजानें परिप्लुत झालेला' देह १११ तास त्याच प्रकाशमय स्थितींत राहिला.

**डिसेंबर ७** : श्रीअरविंदांचें श्रीमाताजींस आश्वासन व श्रीमाताजींचें पृथ्वीस आश्वासन.

**डिसेंबर ८** : शरीरांत पुनरपि येण्याविषयीं श्रीमाताजींचें श्रीअरविंदांना आवाहन. त्यावर श्रीअरविंदांचे उत्तर कीं, पृथ्वीवरील पहिल्या अतिमानस देहांत माझें पुनरागमन होईल.

**डिसेंबर ९** : श्रीअरविंदांच्या भौतिक देवशरीरास उद्देशून श्रीमाताजींचें कृतज्ञतादर्शक प्रार्थना-समर्पण. चांदीची किनार असलेल्या, गुलाबाच्या लांकडाच्या पेटींत सायंकाळीं ५

वाजतां देह ठेवण्यांत आला व ती पेटी आश्रमाच्या आंगणांतील 'सेवा' नांवाच्या वृक्षाच्या छायेंत पृथ्वीच्या उदरांत ठेवून देण्यांत आली.

**१९५१ एप्रिल २४** : श्यामाप्रसाद मुकर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं 'श्रीअरविंद स्मारक परिषद' बोलविण्यांत आली. परिषदेचें उद्घाटन करतांना श्रीमाताजी म्हणाल्या–– 'श्रीअरविंद आजहि आपणांमध्यें उपस्थित आहेत. येथें ज्या विद्याकेंद्राची स्थापना होत आहे त्याचें आपल्या निर्माणसमर्थ प्रतिभेनें तेच मार्गदर्शन करीत आहेत. आजच्या मानवजातींतील निवडक व्यक्तींचें ज्यामुळें परिवर्तन होऊन, पृथ्वीवर नवप्रकाश, शक्ति व जीवन अभिव्यक्त करणारा नूतन मानववंश निर्माण होईल, अशा अतिमानस प्रकाशाचा स्वीकार करण्यास भावी मानवजातीला तयार करण्याचें सर्वोत्कृष्ट असें एक साधन म्हणून विद्याकेंद्रकल्पनेस ते कित्येक वर्षांपासून मानीत होते. त्यांच्या अत्यंत प्रिय ध्येयांपैकीं एका ध्येयाच्या परिपूर्तीच्या सिद्धीसाठीं त्यांच्याच नांवानें मी या परिषदेचें उद्घाटन करीत आहे."

या विद्याकेन्द्रासाठीं आर्थिक निधि जमा करण्यासाठीं एक विनंति-पत्रक प्रसिद्ध झालें. त्यावर अनेक भारतीय सुप्रसिद्ध व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या होत्या. त्यांपैकीं कांहींचीं नांवें-एस्. राधाकृष्णन्, क.मा.मुनशी, रं.रा. दिवाकर, तान-युन्-शान्,नंदलाल बोस, हरेकृष्ण मेहताब, आग्रा, अलाहाबाद, मुंबई, गुजराथ या विद्यापीठांचें कुलगुरु, इत्यादि.

याच वर्षी 'सावित्री' महाकाव्याचे भाग २ व ३ छापून प्रसिद्ध झाले. १९५० मध्यें या तिसऱ्या भागांतील बहुतेक सर्व अध्याय श्रीअरविंदांनीं अखंडपणें सांगून लिहवून घेतले होते.

**१९५३ डिसेंबर १०** : शाळेंत १९४३ मध्यें एकंदर ३० लहान बालकें होतीं. तेव्हां-पासून श्रीमाताजींच्या मार्गदर्शनाखालीं या शाळेचा विकास व वाढ होत होत, यावर्षी श्रीअर-विंद आंतरराष्ट्रीय विद्याकेन्द्राचे उच्चश्रेणीचे ८ विषयांचे वर्ग उघडण्यांत आले. आज सर्व शाखांतील एकूण विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या ३६३ आहे. याशिवाय प्रौढांचे निरनिराळ्या भाषाशिक्षणाचे वेगळे वर्गहि आहेतच.

विद्याकेन्द्राचें ग्रंथालय वाढूं लागलें. पुढें आश्रमाचें ग्रंथसंग्रहालय व विद्याकेन्द्राचें ग्रंथालय दोन्ही एकत्रित करण्यांत येऊन, त्यासाठीं घेतलेल्या स्वतंत्र इमारतींत तीं हलविण्यांत आलीं. या ग्रंथालयातर्फे वेळोवेळीं शैक्षणिक व सांस्कृतिक स्वरूपाचीं प्रदर्शनें भरविण्यांत येत असतात.

**१९५४ फेब्रुवारी** : एका मुलाखतींत श्रीमाताजींनीं भारताच्या उज्ज्वल भवितव्याविषयीं व त्यासाठीं भारतसरकारनें कोणतें धोरण ठेवावयास हवें हें बोलून दाखविलें.

**ऑगस्ट १५** : आपण भारताचे नागरिक असल्याचें व आपलें भारताशीं आंतरात्मिक नातें असल्याचें श्रीमाताजींनीं जाहीरपणें उद्घोषित केलें.

**नोव्हेंबर १** : फ्रेंच विभागाचें भारतांत विलीनीकरण झाल्याचा समारंभ. कार्यक्रमांत आश्रमीयांचें संपूर्ण सहकार्य व सहभाग.

**डिसेंबर ३१** : श्रीमाताजींनीं १९५५ च्या नववर्षसंदेशाचे वितरण केलें. त्या संदेशांत उल्लेखिलेल्या भारताच्या व जगाच्या भवितव्याविषयीं श्रीमाताजींचें स्पष्टीकरण. हें वर्ष अति खडतर आहे. पुढील वर्षाच्या प्रारंभींच्या एक दोन महिनेपर्यंत हा कठीण काळ टिकेल पण त्यानंतरचा उज्ज्वल काल अपूर्व असेल.

**१९५५ डिसेंबर ३१** : श्रीमाताजींचा १९५६ चा नववर्ष संदेश—'सर्वांत मोठ्या विजयांचा सर्वांत कमी गाजावाजा असतो. नूतन जगताचा आविष्कार नगारे वाजवून घोषित केला जात नाहीं.'

**१९५६ एप्रिल २४** : 'अतिमानस ही आतां कल्पना राहिली नसून, सत्यवस्तु, वास्तव घटना झाली आहे' अशा अर्थाची श्रीमाताजींची उद्‌घोषणा.

**१९१४ ते १९१८** पर्यंत 'आर्य' मधून धारावाहिक रूपानें प्रसिद्ध झालेले व इतरहि वेदविषयक सर्व लेख On Veda या ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्यांत आले. अतिमानस सृष्टि व अतिमानसशक्तीविषयींची जीं गूढ सत्यें वैदिक ऋच्यांमागें लपलेलीं आहेत, त्यांचा गूढार्थ या ग्रंथामध्यें उलगडून दाखविला आहे. श्रीअरविन्द म्हणतात, "ऋग्वेद वाचण्यापूर्वींच योगाभ्यासाच्या काळांत, मला ऋग्वेदीय सर्व देवतांचें ज्ञान लाभलें होतें." हें पूर्वज्ञान व नंतर अतिमानस लोकाचें झालेलें दर्शन यांमुळेंच वेदमंत्रांतील गूढार्थ त्यांना सुलभतेनें उकलतां आला. आतां हींच सत्यें यानंतर पृथ्वीवर उतरून येथें प्रतिष्ठित व आविष्कृत होणार आहेत. अशा महत्त्वाच्या युगसंधीस हा महत्त्वाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला याला फारच महत्त्व आहे.

(श्री. शिशिरकुमार मित्र यांच्या लेखाधारें कांहीं भर घालून)

समाप्त

---

# सुमधुर समन्वय

पुष्पशय्येवर प्रीतीच्या प्रमाथी-मधुर आलिंगनांत सुखासीन होऊन, ज्यावेळीं मी विश्वविजेत्याचें विराट् ऐश्वर्य उपभोगत होतों, त्यावेळीं वेदनांच्या निर्घृण आघातांनीं तूं मला जागविलेंस, आणि माझा धिःकार करीत तूं म्हणालीस ,"हतभाग्या, झोंपण्यासाठींच कां तूं आलास?"

मदिरेच्या विलासमहलांत, मीनाक्षीच्या तालातालांवर आणि राजलक्ष्मीच्या झंकारांत बेभान होऊन, जेव्हां मी नृत्य करूं लागलों, तेव्हां झंझावाताच्या झणकाऱ्यासरशीं तूं मला उध्वस्त केलेंस अन् म्हणालीस, "घणाच्या घावांनीं तुझ्या या बोजड पत्थरांतून मी एक सुंदर मूर्ति घडविणार आहे."

आणि काय आश्चर्य !—

अभीप्सेच्या उद्‌भासानें माझें अंतर्बाह्य उजळून निघालें.

अज्ञाताचें आवाहन माझ्या रोमरोमांत प्रतिध्वनित होऊं लागलें.

पण—

असीमाच्या ध्यासानें हिमालयाच्या उत्तुंग शिखरावर जेव्हां मी निर्वाणाची वाटचाल

करीत होतों, तेव्हां हृदयांतल्या प्रेमबंधनाच्या हास्योल्लासांतून माझी निर्भर्त्सना करीत तूं म्हणालीस, "छी:, कुठें पळतो आहेस?"

शरीरावर निष्ठुरपणें उपवासाचे कठोर आघात करीत, सह्याद्रीच्या नीरव गुहेंत ज्यावेळीं मी मुक्तीची आराधना करीत होतों, त्यावेळेस प्राणगंगेच्या पवित्र वाणीनें माझा उपहास करीत तूं म्हणालीस, "याचसाठीं कां मी तुला पृथ्वीवर आणलें?"

मी हतबुद्ध झालों. हृदयांतलें सारें कारुण्य एकवटून, द्रौपदीच्या आर्ततेनें मीं म्हणालों, "आई, मला मार्ग दाखव!"

माझ्या चेतनेच्या आकाशांत नवीं क्षितिजें उदय पावलीं.

अव्यक्तांतून अभिव्यक्त होणारी पृथ्वी मी बघितली, शून्यांतून वास्तवतेंत येणारें संपूर्ण सूर्यमंडळ माझ्यापुढें उद्‌भासित झालें, युगानुयुगांचा चिर-उत्क्रांतीचा नवनवोन्मेष मी बघितला आणि मृगचर्मासन व कमंडलू सांवरून जीवनाच्या या हिरवळीवर मी परतलों.

हृदयांत नवीन आशेची व नूतन संकल्पशक्तीची दीपावलि साजरी होत होती, मनाच्या प्रांगणांत अतर्क्यतेची प्रतिभा फुलली होती आणि शरीराच्या अणुरेणूंत इतकी शक्ति संचरली होती कीं, संपूर्ण पृथ्वीला मी हलवूं शकेन असें मला वाटायला लागलें.

प्रणयिनीच्या ज्या दृष्टींत आसक्तीची आग जळते आहे असें पूर्वी वाटायचें, त्याच तिच्या डोळ्यांत निष्पाप प्रीतीचा रासरंग मला दिसला.

संपत्तीच्या कोठारांतून जेथें अहंकाराचा धूर निघायचा, दर्पाचा कुबट वास यायचा, हृदयशून्यतेचा दुर्गंध सुटायचा, तेथूनच महालक्ष्मीचें सौंदर्य व सुसंवादित्व प्रकटत होतें.

महेश्वरीचें प्रशांत ज्ञानगांभीर्य, महाकालीचें विजयी शक्तिसामर्थ्य, महालक्ष्मीच्या मधु-छंदाची आश्चर्यकारक विपुलता व महासरस्वतीचें अपूर्व पूर्णत्व यांना प्रसवणाऱ्या सावित्रीच्या रूपांत तूं आलीस.

तुझ्या या अभूतपूर्व स्वरूपांत चिरद्वंद्वांचें मीलन प्रथमच साकार झालेलें मीं पाहिलें.

शिवाच्या शरीरावर शक्ति नृत्य करूं लागली.

कालीला शिवाचा आधार मिळाला व शंकराला पार्वतीची अभिव्यक्ति प्राप्त झाली. राधाकृष्णाच्या या शाश्वत मीलनांत वृंदावनींची पौर्णिमा फुलें उधळीत होती.

स्वर्ग व पृथ्वी, पुरुष व नारी, संन्यासी व कर्मयोगी, ज्ञानी व भक्त, तपस्वी व गृहस्थी, योग व जीवन, पूर्व व पश्चिम, प्राचीन व अर्वाचीन, व्यष्टि व समष्टि या परस्परविरोधी द्वंद्वांचा सुमधुर समन्वय युगायुगांच्या मंथनांतून पूर्व समुद्रावर स्वयंसिद्ध झालेला असा आज मी पाहिला.

—गजराज

---

अमृतत्वाची प्रकाशधारा झेलण्यासाठीं शरीराचा रोमरोमदेखील तयार झाला पाहिजे. नाहींतर आत्माच केवळ आपल्या मूळ स्थानावर पोहचूं शकेल आणि या बिचाऱ्या अपूर्ण पृथ्वीला तिच्या अनिश्चित दैवगतीवरच सोडून द्यावें लागेल.

—श्रीअरविंद

# श्रीअरविंद् वाङ्मय

(लेखांक ५ वा.)

## श्रीअरविंदांचीं पत्रें

श्रीअरविंदांच्या सर्व वाङमयामध्यें, साधनेच्या दृष्टीनें, योगाचें प्रत्यक्ष आचरण करण्याच्या दृष्टीनें त्यांचीं 'पत्रें' हीं विशेष महत्त्वाचीं आहेत. त्यांच्या पत्रव्यवहाराचे विषय विविध आहेत. योग, तत्त्वज्ञान, साहित्य, कला, गूढविद्याशास्त्र, खगोलशास्त्र, समाजशास्त्र, अंतर्राष्ट्रीय घडामोडींविषयीं प्रश्नोपप्रश्न इ. आध्यात्मिक जीवनाचे जिज्ञासु आणि श्रीअरविंदांचा योग आचरणारे, आश्रमांतील व आश्रमाबाहेरील साधक, आपल्या शंका व अडचणी त्यांच्यासमोर मांडून त्यांचें मार्गदर्शन व साह्य मागत. अनुभव, दृष्टांत, स्वप्नें यांचा अर्थ श्रीअरविंदांनीं स्पष्ट करावा म्हणून तीं त्यांना कळविलीं जात. विद्वज्जन आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील मंडळी त्यांना, त्यांच्या दिव्यजीवनविषयक, तत्त्वप्रणालींतील निवडक मुद्यांवर प्रश्न विचारीत. योगसाधना करीत असतांना, ज्या साधकांना काव्यस्फूर्ति होई, ते आपली काव्य-रचना समीक्षणासाठीं श्रीअरविंदांकडे पाठवीत. कांहीं वेळां, अगदीं ऐहिक घटना किंवा समाजांतील लोकांचीं मतें याविषयीं त्यांनीं आपलें मत प्रदर्शित करावें म्हणून लोक लिहीत. जवळ जवळ सर्व पत्रांना ते स्वतः अत्यंत काळजीपूर्वक उत्तरें देत. कित्येक वर्षें ओळीनें, दररोज[१] प्रचंड पत्रव्यवहारासाठीं त्यांना द्यावे लागत असत. कित्येकदां एकेक दिवशीं शंभराच्या वर पत्रांचा आंकडा जाई. श्रीअरविंदांनीं लिहिलेल्या ह्या पत्रांपैकीं बरींचशीं पत्रें संपूर्ण किंवा त्यांतील कांहीं भाग घेऊन, विविध विभाग करून, त्यांना शीर्षकें देऊन वेळोवेळीं निरनिराळ्या

---

[१]श्रीअरविंदांचे याविषयींचे स्वतःचेच उद्‌गार असे आहेत—"या पत्रव्यवहाराचा व्याप अवाढव्य होत चालला आहे; आणि माझी संबंध रात्र व दिवसाचा बराचसा वेळ त्यासाठीं द्यावा लागत आहे—श्रीमाताजी जें काम करतात तें वेगळेंच; त्यांनाहि दिवसाच्या कामाव्यतिरिक्त रात्रींचाहि बराचसा वेळ काम करावें लागत आहे."

"सर्वसाधारण पत्रव्यवहार व निरनिराळे अहवाल इत्यादींसाठीं मला बारा तास खर्च करावे लागतात. दुपारीं तीन तास व दुसऱ्या दिवशीं सकाळीं सहा वाजेपर्यंत सबंध रात्र, इतका वेळ याकरितां मी काम करतों."

(Sri Aurobindo on Himself and the Mother P. P. 399 and 266.)

पुस्तकांच्या[1] रूपानें प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्यांच्या योगविषयक पत्रांचा विस्तृत संग्रह 'श्रीअरविंद आंतरराष्ट्रीय विद्याकेंद्रमाले' तर्फे नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला.

या लेखांत या योगविषयक पत्रांविषयीं परिचय करून देण्याचा विचार आहे.

पूर्णयोगाच्या साधकांनीं मार्गदर्शनार्थ विचारलेल्या प्रश्नांना किंवा जिज्ञासेला प्रत्युत्तर म्हणून यांतील बहुतेक पत्रें लिहिलेलीं आहेत. आपल्या दैनंदिन साधनेंतील अडचणी अथवा प्रगति, शिष्य गुरुसमोर ठेवीत असत. नंतर त्याचें विवरण, स्पष्टीकरण श्रीअरविंद करीत असत; एवढेंच नव्हे, तर प्राप्त परिस्थितीला तोंड देऊन साधकाला आपल्या प्रगतीचा वेग वाढवितां यावा या हेतूनें लिखित शब्दद्वारां अथवा अन्य मार्गांनीं आपली विशेष मदत देण्यासाठीं ते अशा प्रसंगांचा उपयोग करून घेत असत.

अर्थात् दुसऱ्या साधकांनाहि हीं पत्रें म्हणजे स्फूर्तीचा झरा आणि पथप्रदर्शक दीपाप्रमाणें उपयोगी पडत. श्रीअरविंदांनीं स्वतःच म्हटलें आहे—

"मीं पत्रव्यवहाराला इतकें महत्त्व दिलें असेल तर तें ह्यासाठीं, कीं माझ्या मुख्य हेतु-पूर्तीचें तें एक अत्यंत परिणामकारक साधन होतें—तमोगुणाच्या निद्रेंतून जागे होऊन, आध्या-त्मिक अनुभूतींच्या मार्गावर वाटचाल करण्यास त्यांचा बहुसंख्य साधकांना उपयोग झालेला आहे. या पत्रांनीं दुसऱ्या कांहींना प्राथमिक अनुभूतींच्या संकुचित वलयांतून बाहेर काढून, खऱ्या साक्षात्काराचा त्यांच्यावर पाऊस पाडला आहे. कित्येक वर्षें संपूर्णतः निराश आणि गलितगात्र झालेल्या कांहीं साधकांचें त्यामुळें परिवर्तन होऊन, अंधःकारांतून बाहेर येऊन उषेच्या प्रकाशामध्यें, त्यांनीं पदार्पण केले आहे—ज्यांनीं ज्यांनीं पत्रें लिहिलीं त्यांपैकीं बहुसंख्य लोकांची, या पत्रोत्तरांनीं खरी प्रगति निश्चितच झाली आहे. पत्रव्यवहारानें केवळ नव्हे, तर भौतिक प्रकृतीवर दिव्य-शक्तीचें जें वाढतें दडपण, जो वाढता प्रभाव पडत होता, त्यामुळें हें सर्व घडून येऊं शकलें, यांत शंका नाहीं. पण त्यासाठीं एक माध्यम पाहिजे होतें, त्या माध्यमाचें काम या पत्रव्यवहारानें केलें."

या ठिकाणीं हें सांगावयास नकोच कीं, हीं पत्रांचीं उत्तरें सामान्य बौद्धिक दृष्टिकोनांतून दिलेलीं नाहींत. तीं उत्तरें उच्चतर आध्यात्मिक अनुभूतींतून, ज्ञानाच्या अधिक खोल अशा स्रोतांतून स्फुरलेलीं आहेत. स्वतःच्या अज्ञानाची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तार्किक बुद्धीचे, रात्रीं जागून केलेले ते सायास नव्हेत.

या पत्रांमध्यें दिव्यजीवनाचें उच्च तत्त्वज्ञान प्रतिपादन करणारा दर्शनकार या स्वरूपांत श्रीअरविंदांचें दर्शन आपणांस होत नाहीं किंवा मानवजातीच्या भूतकालीन आध्यात्मिक

---

[1]The riddle of this world : Lights on yoga, More Lights on yoga, Elements of yoga, Letters (I to IV), Life Divine and yoga, Correspondence with Sri Aurobindo (by Nirodvaran I & II Series) On yoga Vol II tome I & II. अर्थातच येवढ्यानें सर्व पत्रें संपलेलीं नाहींत, अजूनहि पत्रांचें संकलन व संपादन चालू आहे. The Advent, Mother India, Annual Nos. of Sri Aurobindo Circle, Bombay. वगैरे, आश्रमाच्या विविध नियतकालिकांतून अजूनहि त्यांतील कांहीं पत्रें प्रसिद्ध होत असतात.

अनुभूतींचें सारसर्वस्व स्वतःमध्यें धारण करून, नवीन शक्तिकेंद्र निर्माण करणाऱ्या पूर्णयोगाच्या साह्यानें, नूतन युगाची ललकारी देणारा मुख्य याजक या स्वरूपांतहि आपल्याला श्रीअरविंदांचें येथें दर्शन होत नाहीं; तर अनंत न्यूनतांनीं भरलेल्या मानवी प्रकृतीचें सर्वोच्च ज्ञान असणारा, मदतीसाठीं आक्रोश करणाऱ्या मानवजातीविषयीं असीम अनुकंपा बाळगणारा, अपार सहनशीलतेनें योगमार्गाच्या चढणीवर साधकाला आधार देण्यास, मार्गदर्शन करण्यास व उन्नत करण्यास सदैव तत्पर असणारा गुरु, आपणांस येथें दिसतो. त्यांनीं लक्ष न देण्यासारखी कोणतीच गोष्ट त्यांना दुर्लक्षणीय नाहीं, कांहींच त्याज्य वा गौण नाहीं ! श्रीअरविंदांचा योग जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करतो; जीवनाचा कोणताच भाग त्याच्या क्षेत्राच्या बाहेरचा नाहीं. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आंतरिक आध्यात्मिक जीवन जगणारांना या पत्रांमध्यें नित्य-जीवनोपयुक्त, सर्वसमन्वयात्मक सर्वग्राही असा अमूल्य ज्ञानठेवा सांपडतो; येवढेंच नव्हे, तर सर्वसामान्य जीवनहि अधिक सुसंवादमय व उन्नत करण्यास अधिकृत मार्गदर्शनहि यांतून मिळूं शकतें.

-२-

प्रत्येक व्यक्तीची आध्यात्मिक विकासप्रक्रिया ही भिन्न असून, ज्या गोष्टी एका साधकाच्या बाबतींत योग्य ठरतील, त्या दुसऱ्याच्या बाबतींत ठरतीलच असें नाहीं, हें खरें असलें, तरी सर्व प्रकारच्या साधनांना पायाभूत अशी कांहीं मूलभूत समान सत्यें असतातच; आणि त्यांतल्या त्यांत एकाच योगमार्गाचें अनुसरण करणाऱ्या साधकांचे बाबतींत तर हें अधिकच खरें आहे. योगप्रक्रियेमधील वैयक्तिक अनुभव विविध व भिन्न भिन्न असले, तरी त्यामागील सामान्य सत्य, सूत्र हें एकच असतें. श्रीअरविंदांच्या पत्रांकडे, पूर्णयोगाचा अभ्यास करणारानें या पार्श्वभूमीवरून पहावयास हवें.

### पूर्णयोगाचें उद्दिष्ट

प्रथमतः, श्रीअरविंदप्रणीत पूर्णयोगाचें उद्दिष्ट तरी काय आहे, तें पाहूं.

पहिलें उद्दिष्ट हें आहे कीं, सामान्य, समर्याद मानवी जाणीवेंतून उन्नत होऊन, उच्चतर, विशालतर दिव्य जाणीव, भागवत चेतना प्राप्त करून घ्यावयाची.

नंतर, ही दिव्य चेतना तिच्या सर्व संपन्नतेसह—तिची शांति, प्रकाश, आनंद, ज्ञान यांसह—आपल्या दैनंदिन, बाह्य जीवनामध्येंहि क्रमाक्रमानें कार्यकारी करून, सामान्य मानवी स्वभावाचें, मानवी प्रकृतीचें रूपांतर दिव्य-प्रकृतीमध्यें, उच्चतर जीवनामध्यें करावयाचें.

या रूपांतराचा, स्वभावपरिवर्तनाचा उद्देश हा कीं, आपल्या जीवनामध्यें भगवंताची अभिव्यक्ति व्हावी. आपली व्यक्तिगत मुक्ति हा या अभिव्यक्तीचा एक भाग, केवळ एक अंग आहे—अर्थात् अनिवार्य असें तें एक अंग आहे. आपल्या जीवनामध्यें भगवंताचा आविष्कार व्हावयाचा म्हणजे दिव्य चैतन्याचा आंतरिक साक्षात्कार होऊन, त्या दिव्य चेतनेचा

प्रभाव, तिची प्रभा केवळ आत्मकेंद्रांतूनच नव्हे, तर अस्तित्वाच्या सर्वांगांमधून, सर्व विभागांमधूनहि प्रसरित झाली पाहिजे, उजळली पाहिजे; इतका अर्थ यामध्यें अभिप्रेत आहे. व्यक्तीच्या अस्तित्वाच्या सर्व भूमिकांवर व्यक्तीचें भगवंताशीं संपूर्ण तादात्म्य हें अंतिम लक्ष्य आहे. मन, प्राण, शरीर, आत्मा हीं सर्वच्या सर्व भगवंताच्या उपस्थितीनें भरून व भारून गेलीं पाहिजेत; आणि विश्वामध्यें भगवच्छक्तीचा स्रोत ओतण्यासाठीं प्रभावी व कार्यक्षम केंद्रें बनलीं पाहिजेत.

दुसऱ्या शब्दांत मांडावयाचें, तर पूर्णयोगासमोर तीन निश्चित ध्येयें आहेत—

पहिलें ध्येय—स्वांतरंगांत भगवंताचा साक्षात्कार—वैयक्तिक साक्षात्कार.

तदनंतर, विश्वामध्यें सर्वत्र भगवंताची अनुभूति वा सर्वमय भगवंताचें दर्शन.

तिसरें ध्येय—वैयक्तिक आणि वैश्विक अभिव्यक्तींच्या अतीत, पलीकडे स्थित असणाऱ्या, परंतु त्या दोन्हींना आधार देणाऱ्या सर्वातीत सत्तेमध्यें अवरोहण—सर्वातीत भगवंताचा साक्षात्कार.

यांपैकीं प्रत्येक साक्षात्कार व्यक्तीनें प्राप्त करून घेऊन, स्वतःमध्यें त्याचा समन्वय साधला पाहिजे. म्हणजे त्या प्रत्येकाचें कार्य व्यक्तीमध्यें होऊन, ईश्वराच्या त्रिविध आविष्करणाचा—वैयक्तिक, वैश्विक, विश्वातीत—चमत्कार घडून येऊन, प्रत्येक व्यक्ति ही तिच्या देवत्वाप्रत पोहोंचेल.

पण, यावर प्रश्न विचारतां येणें शक्य आहे कीं, या योगाचें वैशिष्टच आणि विशेष आवश्यकता अशी कोणती आहे? ईश्वर तर एकच आहे आणि त्याच्याप्रत जाण्याचे मार्ग हजारों आहेत; मग कोणताहि मार्ग स्वीकारला तर काय हरकत आहे? कोणत्या कां मार्गानें होईना, ईश्वराप्रत पोहोंचलें म्हणजे झालें!

## अन्य मार्गांपेक्षां विभिन्नत्व

सामान्यतः सर्व योगमार्गांचें ध्येय 'मुक्ति' हें असतें. जगत् हें क्षणभंगुर आहे, भ्रम आहे; तें संपूर्ण मिथ्या नसलें, तरी अस्तित्वाची एक कनिष्ठ अवस्था आहे*; मर्यादा, असामर्थ्य आणि मृत्यू यांचा कायमचा शिक्का त्यावर बसलेला आहे. म्हणजे प्रबुद्ध मनुष्यापुढें हें प्रमुख ध्येय आहे कीं, त्यानें सुख-दुःख, जीवन-मरण यांच्या चक्रांतून सुटून, त्यांच्या पलीकडील शाश्वत, आनंदमय आणि अनिर्वचनीय अशा स्थितीमध्यें रहावें—मग त्याला ब्रह्मन् म्हणा किंवा निर्वाण म्हणा. परंतु श्रीअरविंदांच्या दृष्टीनें पाहतां, विश्व म्हणजे भगवंताचीच स्वयं-इच्छित निर्मिति वा प्रतिमा असून, स्वयं भगवंताइतकेंच हें विश्वहि-जगत्‌हि-सत्य आहे. सत्य-ब्रह्मावर केलेला तो अध्यारोप नव्हे किंवा ती एक दुय्यम प्रकारची रचनाहि नव्हे. अभि-व्यक्त होणाऱ्या परमेश्वराची, दिव्यत्वाची 'अजूनहि अपूर्ण असलेली', अजूनहि चालू असलेली ती स्वयं-रचना आहे. श्रीअरविंदप्रणीत पूर्णयोगाचें एकमेव ध्येय म्हणजे ह्या भागवत चेतनेचें पृथ्वीवरील विकसन पूर्ण करणें; परमेश्वराच्या संकल्पाची प्रथम व्यक्ति-जीवनामध्यें व नंतर

---

*ख्रिस्ती आदिंच्या धारणेप्रमाणें, पार्थिव जीवन हें, मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या स्वर्गांतील अथवा नरकांतील जीवनाची एक पूर्वतयारी आहे.

सामूहिक जीवनामध्यें परिपूर्ति करणें हें आहे. या उद्दिष्टाच्या स्वीकारानें पार्थिव जीवनाला एक नवीनच अर्थ प्राप्त होतो. कारण श्रीअरविंदप्रणीत योगानुसार, सृष्टीच्या योजनेमध्यें पार्थिव जीवन हें स्वर्गीय जीवनापेक्षां तिळभरहि कमी प्रतीचें नाहीं—येवढेंच काय, तें अधिक महत्त्वाचेंहि म्हणतां येईल.

या भासमान् आणि क्षणभंगुर जगताचा त्याग करणें हें अन्य योगमार्गांचें ध्येय असल्या-मुळें मनोनियंत्रित दैहिक जीवनापलीकडे किंवा त्याहून उच्च स्थानीं आत्म्याचा शोध घेऊन, परमात्म्याच्या विराट् अव्यक्त स्थितींत किंवा निर्वाणांत आपण विरून जावयाचें असा त्यांचा प्रयत्न असतो. म्हणजेच, भगवंताचें जें क्रमशः अधिकाधिक आविष्करण चालूं आहे आणि ज्या आविष्करणामध्यें पार्थिव जीवन हें अत्यंत महत्त्वाचें आहे, त्या दोहोंतून परावृत्त होण्याचा त्या योगमार्गांचा यत्न असतो. पण उलटपक्षीं, अभिव्यक्तीमध्यें आरोहणात्मक क्रमविकास आहे असें पूर्णयोग मानतो. पूर्णयोगानुसार, आत्मसाक्षात्कार करून घेणें महत्त्वाचें व आवश्यक असलें तरी, ती केवळ पहिली पायरी आहे. जीवात्म्याशीं तादात्म्य अनुभवल्यानंतर आपली चेतना विशाल, व्यापक करून, विशालतर विश्वात्म्याशीं तिचें तादात्म्य घडवून आणावयाचें व नंतर त्या विश्वात्म्यालाहि आधार देणारें समग्र अस्तित्वच आत्मसात् करावयाचें, आलिंगा-वयाचें असतें. साधक आध्यात्मिक मनाच्या चढणीच्या पलीकडे गेल्यानंतर, अतिमानसाची पातळी त्याला दिसूं लागते. तेथून अतिमानसाचा प्रांत सुरू होतो. तेथें तो दिव्य ज्ञान, दिव्य सामर्थ्य व दिव्य आनंद यांनीं युक्त असलेल्या प्रभावी अवस्थेंत प्रवेश करतो. दिव्य अस्तित्वाच्या या सत्य वस्तूंमुळेंच, सत्य-अवस्थांमुळेंच पार्थिव जीवनाच्या पूर्णत्वसिद्धीच्या मानवी अभीप्सेला सार्थता येते. आजपर्यंत अभिव्यक्तीच्या पार्श्वभागीं असलेली भगवंताची दिव्य-प्रकृति स्वच्छ प्रकाशांत, समोर आणून तिचा संपूर्ण आविष्कार हीं सत्य-तत्त्वेंच करूं शकतील आणि मानवी जीवनामध्यें दिव्य-सत्य आविर्भूत करण्याची प्रक्रिया सिद्ध करून पूर्णतेस नेतील.

पूर्णयोगाचें उद्दिष्ट निराळें आहे, दिशा भिन्न आहे; नव्हे, कांहीं महत्त्वाच्या तपशिला-मध्यें त्याची प्रक्रियाहि वेगळी आहे. उदाहरणार्थ, साधकाच्या प्रकृतीचें संपूर्ण परिवर्तन, पूर्ण कायापलट व्हावा अशी अन्य योगमार्गांची अपेक्षा नसते. देवोन्मुख झालेल्या आत्म्याच्या अंतर्गत प्रगतीला अडथळा येणार नाहीं किंवा त्याला मागें खेंचणार नाहीं इतपत शांति साध-काच्या स्वाभाविक प्रकृतींत निर्माण झाली म्हणजेच त्यांना पुरेसें असतें. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतरहि बाह्य प्रकृतीकडे विशेष लक्ष पुरविलें जात नाहीं; प्रारब्ध कर्माच्या प्रेरणेनुसार यांत्रिक फेऱ्यांतून ती जात असते आणि आत्म्याला संपूर्णतः स्वतंत्र करून मृत्युसमयीं गळून पडते. परंतु या योगांत तसें नाहीं. प्रकृतीच्या दोन्ही अंगांत, सालस व विनम्र तसेंच बंड-खोर व हट्टी या दोन्ही अंगांत वा भागांत समूळ परिवर्तन झालें पाहिजे, ही या योगाची अपेक्षा आहे. अज्ञानांत रुतलेली ही नौका महान् दिव्य ज्ञानमय महासागरांत स्वच्छंद विहरली पाहिजे. समग्र बाह्य प्रकृति, जड देहापर्यंत सर्वच्या सर्व प्रकृति, इतकी संस्कारक्षम, नमनीय आणि विशुद्ध झाली पाहिजे कीं, प्रकृतिरूपी सदनांत राहिलेल्या दिव्य चेतनेचा तिनें स्वखुषीनें, स्वयंस्फूर्तीनें स्वीकार केला पाहिजे.

शिवाय, या योगामध्यें, जीवनशक्तीचे व्यापार, प्राणशक्तीच्या प्रेरणा, उद्रेक, प्रवाह अडविले जात नाहींत; त्यांचा जोर दडपून टाकला जात नाहीं; किंवा इंद्रियांच्या सुयोग्य

क्रियांवर नियंत्रण घातलें जात नाहीं. त्यांचीं सर्व कार्यें तितक्याच जोरदार रीतीनें पूर्णतया चालूं राहतात. दिव्य सत्याच्या वाढत्या प्रकाशानें, सामर्थ्यानें व आनंदानें परिप्लृत होऊन, तीं उन्नत झालेलीं असतात. जीवन-संन्यासाचा नव्हे, तर तेजस्विता, ओजस्विता व विपुलता यांचा हा 'मार्ग' आहे. वेदांतमार्गानुसार आंतर पुरुषाशीं, भगवंताशीं तादात्म्य पावणें पुरेसें आहे, वैयक्तिक आणि वैश्विक शक्तीशीं प्रभावी एकात्मता ही तंत्रमार्गामध्यें आवश्यक आहे आणि त्यानेंच मुक्ति प्राप्त होते. पण या पूर्णयोगामध्यें दोहींचा संगम झाला आहे. चेतनेमध्यें परम पुरुषाचा साक्षात्कार होऊन, तो बाह्य प्रकृतीमध्यें पोहोंचला पाहिजे. प्रकृतीवरील प्रभुत्वाची 'पुरुषाला' पुनः प्राप्ति होऊन, ते दोघे मिळून त्यांचा मानवी देह उन्नत करून, विकासक्रमाच्या एका उच्च पातळीवर नेऊन सोडतात. (अपूर्ण)

—श्री मा. पुं. पंडित

---

# विद्यार्थी विभाग

(या विभागासाठीं विद्यार्थ्यांनीं आपापलें लेखन पाठवावें. उत्कृष्ट ठरणारा एक लेख एका अंकांत छापला जाईल व त्यास पारितोषिक देण्यांत येईल. लेख सुमारें ७५ ओळींच्या आंत असावा. विद्यार्थ्यानें आपलें नांव, वय व पत्ता घालून कागदाच्या एका बाजूस लिहून, १० जानेवारीपर्यंत लेखन पाठवावें. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनीं प्रश्न विचारल्यास निवडक प्रश्नांचीं उत्तरेंहि देण्यांत येतील. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचें सहकार्य मिळेल अशी आशा आहे.)

# निर्मिति आणि नाश

मुलांनो ! 'निर्मिति म्हणजे काय ?' आणि 'नाश म्हणजे काय ?' हें तुम्हां सर्वांना माहीत आहे ?

सशस्त्र योद्धा कशाचीहि कत्तल, नाश करण्यास उद्युक्त झालेला असतो.

एकादा ज्ञानवान् स्थापत्यविशारद् संकल्पित इमारतीचा आराखडा काढून, त्याबरहुकूम गड्या-गवंड्यांच्या मदतीनें कामाला सुरुवात करतो व शेतकऱ्यासाठीं साध्या झोपड्या आणि राजा-महाराजांसाठीं मोठमोठे महाल उठवितो.

'नाशापेक्षां निर्मिति बरी' हें खरें असलें, तरी देखील पुष्कळदां नाशहि आवश्यक असतो.

मुलांनों ! बळकट बाहु आणि दणकट मनगटें आहेत तुमचीं ! ह्या हातांनीं नुसतीं

निर्मितीच करणार ? कशाचाच नाश नाहीं करणार ? नाश करावयाचा तर तो कशाचा कराल ?

यासंबंधींची एक पौराणिक कथा ऐका.

एकदां एक नुकतेंच जन्मलेलें बालक एका आंब्याच्या दाट छायेंत झाडाखालीं ठेवलेलें होतें. त्याची आई त्याला टाकून निघून गेली होती; तेव्हां तें नक्की मेलें असतें, असें तुम्हांला वाटलें असेल तर ते बरोबर आहे. पण पुढें काय झालें, त्या आमराईंतील 'इलुप्पै' झाडाच्या सुंदर फुलांचा गोड मध ठिबकून त्याच्या तोंडांत पडत राहिला आणि तें मूल जीव धरून होतें.

त्या आमराईच्या जवळच असलेल्या शिवमंदिराकडे पूजेसाठीं एक सती स्त्री त्याच वाटेनें चालली होती, तिला हें मूल दिसलें; तिचें हृदय त्या मुलाकडे पाहून कळवळलें व तें उचलून घेऊन ती आपल्या पतीकडे आली. त्यांना स्वतःचे असें मूल नसल्यामुळें, त्यालाहि खूप आनंद झाला आणि त्यांनीं त्या सांपडलेल्या मुलाचा स्वतःच्या मुलाप्रमाणें सांभाळ केला.

आमराईंत सांपडलेल्या त्या वाटेवरच्या मुलाचें जातगोत माहीत नसतां, त्याला आपल्या मुलासारखें सांभाळायला सुरुवात केलेली पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं त्यांची निंदा आरंभिली. शेजाऱ्यांचा असलेला रोष घालविण्यासाठीं, त्या मुलाला त्यांनीं गुरांच्या गोठ्यांतील तुळ-वटाला टांगलेल्या पाळण्यांत ठेवलें आणि त्याला सांभाळायची सारी जबाबदारी तेथें राह-णाऱ्या अस्पृश्य कुटुंबावर सोंपविली.

कांहीं वर्षांनीं तो मुलगा मोठा बुद्धिमान् व सशक्त झाला. तेव्हां आपल्या मायाळु पाल-कांचा त्यानें निरोप घेतला व एकटाच मुसाफिरीला निघाला. थोडा वेळ चालल्यावर श्रम-परिहारासाठीं तो एका तालवृक्षाच्या खालीं जरासा बसला. आश्चर्य असें कीं, त्या वृक्षा-नेंहि त्याला मोठ्या प्रेमानें सांवली घालून उन्हाचा चटका जाणवूं दिला नाहीं. त्या बागेंतून उचलून घेऊन सांभाळणाऱ्या त्या स्त्रीसारखेंच त्या वृक्षाचें सुद्धां जणुं त्याच्यावर प्रेम होतें. कारण कुणाला खरें तरी वाटेल का कीं, खजुरीच्या झाडानें त्या दमल्या-भागल्या मुलाला दिवसभर एकसारखी सांवली पाडून सांभाळलें असेल म्हणून ? पण असें घडलें मात्र खरें.

हें सारें असें कां घडावें हें तुम्हांला माहीत आहे ? जन्मदिवसापासून त्या मुलाचें एवढें संरक्षण कशासाठीं झालें असावें ? त्या तालवृक्षानें तरी त्याला उन्हाची झळ कां लागूं दिली नसेल ? कारण त्याचें जीवनच तसें होतें अमोलिक ! तोच मुलगा पुढें 'श्री तिरुवल्लुवर' नांवानें 'कुरळ' काव्यकर्ता कीर्तिमान् कवि होणार होता !

खरेंच ! या जगांत कांहीं व्यक्तींची आणि वस्तूंची जपणूक करायलाच हवी असते, कारण त्या जगाला कांहीं अपूर्व संदेश, आदेश देणाऱ्या असतात.

आपण मोठ्या भाग्याचे म्हणून ईश्वरानें आपल्याला दोन दणकट दंड दिले आहेत; कारण जें कांहीं सत्य, शिव आणि सुंदर असेल त्याचें रक्षण करून, विनाश आणि व्याधींपासून त्यांना वाचविण्याचें काम, आपण आपल्या बाहुबळाच्या सामर्थ्यामुळेंच करूं शकतों. या 'सत्य-शिव-सुंदरा' चें रक्षण करण्यासाठीं आपल्याला वेळोवेळीं लढा द्यायला लागतो व जें जें अना-वश्यक व बाधक असेल तें उध्वस्तहि करायला लागतें.

★

तिरुवल्लुवरनें माणसांना अमृताच्या तोडीचें काव्य रसास्वादासाठीं दिलेंच; पण प्रतिस्पर्ध्याशीं दोन हात करून त्याचा निःपात कसा करायचा हेंहि तो चांगलें जाणत होता. त्यानेंच 'कावेरी पाकम्' नांवाच्या गांवातील राक्षसाला यमसदनाला पाठविलें.

'कावेरी पाकम्' गांवीं एक शेतकरी रहात होता. हजारों जनावरें होतीं त्याच्यापाशीं ! आणि खूप मोठा जमीन-जुमला होता त्याचा. त्या खेड्याच्या आसपासच्या टापूंत त्या राक्षसानें अगदीं सळो का पळो करून सोडलें होतें --पोसलेलें पीक मुळासकट उपटायचा; अन् जनावरांना व माणसांना मारायचा. म्हणून गांवकऱ्यांनीं धास्तीच घेतली होती त्याची !

तेव्हां एका संपन्न शेतकऱ्यानें जाहीर केलें कीं, जो वीर या राक्षसाच्या त्रासांतून सर्वांना सोडवील, त्याला मी घर देईन, मोठी जमीन देईन आणि संपत्ति समर्पण करीन.

अनेक दिवसाच्या कालावधींत कोणीहि वीर राक्षसाला ठार करायला पुढें सरसावला नाहीं. तेव्हां त्या शेतकऱ्यानें पर्वत-शिखरावर वस्ती करून राहिलेल्या तपस्वी जनांस शरण जाऊन कांहीं मार्ग दाखविण्यास विनविलें. 'तिरुवल्लुवर' कडे जा, असें त्यांनीं सांगितलें. 'ठीक' असें म्हणून तो त्या तरुण कवीकडे मदतीची याचना करण्यासाठीं गेला. कवीनें आपल्या तळहातावर विभूति पसरून त्यावर 'शिवस्येदम्' असा पवित्र पंचाक्षरी मंत्र लिहून, तोंडानें कांहीं मंत्रोच्चार करून ती विभूति आकाशांत फुंकून टाकली. त्या मंत्राक्षरांच्या आणि मंत्रोच्चाराच्या प्रभावानें तो राक्षस गतप्राण झाला; आणि 'कावेरीपाकम्' नगरीच्या लोकांना अत्यानंद झाला.

त्यानंतर अनेक वर्षांनीं 'तिरुवल्लुवर' मदुरेला गेला. तेथें त्याचें सुंदर काव्य ऐकण्यासाठीं अनेक लोक आले. 'नाहीं जगतीं, अन्य सत्कृति उपकारापरती' अशा काव्यपंक्ति 'कुंजांत सांपडलेल्या' त्या मुलाच्या--तिरुवल्लुवर कवीच्या तोंडून निघतांच श्रोते नागासारखें डोलूं लागले.

तेथेंच, शांत आणि स्वच्छ पाणी असलेलें, फुललेल्या कमळांनीं भरलेलें एक सुरेख सरोवर होतें. त्याच्या कांठीं कांहीं विद्वान् उच्चासनांवर विराजमान् झाले होते. हीन जातीच्या नवागत कवीला आपल्या जोडीला बसविण्याची त्या विद्वानांची मुळींच इच्छा नव्हती. तेव्हां त्याला नको नको ते प्रश्न विचारून त्याला गोंधळवून, त्याचा एकादा तरी दोष काढून, त्याची थट्टा करण्याचा त्यांनीं पुष्कळ यत्न केला; शेवटीं ते म्हणाले, 'अहो नव कवि, आपलें काव्य त्या चौरंगावर ठेवा. आपलें काव्य खरें उच्च दर्जाचें असेल, तर आपल्या 'कुरळा' खेरीज कोणत्याहि साहित्य कृतीला हें पीठ आसरा देणार नाहीं.'

तिरुवल्लुवरानें त्या पीठावर तें पुस्तक ठेवतांच चमत्कार असा झाला कीं, तो चौरंग आकसून इतका लहान झाला कीं, त्याच्यावर फक्त 'कुरळ' काव्यच उरलें. त्यामुळें मदुरेच्या त्या मानी पण मत्सरी विद्वानांचीं मस्तकें लज्जेनें खालीं लवलीं व ते सारे एकदम त्या सरोवरांत फेंकले गेले. ते एकूणपन्नास कवि--दुसऱ्याचें भलें न बघवणारे कवि--त्या सरोवरांत कमळांच्या जाळ्यांत अडकले. नंतर ओलेचिंब झालेलें ते सर्वजण शरमेनें माना खालीं घालून बाहेर आले. त्या दिवसापासून तामिळ भाषिकांना 'कुरळ' काव्याबद्दल अतीव प्रेमादर वाटूं लागला.

*

मुलांनों, आतां सांगा पाहूं, कावेरीपाकम्च्या राक्षसाला मारलें म्हणून तुम्हांला वाईट वाटतें कां ? तसेंच मदुरेच्या एकूणपन्नास विद्वानांना पाण्यांत पडलेलें पाहून, त्यांची फजिती झाली म्हणून, कसेसेंच वाटतें कां तुम्हांला ?

भल्या-बुऱ्या नाना प्रकारच्या वस्तूंनीं भरली आहे ही दुनिया. येथें चांगल्याचा सांभाळ आणि परिपाळ करून वाईटाच्या वाढीला पायबंद व त्याचा विनाश हा केलाच पाहिजे.

त्या विद्वान् तिरुवल्लुवर कवीप्रमाणें, सर्वच सज्जन वागत असतात. तसें करायची त्यांची तयारी असते आणि त्यांच्यांत धमकहि असते. ज्ञान अधिक असलें म्हणजे या कार्यांतील निर्दोषताहि वाढते. एवढेंच काय पण लहान अजाण मुलेंहि, पुरेंसें सामर्थ्य नसलें तरी देखील, अशा थोरांचें अनुकरण करून धैर्यसंपन्न होऊं शकतात.

तिरुवल्लाच्या 'अव्वै' नांवाच्या बहिणीनेंहि आपल्या भावाचेंच अनुकरण केलें.

एकदां 'उराय्यूर' गांवातल्या एका गल्लींत वाटेंतच विसांवा घेत ती बसली होती. त्या वेळींच एक राजा आणि दोन कवि त्याच रस्त्यानें तिच्यापर्यंत येऊन ठेपले. राजा जवळ आला, तेव्हां तिनें आपला पसरून ठेवलेला एक पाय आवरून घेतला आणि त्याच्या बद्दल आदर दाखविला. त्या दोन कवींपैकीं एकजण जवळ आला असतांना, तिनें आपला दुसरा पायहि आदरानें आंखडून घेतला; पण शेवटीं तो दुसरा कवि आल्यावर मात्र तिनें आपलें दोन्ही पाय पुनः पसरले आणि त्याची वाट अडविली.

तिचें हें वागणें म्हणजे उद्धटपणाचें वाटेल; पण आपण काय करीत आहों हें तिला पूर्ण माहीत होतें, तिनें जाणून बुजून असें केलें; कारण तो कवि नांवाचाच कवि होता. प्रतिभेचा लवलेशहि जवळ नसतांना 'कवि' म्हणून म्हणवून घेऊन मोठी घमेंड मारत असे तो ! ती तशी वागली म्हणून तर तो खूपच चिडला व त्याबद्दल त्यानें तिला जाब विचारला; ती म्हणाली—

'काय हो कविराज ! आपण कवि ना ? मग 'बुद्धि' शब्द तीनदां घालून एक कविता करून दाखवा; पाहूं येते कां तुम्हांला ? एवढ्यांत तेथें पुष्कळ लोक जमा झाले. हें पाहून आपली विद्वत्ता दाखवायला ही चांगली संधि आहे, असें त्याला वाटलें. परंतु पराकाष्ठेचा प्रयत्न करूनहि त्याला आपल्या कवितेंत 'बुद्धि' हें पद दोनपेक्षां अधिक वेळां घालतांच येईना. तेव्हां कुचेष्टेनें 'अव्वै' म्हणाली, "कोठें रे बाबा तुझी ती तिसरी बुद्धि गेली, तुला वापरतां नाहीं आलेली दिसत, तुझ्या काव्यांत कुठें आहे ती ?"

असें वर्तन करणें तिला आवडत कां होतें ? मुळींच नाहीं ! पण खोटा अभिमान आदराला पात्र नाहीं असें तिला वाटत होतें म्हणून ती असें वागली. कुणाचा आदर ठेवावा, कुणाला त्याच्या पायरीवर ठेवावें हें ती चांगलें जाणत होती. ती म्हणत असे—सद्गृहस्थहो ! तुम्ही नेहमीं भलेपणाकडे वळा; हंस जसा नेहमीं कमळाच्या ताटव्यांनीं खचून भरलेल्या सरोवराकडेच वळतो त्याप्रमाणें. दुर्गंधानें आकर्षित होऊन घाणत असलेल्या, सडलेल्या पशूच्या रोखानें गिधाडें झडप घालतात, तसें दुष्ट लोक अमंगळ वस्तूंच्या वासावर असतात नेहमीं !

★

बालकांनो ! खरोखरच कोणत्या गोष्टी वाईट आहेत कीं ज्या तुम्ही नाहींशा करायला शिकलें पाहिजे ? कोणत्या गोष्टींवर मनुष्यानें आपला ताबा ठेवला पाहिजे ? कोणत्या गोष्टी

नष्ट केल्या पाहिजेत ? ज्यामुळें माणसाला प्राणनाशाची भीति उत्पन्न होते, त्याच्या उत्कर्षांत अडथळे येतात, त्याचें सामर्थ्य खचतें; एवढेंच काय, ज्यांच्यामुळें त्याचा अधःपात होतो, ज्यामुळें पश्चात्ताप करायची वेळ येते व तो असुखी होतो, त्या सर्व गोष्टी नाहींशा करायला पाहिजेत.

वेगवान् नद्यांवर पूल बांधून, किनाऱ्याच्या प्रदेशांना उध्वस्त आणि उजाड करून टाकणाऱ्या नद्यांना कडेला बांध घालून, पाण्याच्या जोराच्या वेगावर त्यानें नियंत्रण ठेवलें पाहिजे.

निर्माण केली पाहिजेत अशीं जहाजें, ज्यांच्यावर समुद्राच्या भयंकर लाटांचा यत्किंचितहि परिणाम होणार नाहीं.

दलदलीच्या प्रदेशांतील पाणी, पाट काढून घालवून दिलें पाहिजे. पाण्याचा निचरा करून तो भाग कोरडा केला पाहिजे. दमटपणाच्या आणि ओलीच्या आड लपलेल्या रोगराक्षसाचें कंदन केलें पाहिजे.

जंगली जनावरें जिथें जिथें मानवी-जीविताला धोका निर्माण करीत असतील, तिथें तिथें त्यांच्या विरुद्ध शस्त्र हातीं घेतलें पाहिजे.

वैद्यक शास्त्राच्या चांगल्या जाणकार कुशल अभ्यासू वैद्यांनीं या जगांतील सर्व रोगराई, दुखणीं-बाणीं नाहींशीं केलीं पाहिजेत.

उपासमारीचें मूळ दारिद्र्यच ! आपल्या मुलाला पोटापुरतें अन्नहि देतां येत नाहीं, म्हणून आर्तस्वरानें आक्रंदन करतांना माता दिसतात त्या या दरिद्रतेमुळेंच ! म्हणूनच त्याचीं पाळें-मुळें खणून काढायला हवींत.

मानवी-जीवन बेचैन व दुःखी करून सोडणारें, अन्याय, मत्सर व दुष्टबुद्धि, यांचा त्यानें जगांतून नायनाट केला पाहिजे.

★

माणसानें ज्याच्याबद्दल मनांत प्रेम बाळगावें व ज्यांचें रक्षण करावें अशा कोणत्या गोष्टी आहेत ? आपल्याला नवजीवन देत रहाणाऱ्या, आपल्या विकासाला अविरत वाव करून देणाऱ्या आणि आपल्या सुख-संपत्ति-सामर्थ्याची सतत वाढ करणाऱ्या सर्व गोष्टींचें त्यानें रक्षण केलें पाहिजे.

या जगांत जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाच्या बहुमोल जीवनाची जपणूक करायला पाहिजे.

मित्राप्रमाणें छाया व आसरा देणाऱ्या वृक्षराजींना संरक्षिलें पाहिजे.

अन्न व रसास्वादाचा आनंद देणाऱ्या फुलझाडांची व फळझाडांची त्यानें लावणी-राखणी केली पाहिजे.

प्रकृति-स्वास्थ्यास पोषक अशीं मजबूत मोठीं घरें बांधायला पाहिजेत. पवित्र मंदिरें, मूर्ति, तसबिरीं, कलात्मक सुरेख भांडीं, विविध रंगीं वस्त्रालंकार, मनोरंजक काव्यें, सुरेल संगीत—या साऱ्यांचा विशेष लक्ष घालून त्यानें सांभाळ केला पाहिजे. ज्या ज्या वस्तूंमुळें, तिच्यांतील आंतरिक सौंदर्यानें मानवीसुखांत भर पडेल, ती ती वस्तू नीट जपली पाहिजे.

भारतांतील आणि अन्य देशांतील बालकांनो ! या सर्वांपेक्षां श्रेष्ठ अशी एक गोष्ट मनुष्यानें केली पाहिजे. ती ही की—

प्रेमळ अंतःकरण, सत्यनिष्ठ मन आणि निष्ठेनें कर्म करणारा हात यांची त्यानें काळजीपूर्वक जोपासना केली पाहिजे.

—श्रीमाताजी

# प्रेम

—मीं नचिकेताला विचारलें "प्रेम म्हणजे काय ?" यावर तो म्हणाला "दोन जीवांच्या विरहामध्यें होणारें आकर्षण म्हणजे प्रेम नव्हे !"

—"पण या आकर्षणाचें रूपांतर विशुद्ध उत्स्फूर्ततेंत जें करतें, तें 'प्रेम' !"

"भावनांच्या अलोट, प्रचंड, तुफानी लाटा म्हणजे प्रेम नव्हे, पण ह्या तुफानी लाटा ज्याच्यामुळें उत्पन्न होतात आणि जें चंद्रासारखें शीतल असतें तें प्रेम."

"भावसागरांतल्या जहाजांना, अचल दीपस्तंभाप्रमाणें प्रकाश दाखवून जें पथप्रदर्शन करतें तें प्रेम" !

" सहवास म्हणजे प्रेम नव्हे, पण ज्याच्यामुळें सहवासाला प्रेरणा मिळते तें प्रेम !"

"उन्मेषांच्या उच्चतेंत जें प्रकट होतें, तें प्रेम नव्हे, पण ज्याच्यामुळें उच्च उन्मेष प्रकट होतात तें प्रेम !"

"माधुर्य म्हणजे प्रेम नव्हे, पण ज्याला पाहतांच माधुर्य कवटाळण्यास येतें तें प्रेम !"

"माधुर्य हें प्रेमाचें जड स्वरूप आहे!"

"क्षणांत परिवर्तन करणारी ती एक अद्‌भुत वल्ली आहे".

"क्षणांत भगवद्दर्शन देणारी ती एक साधना आहे."

-साऱ्या धर्मग्रंथांच्या हृदयांवर एक संदेश लिहिलेला होता.

-साऱ्या फुलांमधून प्रकटणाऱ्या प्रसन्नतेवर एक संदेश लिहिलेला होता.

-श्रीमातेच्या विशाल नेत्रांतून एकच मूक संदेश प्रकटत होता.

-माझ्या हृदयानें तो वाचला—"**प्रेम**".

—दत्ता बाळ देसाई.
कोल्हापूर.

---

# प्रेरक पत्रें

(१)

प्रिय—

तूं लिहितोस, "मी एक साधारण मनुष्य आहे. तुमच्यासारखा असाधारण मनुष्य नाहीं. या साधारणपणापेक्षां कांहीं तरी विशेष थोर व्हावें, अशी वेडी आशा माझ्या मनांत नाहीं. माझ्या अंगीं तशी शक्ति नाहीं व योग्यताहि नाहीं, हें मला माहीत आहे. म्हणून दहा माणसें जशीं आहेत, तसेंच जीवन मला जगलें पाहिजे."

ठीक आहे. पण मी तुला एक विचारूं कां ? तूं एक सामान्य मनुष्य आहेस, हें तुला सांगितलें कोणीं ? कार्यक्षेत्रांत न उतरतां, कोणत्याहि तऱ्हेची परीक्षा, पारख न करतां स्वतांच्या क्षमतेविषयीं इतकें ठामपणें तूं कसें बोलतोस ? तूं खरोखरीच स्वतांला पूर्णपणें जाणलें आहेस काय ?

तूं उत्तर देशील, "नसेल. पण माझे दोष, माझ्यांतील उणीवा ह्या तर मला स्पष्ट दिसतच आहेत. तेव्हां असा हा दोषपूर्ण प्राणी कसला थोर होतो आहे ! मोठें व्हावयाचेंच, तर तसें होण्याची आधीं आकांक्षा तरी मनांत नको कां ? ती तरी कुठें आहे माझ्यांत ?"

पण, मला स्पष्ट दिसत आहे कीं, तूं स्वतांसंबंधीं गैरसमज करून घेतला आहेस. तुझ्या निराशेच्या मागें आकांक्षाच लपलेली नाहीं कां ? आकांक्षा आहे; पण त्या आकांक्षेला मूर्त स्वरूप येण्याचा संभव तुला दिसत नाहीं, म्हणून ती आकांक्षा तूं दाबून ठेवली आहेस इतकेंच. असें करणें म्हणजे जणुं स्वतःवर रुसून दूर जाऊन बसणें आहे. पण असें दूर बसून हें नैराश्य, हें रुसणें यांचें मुळांत कारण काय आहे तें तूं शोधलें आहेस काय ? तूं स्वतांचे दोष तर निरखले आहेसच; पण तसेच आपल्या अंगीं कांहीं गुण असले तर ते कोणकोणते आहेत हें कधीं पाहण्याचा तूं यत्न केला आहेस कां ? स्वतःच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णयात्मक बोलण्यापूर्वीं स्वतःचे गुणहि पहा; दोषच फक्त पाहूं नकोस. वास्तविक मला तर तुझ्या अंगीं बरेच गुण दिसत आहेत. दोष असले, तरी तुझ्यांत गुणहि नाहींत काय ?

तूं म्हणशील, "कितीसे ते गुण ? समुद्रांत खसखस, त्याचा कसला विचार करावयाचा." ठीक आहे. पण ते खरोखरीच खसखशी एवढे आहेत, कां अधिक आहेत हें पुनः पाहण्यासाठीं तरी तूं सरळ सरळ विचार करशील कां ?

गुणदोष मिळून मनुष्य असतो. दोषांप्रमाणेंच सद्‌गुणांचेंहि भांडार त्याच्यांत असतें. तूं म्हणतोस कीं मी असामान्य आहे; पण तुझ्या वयाचा जेव्हां मी होतो तेव्हां जर तूं मला पाहिलें असतेंस तर खास म्हणाला असतास कीं, "काय हा मनुष्य ! दुर्दैवी बिचारा ! काय होणार याच्या हांतून ?" थोरांचें, असामान्यांचें जीवन तूं तपासशील, तर तुझ्या लक्षांत येईल कीं, कोणीहि मनुष्य जन्मतःच असामान्य असत नाहीं. सर्वच तुझ्यामाझ्यासारखे; गुण-दोष, आशा-निराशा उच्चाकांक्षा व खिन्नता यांचा वास जन्मापासूनच त्यांच्याठिकाणीं असतो. थोरांच्या लहानपणच्या ज्या कांहीं विशेष म्हणून गोष्टी सांगितल्या जातात, त्या माझ्यामतें अतिशयोक्तिपूर्ण असतात. मनुष्य थोर झाल्यानंतर, लहानपणच्या गोष्टींकडे लोकांचें लक्ष जातें. त्यांकडे त्यापूर्वीं कोणाचेंच लक्ष गेलेलें नसतें. तूं पुढें थोर झालास, तर तुझ्याहि लहानपणांतील अशाच गोष्टी लोक सांगतील हें निश्चित; शंकाच नको. यावर तूं म्हणशील, 'सर्वच लोक कांहीं थोर होत नाहींत. कांहींतरी सुप्तशक्ति, पूर्व सुकृत किंवा भगवत्कृपा अशा कांहीं साह्यभूत गोष्टींमुळें थोर लोक थोरपणास प्राप्त झालेले आहेत. पुष्कळ वाळू मिसळलेल्या मातीची शंकरमूर्ति बनणार नाहीं.." पण मी म्हणतो, तुला हें कोणीं सांगितलें, कीं तुझ्यांत सुप्तशक्ति नाहीं; पूर्वसुकृत व भगवत्कृपा कांहींच नाहीं ? तूं म्हणजे नुसती भरभरीत रेती आहेस असें तुला कोणीं सांगितलें ? म्हणूनच मी म्हणतो कीं, स्वतःची ओळख प्रथम करून घे आणि स्वतःला ओळखून घेण्यापूर्वीं संत पॉल याचें वाक्य ध्यानीं धर. तो म्हणतो, "मी कोण आहे हेंच प्रथम मला माहीत नाहीं." बस्स. असेंच म्हणून तूं कार्यारंभ कर. 'मीं स्वतःस

खरोखरी कांहीं जाणलेलें नाहीं. मी साधारण माणूस आहे कां असाधारण माणूस आहे हें मला माहीत नाहीं; तें सर्वांत शेवटीं कळून येईल. तें मी प्रथम शोधणार' असा निश्चय करून, तूं कशा तऱ्हेचा आहेस हें कळण्याकरितां पुनः प्रयोग करण्यास प्रारंभ कर. एखाद्या शास्त्रज्ञाप्रमाणें निर्विकार मनानें, स्वतःची परीक्षा कर, विभाग विभाग पाडून, पृथक्करण करून पहा; दोष पहा, गुण पहा. दोषाखालीं कितीतरी दोष व गुणांखालीं कितीतरी गुण थराथरानें सांचले आहेत ! खरोखर पाहतां, जितके दोष तूं ओढून बाहेर काढून टाकशील, तितकें गुणांचें प्रमाणहि वाढत जात आहे असें तुला आढळून येईल.

कारण मनुष्य हा अतल रत्नाकर आहे. वरून वाळू, दगड, चिखल, कोळसा—असे कितीतरी थर आहेत व एकमेकांत मिसळलेली भर आहे. त्यांना भेदून जसजसें खालीं जावें, तसतसें एकेक रत्न तुझ्या हातीं लागत जाईल. आणखी खालीं गेलास तर, हे इतर थर फार कमी असतील व रत्नेंच अधिक सांपडतील. तूं फक्त वरचें गवत, वाळू, दगड पाहून हताश झालेला होतास. सर्वांच्या ठिकाणींच अशी रत्नांची खाण असते. सगळ्याच खाणींत हिरे असतात असें मी म्हणत नाहीं; परंतु कांहींतरी उपयुक्त असें दुसरें कोणतें एकाददुसरें रत्न तरी मिळतेंच. मनुष्याच्या बाबतींत तें रत्न म्हणजेच त्याचें वैशिष्टय व व्यक्तिमत्त्व असतें. तूं मोठा होणार म्हणजे तूं नेपोलियन किंवा बुद्ध होणार असें मला म्हणावयाचें नाहीं; आणि जरी तसें तुला होतां आलें, तरी तूं तसें व्हावेंस असें मी म्हणणार नाहीं. तसें तूं न व्हावेंस; कारण नेपोलियन किंवा बुद्ध होणें, हा कांहीं माणसासमोर अनुकरणार्थ योग्य असा आदर्श नाहीं. प्रत्येकानें प्रत्येकासारखें, तूं तुझ्यासारखें व्हावेंस, यालाच म्हणावयाचें मोठें होणें.

तूं एक शक्तिपिंड आहेस, हें तर तूं कबूल करशील; आतां तूं जें काय करतोस, किंवा जसा आहेस, त्यापेक्षां, तुला योग्य संधि मिळाली तर, तूं कांहींतरी अधिक करूं शकशील हेंहि तूं मान्य करशील. तुझ्या सर्व शक्तींना पुरेसा वाव मिळत नाहीं, कांहीं ना कांहींतरी राखलेली, अव्यक्त अशी शक्ति तुझ्यांत आहेच. ह्या शक्तीला जाणणें, तिला पुढें आणून कार्यान्वित करणें, तिला जागृत ठेवणें, तुझें जें साधारणत्व आहे, त्याला फुलविणें हेंच तुझें वैशिष्टय. ही जी शक्ति आहे, तिचें जें प्रमाण आहे, तिला तूं कशानेंहि मर्यादित करूं नको. तुझ्यामधील शक्तीची मर्यादा किती आहे, हें तुला माहीत आहे कां ? ही जी तुझ्यामधील निगूढ शक्ति आहे, जें तुझें असाधारणत्व आहे, दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें तर, तुझ्यांतील ही जी दिव्य ऐश्वर्यसंपन्न दिव्य प्रतिभा, स्वयं भगवान् आहे त्याला—आपणांमध्यें असलेल्या या अंतःस्थित शक्तीला—फुलासारखें फुलविणें यालाच म्हणावयाचें 'ईशपदीं आत्मसमर्पण.'

आतां फक्त एकच गोष्ट सांगावयाची. आजकाल 'विनय' या सद्‌गुणाला अत्यधिक महत्त्व दिलें जात आहे. पण विनयशील व्हावयाचें म्हणजे स्वतःला लघुत्व देणें असा अर्थ असेल, तर असला विनय नसलेला बरा. विनयाचा उपयोग काय ? गर्व, अहंकार, दूर करण्यासाठीं विनय हवा. पण गर्व, दंभ, दिमाख या येवढ्याच कांहीं अहंकाराच्या मूर्ती नाहींत. हीं सर्व, अहंकाराचीं राजसिक रूपें आहेत. परंतु स्वतःला हीन, दीन, पापी, पश्चात्तापी, कृमि, कीटक, सर्वांत अधम समजणें हाहि एक प्रकारचा अहंकारच आहे; तमोगुणी

अहंकार एवढेंच. अहंकार म्हणजे 'अहं' कार. म्हणजे 'मी' अशी वेगळेपणाची भावना. हे एवढे माझे गुण व एवढे माझे दोष अशा मर्यादेंत स्वतःला बांधून घेणें, हाच अहंकार. ह्या मूळ अहंकाराला—तो राजसिक वा तामसिक कोणताहि असला, तरी त्याला—दूर सारलें पाहिजे. कारण दोघेहि आपलें सत्यरूप आपणाला दाखवीत नाहींत, आपणासमोर उघडें करीत नाहींत. याशिवाय एक सात्विक अहंकारहि असतो. पण या तिन्हींच्या पलीकडे जायला पाहिजे. कसल्याच प्रकारचा अहंकार नसावा. आत्मसमर्पणाची मात्र जरुरी आहे. तुझ्या विनयाच्या, नम्रतेच्या मागें तमोमय अहंकार आहे. यापेक्षां राजसिक दांभिकता परवडली. कारण 'तम' तुला जडवत् करील. पण रजोगुण तुला निदान सजीव, सचल, आकांक्षावान् व श्रद्धावान् तरी बनवील. फक्त ही आकांक्षा व श्रद्धा शुद्ध करून घेतली म्हणजे झालें. आशा करतो कीं, सर्व तऱ्हेच्या अहंकारलीलेला ओळखून क्रमाक्रमानें त्याचें तूं निरसन करशील, ताब्यांत आणशील व स्वतःच्या आंतर निगूढ भागांत जें सत्य लपलेलें आहे, त्याच्या प्रभावानें, प्रकाशानें तुझें अखिल अस्तित्व प्रकाशमान् होऊन जाईल.

—तुझा.

लेखक :—श्री० नलिनीकांत गुप्त

(अनुवादक :—ज. ना. वेलिंगकर.)

# व्यायाम कां घ्यावयाचा ?

हल्लींचें युग आहे चिकित्सेचें. स्त्री पुरुष, तरुण वृद्ध, गरीब श्रीमंत, शिक्षित अशिक्षित-- यांची कोणत्याहि प्रश्नाकडे अथवा समस्येकडे पाहण्याची दृष्टि बुद्धिवादी असते. प्रत्येक बाबतींत ते कां आणि कसें असें विचारतील. परंतु ही दृष्टि अथवा हा मनाचा कल आज सर्वत्र दिसत असला, तरी प्रत्येक बाबतींत व नेहमींच मनुष्य तर्कनिष्ठ रहात नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. मनुष्याच्या ज्या अनेक शक्ती आहेत, त्यांचा पुष्कळवेळां पाहिजे त्यापेक्षां अगदीं उलटा उपयोग केला जातो असें दिसतें; मनुष्याच्या तर्कनिष्ठ बुद्धीच्या बाबतींतहि असेंच म्हणावें लागतें. अर्थात् ही बुद्धि माणसास सत्याचा मार्ग न दाखवितां, त्याची असत्याशीं गांठ घालून देते. मनुष्याला एकादी गोष्ट करावी अशी इच्छा झाली, म्हणजे मग ती गोष्ट करणें अयोग्य असलें, तरी तिच्या समर्थनार्थ कारणकार्याची मालिका उभी करून, ती गोष्ट करण्यास तो उद्युक्त व्हावयाचाच असें जणुं ठरल्यासारखें झालें आहे. याच्या उलट, एकादी गोष्ट करण्याचें त्याच्या मनांत नसलें म्हणजे त्याकरितां त्याविरुद्ध नाना कारणें तो शोधून काढतो. यावरून सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, मनुष्यामध्यें स्वतःच्या कृतीचें समर्थन करण्याकडे बुद्धीचा उपयोग करण्याची फार प्रबळ प्रवृत्ति आहे; आणि समजा, समर्थनास खरीं कारणें देतां येण्याजोगीं नसतील, तर 'येन केन प्रकारेण' कांहींतरी निमित्त शोधून काढून, मनुष्य आपल्या कृतीचें समर्थन केल्याशिवाय रहात नाहीं.

सरळ व साध्याभोळ्या श्रद्धेच्या बळावर चमत्कार घडण्याचे दिवस आतां गेले. श्रद्धेवर विसंबून राहण्यांतील निर्धास्तता अनुभवण्यास बहुसंख्य लोक असमर्थ झालेले आहेत. कोणत्याहि गोष्टीविषयीं विचार करतांना, त्यांची तर्कनिष्ठ बुद्धि त्या गोष्टीविषयींची उलट-सुलट बाजू तपासून पाहिल्याशिवाय समाधान पावत नाहीं. डोळे झांकून श्रद्धा ठेवण्याच्या काळीं प्रथम प्रथम त्या श्रद्धेचा धागा खऱ्या व उज्ज्वल ज्ञानाशीं जो जोडला गेला होता, तो कालांतरानें तुटला आणि या श्रद्धेच्या साहचर्यानें हेकेखोर मतें, पूर्वग्रह आणि नानाविध लोकभ्रम यांचें पीक उगवलें. त्याला प्रतिक्रिया म्हणून कदाचित् आज दिसणारा हा तर्कनिष्ठ बुद्धीचा वरचष्मा असणें शक्य आहे. तें कसेंहि असो, मनुष्याला आपणासमोरील समस्या सोडविण्यासाठीं, तर्कनिष्ठ बुद्धीपेक्षां आणखी कांहींतरी मिळणें अगत्याचें आहे, एवढें मात्र खरें. त्याला श्रद्धा, ज्ञान आणि तर्कनिष्ठबुद्धि या तिन्हींच्या समन्वयाची मदत पाहिजे आहे. खऱ्या ज्ञानाचा पाया असेल आणि बलवान् श्रद्धेचा पाठिंबा असेल तर मनुष्याला वेगानें प्रगत करणारी, तर्कनिष्ठ बुद्धि ही फार मोठी प्रभावी शक्ति आहे. तसें नसेल तर हीच बुद्धि अज्ञान आणि असत्य यांच्या अधिराज्यास बळकटी आणण्यास कारणीभूत होते व तिचें खरें नियतकार्य करण्यास ती असमर्थ ठरते.

शारीरिक व्यायामाच्या बाबतींतहि पाहतां असेंच दिसतें. शरीर निरोगी व सुदृढ असावें असें वाटत असतांना व त्यादृष्टीनें व्यायामाचा उपयोग आहे हें माहीत असतांना सुद्धां खरोखरीच किती माणसें प्रत्यक्ष व्यायाम घेतात ? नियमितपणें शारीरिक व्यायाम केल्यास, शरीरप्रकृति सुदृढ व निकोप राहते ह्याचें चांगलें ज्ञान त्यांना असतें; पण हें ज्ञान दुबळें

असतें; तें त्यांना व्यायामाचा मनापासून प्रत्यक्ष आचार करावयास लावण्यास असमर्थ ठरतें.

जे लोक शारीरिक व्यायाम घेत नाहींत, ते त्याबद्दल जीं अनेक 'कारणें' देऊन समर्थन करीत असतात, तीं सर्वसामान्यतः अशीं असतात; ते म्हणतात––

१) आमचा तिकडे कल नाहीं आणि त्याची आम्हांला आवडहि नाहीं.

२) आम्ही जें नित्याचें काम करतो, तेंच इतकें असतें कीं त्यांतूनच आपोआप आमचा व्यायाम होतो.

३) नित्याचें काम उरकतां उरकतांच, आम्ही इतके थकून जातो, कीं शारीरिक व्यायामांत भाग घेण्याला आमच्या अंगीं शक्तीच उरलेली नसते.

४) व्यायाम करावयास अगदीं वेळच होत नाहीं आम्हांला.

आतां या प्रत्येक कारणाविषयीं आपणांस कांहीं तोड सांगतां येते कां तें पाहूं. पहिल्या कारणाच्या बाबतींत आपण असें म्हणूं शकतो कीं, केवळ स्वतःची आवड नावड पाहून चालावयाचें म्हटलें, तर मनुष्य कांहीं फारसा प्रगत होऊं शकणार नाहीं. जीवनांत केवळ आवड-नावड ही मार्गदर्शक म्हणून स्वीकारूं, तर एक दिवस असा उगवेल, जेव्हां आपणांस जीवनांत आवडतें असें कांहींच उरलेलें दिसणार नाहीं. सर्वांगीण प्रगति व सर्वांगीण पूर्णत्व-प्राप्ति हा आपला उद्देश आहे, हें ध्यानांत बाळगून, त्या दृष्टीनें आपण जीवनाकडे पाहिलें पाहिजे; तसेंच वैयक्तिक व सामाजिक दोन्हीं दृष्टींनीं जीवनाकडे पाहून, या उद्दिष्टास उपकारक व आवश्यक असें जें जें असेल, त्यासाठीं विलंब न लावतां, प्रत्यक्ष प्रयत्नास लागलें पाहिजे. असें असेल तरच मनुष्याच्या जीवनास कांहीं विशिष्ट ध्येय, कांहीं उदात्त हेतु आहे असें होईल व या उद्दिष्टाच्या परिपूर्णतेच्या मार्गास साह्यभूत होणाऱ्या कोणत्याहि गोष्टीचा आनंदानें स्वीकार करण्यास मनुष्य तत्पर राहील. व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीसाठीं अधिक कुशलतेनें व अचूकपणानें कष्ट करण्यास समर्थ असें शरीर बनविणें म्हणजेच तें निकोप व सुदृढ बनविणें; आणि तें असें बनविण्याच्या नाना उपायांपैकीं नियमित शारीरिक व्यायाम हा एक खात्रीचा उपाय आहे. जीवनधारणेस उपयुक्त व आवश्यक असें अन्न, पाणी, झोंप, विश्रांति, कपडे, नियमित काम, आरोग्यदायक संवयी आत्मसंतोष व आत्मसंयम इत्यादिप्रमाणेंच शारीरिक व्यायामाची संवय जीवनधारणेस अत्यंत उपकारक आहे. शारीरिक व्यायामाच्या बाबतींत, आवडी-नावडीचें निमित्त करून दिरंगाई करणें खचित अदूरदर्शीपणाचें आहे.

आतां दुसरा मुद्दा घेऊं––आम्ही खूप काम करतो, तेव्हां त्यांत व्यायाम हा होतोच हें म्हणणें तितकेंसें बरोबर नाहीं. आतां हें खरें कीं, कोणत्याच प्रकारच्या शारीरिक व्यायामांत कधींच भाग न घेणारापेक्षां, या माणसांकडून शारीरिक कष्ट तरी होतात हें एका दृष्टीनें पुष्कळच बरें आहे; तरीपण हें पुरेसें नाहीं असें म्हणावें लागेल. शारीरिक कष्टाचें काम कधींहि शारीरिक व्यायामाची जागा घेऊं शकणार नाहीं; कारण––

१) कोणतेंहि एकादें कष्टाचें काम शरीराच्या सर्व अवयवांना सर्व प्रकारच्या हालचाली पुरवूं शकणार नाहीं; पण शारीरिक व्यायामाच्या कार्यक्रमाची नीट आंखणी करून ही गोष्ट साधतां येते.

२) शरीराचे सांधे व स्नायू यांच्या सर्वतऱ्हेच्या जास्तींत जास्त हालचाली करण्याची

संधि कोणत्याहि प्रकारचें शारीरिक कष्टाचें काम पुरवूं शकत नाहीं. पण अशी संधि शारीरिक व्यायामामध्यें निश्चितच मिळते. तारुण्याचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें अथवा दीर्घकाळ पावेतों वार्धक्यास अडवून धरण्याच्या दृष्टीनें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. व्यायामामुळें सांध्यांची हालचाल निर्वेधपणें चालण्यास व स्नायूंतील चिवटपणा आणि लवचिकपणा टिकण्यास फार मदत होते. सांध्यांची सुलभ व विनाकष्ट हालचाल आणि स्नायूंचा चिवटपणा या गोष्टी तारुण्यसुलभ असतात; या गोष्टींत कमतरता भासूं लागणें हें वार्धक्य येऊं लागल्याचें चिह्न होय. या बाबतींत शारीरिक व्यायामाची अत्यंत मदत होते.

३) शरीराची योग्य वाढ व विकास होण्याच्या दृष्टीनें पायरीपायरीनें वाढत्या प्रमाणांत केलेल्या व्यायामाचें महत्त्व विशेष आहे. वाढत्या-चढत्या व्यायाम पद्धतीमध्यें शरीरच्या स्नायूंकडून उत्तरोत्तर अधिकाधिक कठीण कामाची अपेक्षा केलेली असते व त्या अपेक्षेप्रमाणें काम करण्याकरितां स्नायूंना उत्तरोत्तर अधिक बलवान्, तत्पर व कुशल व्हावेंच लागतें. नित्याच्या कामामुळें या तऱ्हेनें स्नायू तयार होऊं शकत नाहींत. शरीरकष्टाच्या दृष्टीनें नित्याचें काम कितीहि कठीण असलें, तरी एकदां त्या कामाची संवय झाली म्हणजे शरीराकडून तें काम आपोआप यंत्राप्रमाणें होऊं लागून, मग वाढत्या-चढत्या प्रमाणाचा प्रश्नच तेथें उत्पन्न होत नाहीं. याच कारणामुळें, एखाद्या दुर्बल माणसावर एकाएकीं एकादें शारीरिक कष्टाचें काम येऊन पडलें, तर तें तो हातीं घेऊं शकत नाहीं. पण त्याच दुबळ्या माणसाला जर चढत्या-वाढत्या प्रमाणाच्या व्यायामाची संवय असेल, तर त्यायोगें त्याची शक्ति व कष्ट पेलण्याची तयारी वाढत जाते व तो बलवान बनतो. कारण चढत्या-वाढत्या प्रमाणाच्या व्यायामांत अगदीं साधे सोपे व्यायाम प्रथम देऊन, नंतर हळु हळु क्रमाक्रमानें अधिकाधिक कठीण असे व्यायाम बसविलेले असतात व त्यायोगें हळु हळु शक्ति व चिवटपणा वाढण्यास मदत होते.

४) नित्याचें काम करीत असतां, तें नीटपणें व्हावें म्हणून काम करणाराला आपलें सर्व लक्ष त्या कामावर केंद्रित करणें भाग असतें; तर या उलट, व्यायाम करणारा, आपलें शरीर सुदृढ व्हावें, त्याची वाढ नीट व्हावी म्हणून आपलें सर्व लक्ष शरीरावर केंद्रित करीत असतो. नित्याचें काम करतांना जो व्यायाम होतो म्हणून सांगतात, तो कामाचा एक गौण परिणाम म्हणून असतो; अर्थात् शारीरिक कष्टाचें काम करणाऱ्या माणसाची प्रकृति निकोप रहाण्यास व कोणत्याहि कामास तत्पर असें शरीर राखण्यास त्यायोगें मदत होते यांत शंका नाहीं; परंतु शारीरिक व्यायामांचा एकमेव उद्देश असतो, शरीराची योग्य वाढ व्हावी, तें सुंदर व डौलदार व्हावें व तें सशक्त आणि निरोगी व्हावें; आणि हें काम व्यायामामुळें अखंडपणें व प्रत्यक्षपणें होत असतें.

५) नित्याचें कोणतेंहि काम असो, त्याचा विशिष्ट ठसा वा संस्कार सामान्यतः माणसाच्या शरीरावर पडतोच; पण हें आरोग्याच्या वा शरीर-सौंदर्याच्या दृष्टीनेंहि तितकेसें इष्ट नाहीं. योग्यरीतीनें आंखणी केलेल्या शारीरिक व्यायामांच्या कार्यक्रमानुसार व्यायाम केल्यास, हा संस्कार टाळण्यास किंवा झालेला संस्कार पुसण्यास व शरीराचा डौल, बांधा व आरोग्य टिकविण्यास त्याचा फार उपयोग होतो.

हें तर खरेंच कीं आम्ही, नित्यकर्माचें महत्त्व कमी मानून, तें सोडून द्या व नुसता पुष्कळ

शारीरिक व्यायामच फक्त करा असें निश्चितच सुचवीत नाहीं. "कर्म हें तर भगवंताचें शरीरद्वारां केलेलें उत्तम पूजनच आहे."—कर्म हें आत्मप्रकटीकरणाचें, क्षेत्रच आहे. पण आम्हांला एवढेंच सुचवावयाचें आहे कीं, कांहीं असलें तरी व्यायामाची जागा कर्म घेऊं शकणार नाहीं; कारण जीवनाचा व शरीराचा विकास करण्याच्या कामीं व्यायामाचें महत्त्व स्वतंत्र व विशेष वेगळ्या प्रकारचें आहे.

व्यायाम न करण्याकरितां जें तिसरें निमित्त पुढें केलें जातें, त्याविषयीं सामान्यतः असे म्हणतां येईल कीं, कामामुळें जो थकवा येतो, तो मानसिक व ज्ञानतंतूव्यूहाचा असतो; शारीरिक नसतो. ज्या कामांत शारीरिक कष्टच अधिक आवश्यक असतात, असें काम करावें लागत असेल तर गोष्ट वेगळी; आणि अशावेळीं थकवा आल्यानंतर त्यावर विश्रांति घेणें हाच उत्तम इलाज आहे यांत शंका नाहीं. परंतु सामान्यतः इतके शारीरिक श्रम करावयास लागतील अशीं कामें सर्वांची नसतात; त्यांच्या बाबतींत कामाचा थकवा घालविण्यास योग्य अशा व्यायामांचाच अधिक चांगला उपयोग होतो. योग्य रीतीनें आंखणी केलेल्या व्यायाम-प्रकारांचा अवलंब केला असतां, शरीराचे नाना अवयव, स्नायू व सांधे यांना चांगलेंच काम पडून, त्यायोगें हृदयक्रिया व फुफ्फुसांची क्रिया अधिक जलद व जोरदारपणें होऊं लागते. शुद्ध हवा अधिक प्रमाणांत आंत घ्यावी लागल्यानें व रुधिराभिसरण आधिक्यानें होऊं लागल्यानें शरीरांत जणुं नवशक्तीचा जोरदार प्रवाह खेळूं लागून, शरीराला आलेला आळस व थकवा कोठच्या कोठें नाहींसा होऊन जातो. "कामांत बदल केल्यानें विश्रांति लाभते"असें म्हणतातच. नित्याच्या व्यवसायाचें काम सोडून हें दुसरें—शारीरिक व्यायामाचें—काम केल्यानें मनाला व ज्ञानतंतूव्यूहाला चांगलीच विश्रांति लाभूं शकेल. बैठें काम करणाऱ्यांना, किंवा विद्यार्थ्यांना ही गोष्ट अधिक अनुभवण्याजोगी आहे. त्यांना वाटणारा थकवा पूर्णपणें मानसिक व ज्ञानतंतूव्यूहगत असाच असतो; आणि तो घालविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ज्या व्यायामांत भरपूर शारीरिक हालचाल होते, अशा व्यायामांत भाग घेणें. शिवाय नियमितपणें शारीरिक व्यायाम घेण्याच्या संवयीमुळें शरीराला व शरीरान्तर्गत क्रियांना एकप्रकारची प्रमाणबद्धता व प्राकृतिक स्वस्थता लाभते. शरीराचें सामर्थ्य व सहनशक्तीहि वाढत जाते. असें झालें म्हणजे सहजच अधिकाधिक कामाचा बोजा शरीर सहजपणें पेलूं लागतें व थकवाहि तितकासा लवकर येईनासा होतो; न थकतां पुष्कळ वेळ काम करत राहण्याची क्षमता शरीराच्या ठिकाणीं उत्पन्न होते. शिवाय व्यक्तीचें वय, प्रकृतिमान, शरीरस्थिति, स्वभावविशेष, कामधंदा व मोकळा मिळणारा वेळ या सर्वांना अनुसरून योग्य ठरतील असे कितीतरी व्यायाम-प्रकार प्रचलित आहेत; त्यामुळें प्रत्येक माणसास त्याच्या त्याच्या गरजेनुसार योग्य त्या व्यायामाची निवड करून, त्यापासून भरपूर लाभ करून घेतां येईल.

व्यायाम करण्यासाठीं वेळ मिळत नाहीं असें म्हणणें हें त्याविषयीं गोडी नसल्याचेंच दर्शक आहे. गोडी असेल तर वेळेचें कारण कोणी पुढें करणार नाहीं; कोठूनहि त्याला वेळ काढतां येईल आणि गोडी नसली म्हणजे प्रयत्न करूनहि माणसास वेळ कसला तो मिळणारच नाहीं; हें एका कठोरसत्य आहे. व्यायामाकरितां वेळच नाहीं असें जे म्हणतात, त्यांनीं आपला रोजचा कार्यक्रम प्रामाणिकपणें तपासून पाहिला तर त्यांना दिसेल कीं, खरोखरीच वेळ मिळणें शक्य आहे; कारण अस्थानीं असा कितीतरी वेळ आपण गमावीत असतो.

अतिशय कामांत गुंतलेले जगांतील कित्येक थोर थोर लोक नियमितपणें व्यायाम घेत असून, त्यांच्या नित्याच्या व्यायामामुळें त्यांच्या रोजच्या कामासाठीं त्यांचे शरीर अधिक कार्यक्षम राहत असल्याचा आपला अनुभव ते सांगतात. रोजच्या ठरलेल्या कार्यक्रमांत जरा इकडे तिकडे थोडीशी फिरवाफिरवी करून वेळ काढावयाचें मनांत आणण्याचाच फक्त हा प्रश्न आहे. तसें पाहिलें तर शरीराच्या तन्दुरुस्तीस आवश्यक व पुरेसा म्हणजे दहा-पंधरा मिनिटांचा वेळ कोणालाहि सहज बचत करून मिळवितां येणें शक्य आहे. खरोखरीच इच्छा असेल तर मार्गहि सांपडेल.

नियमितपणें व्यायाम घेणें विद्यार्थीवर्गास व वाढत्या वयाच्या तरुण वर्गास अत्यंत महत्त्वाचें आहे. नियमित व्यायाम घेण्याच्या संवयीनें त्यांचें शरीर सुदृढ व निरोगी राहील, शरीराची वाढ चांगली व प्रमाणबद्ध होण्यास त्याची मदत होईल, येवढेंच नव्हे तर जीवनामध्यें एकंदरींत सर्वच दृष्टींनीं त्यायोगें समतोलपणा राखला जाईल. सर्वसामान्यत: असें दिसतें कीं, तरुणांच्या अंगीं जोम व शारीरबल भरपूर असतें. त्यापैकीं फारच थोडा भाग, नित्याचा कार्यक्रम आणि अभ्यास यांत खर्च होऊन, पुष्कळच शक्ति व उत्साह शिल्लक असतो. ह्या संचित शक्तीला व उत्साहाला कोठून तरी वाट करून देणें अगत्याचें असतें. त्याला वाट न मिळाली तर त्याचे अनेकश: विभाग होऊन जातील किंवा त्याचा दुरुपयोग होऊं लागून कांहीं अनिष्ट संवयी जडतील, अनिष्ट गोष्टी कराव्याशा वाटूं लागतील. अर्थात् त्या शक्ति-उत्साहाला योग्य ती वाट न मिळाल्यानें कुचंबणा होत असल्याची भावना वाढत जाईल किंवा एकंदरच शारीरिक आणि मानसिक समतोल कायमचाच बिघडून बसण्याचीहि बरीच शक्यता राहील. सर्वांत चांगला उपाय म्हणजे या अधिक सांचलेल्या शक्तीचा उपयोग आपल्या अन्य क्षेत्रांतील प्रगतीच्या कामीं करावयाचा. या दृष्टीनें पाहतां तरुणवर्ग व वाढत्या वयाचीं मुलें यांना, शक्तीला काम द्यावयाचें तर खेळ, चढाओढी व शारीरिक व्यायामासारखें दुसरें कोणतेंच अधिक चांगलें काम नाहीं. यायोगें त्यांचें शरीर व मन समतोल अवस्थेंत राहील, प्रकृति सुधारेल, शरीर डौलदार बनेल, एकप्रकारचा रुबाब व उमदेपणा अंगीं येईल व पुढील जीवन यशस्वी होण्यास त्याची फार फार मदत होऊं शकेल.

नियमितपणें, योग्य आंखणी करून व योग्य निवड करून व्यायाम घेतल्यानें इतरहि फायदे होतात—

१) व्यायामानें रुधिराभिसरणाची गति वाढते. जेव्हां हें अभिसरण मंद होतें, तेव्हां निरनिराळीं शरीरदु:खें, वेदना व अस्वस्थता शरीरांत उत्पन्न होतात; पण या सर्वांचा निरास व्यायामानें होतो.

२) मोजक्या प्रमाणांत नियमितपणें व्यायाम घेतल्यानें, शरीरान्तर्गत नाना अवयवांचीं कार्यें सुधारतात व तीं सुदृढ व बलवान् होण्यास मदत होते. यायोगें सर्व अवयव व ग्रंथिव्यूह अधिक कार्यक्षम झाल्यानें अर्थातच प्रकृति निकोप, सुदृढ, उत्साहपूर्ण बनते. मनुष्य खरा जवान बनतो.

३) शरीरांतील निकामी पदार्थांचा निकाल करण्याच्या कामास व्यायामामुळें मदत होते. अशुद्ध व निकामी वस्तू शरीरांतून योग्यवेळीं बाहेर निघून गेल्या नाहींत, तर तें नाना रोगांना आमंत्रणच असतें हें सर्वांनाच माहीत आहे.

४) शरीरांतील लॅक्टिक ॲसिड्स (दुग्धाम्लें) व शरीरास थकवा आणणारे इतरहि पदार्थ व्यायामामुळें शरीरांतून नाहींसे होतात.

५) व्यायामामुळें शरीरांत कांहीं भुका जणुं निर्माण होतात व त्या पुरविण्याच्या प्रयत्नांत असतां, त्यायोगें शरीरस्थिति उत्तरोत्तर अधिकाधिक सुधारत जातेः—व्यायाम करीत असतांना स्नायूंच्या जोरदार हालचाली होतात व त्यायोगें असंख्य पेशी चुरडून जातात. नंतर विश्रांतीच्या व झोंपेच्या वेळांत त्या सर्व पेशी पुनः नव्यानें पुनर्घटित होतात. या पुनर्घटनेस व्यायामाच्या योगानें अधिक सुधारलेल्या रुधिराभिसरणाचें व योग्य प्रमाणांत होऊं लागलेल्या पोषणक्रियेचें साह्य होऊन, पुनर्घटित पेशी पूर्वीपेक्षा अधिक बलवान् व पुष्ट अशा बनतात; अशारीतीनें शारीर स्थिति सुधारते.

६) व्यायामाचे योगानें शरीरस्थ सर्व स्नायूंवर ताबा मिळतो. निरनिराळ्या अवयवांचे ठिकाणीं तत्क्षणीं प्रतिक्रिया देण्याची क्षमता येते. निरनिराळ्या अवयवांच्या क्रियांतील परस्परावलंबी संबंध सुधारून त्यांत एकप्रकारचा समतोल निर्माण होतो. सबंध शरीरालाच आपल्या इच्छेच्या अनुरोधानें वर्तन करण्याचें शिक्षणच जणुं व्यायामानें मिळतें. धोक्याच्या प्रसंगीं एका क्षणांत योग्य ती प्रतिक्रिया देऊन, स्वसंरक्षण करण्याची क्षमता शरीराचे ठिकाणीं उत्पन्न होते.

७) शारीरिक व्यंगें अथवा कांहीं बाबतींतील अक्षमता घालविण्याच्या कामीं, क्रमवार स्वरूपाच्या व्यायाम-प्रकारांचें चांगलें साह्य होऊं शकतें. व्यायामाबरोबरच शेकणें व मर्दन यांच्या समवायी उपचारानें पुष्कळ व्यंगें दूर होऊं शकतात.

८) प्रथम आजारी पडावयाचें आणि मग त्यासाठीं नाना तऱ्हेचे उपाय अंमलांत आणा-यचें, त्यापेक्षां शरीर निरोगी स्थितींत असतांनाच, योग्य असा व्यायाम घेत राहणें व आरोग्य-वर्धक संवयी लावून घेणें हें अधिक शहाणपणाचें आहे. अर्थात् क्रमवार स्वरूपाच्या व्यायाम-प्रकारांच्या अवलंबनानें रोगी शरीरालाहि निरोगता प्राप्त होते ही गोष्ट खरी आहेच; तथापि जर मनुष्य नियमितपणानें व्यायाम घेत राहील व आरोग्यास पोषक अशा संवयी कांटेकोर-पणानें कायम ठेवील, तर शारीरिक अस्वास्थ्य टाळण्याच्या कामीं तो चांगला यशस्वी होऊं शकेल. रक्तशुद्धि आणि सुधारलेलें व वाढलेलें रुधिराभिसरण यामुळें मूत्रपिंड व यकृत् यांचें कार्य अधिक चांगलें होऊन, त्यायोगें पुनः रक्तांतील विषसमान पदार्थ गाळले जाऊन तें अधिक शुद्ध होतें; मूत्रपिंडाचे व यकृताचे रोग होण्याचा संभव बराच दूर होतो. व्यायामानें हृदयाची शक्ति वाढते, वाहिन्यांचा लवचिकपणा कायम राहतो; यायोगें हृदयविकार व तत्संबंधीं इतरहि विकार होण्याचें टळतें.

९) व्यायामानें शरीराला एक प्रकारचा नवीन बदल वाटतो, ताजेतवानें व उत्साहपूर्ण वाटतें. व्यायामानें शुद्ध झालेलें रक्त जलद गतीनें सर्व शरीरांत खेळूं लागलें, म्हणजे मेंदू व इतर अवयवहि ताजेतवाने होतात व त्यामुळें मनाला हुषारी वाटूं लागते; तें उल्हासित, आनंदी व दक्ष बनतें.

१०) योग्य आंखणी करून व्यायाम घेतल्यानें सुधारलेली शारीर प्रकृति व स्वास्थ्य या-मुळें शरीरांत व मनांत एकप्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होण्यास मदत होते. कोणत्याहि प्रकारच्या कार्यांत अशातऱ्हेच्या आत्मविश्वासाचें महत्त्व विशेष असतें.

तरी, आतां आपण सर्व, लहान व थोर शारीरिक व्यायाम घेण्यास प्रारंभ करूं या. आपापल्या व्यवसायास अनुरूप अशा व्यायाम-प्रकारांची निवड करून, त्यांच्या नियमित अभ्यासानें आपल्या संबंध जीवनासच आरोग्य, शक्ति व आनंद यांचें प्रदान करूं या.

—प्रणवकुमार भट्टाचार्य

---

# साहित्य-सत्कार

१) Yoga-Kundalini Upanishad with notes by Swami Shivananda P. 96 Price: 1-50 n. p.

२) Autobiography of Swami Shivananda

(Publisher: Yoga-Vedant forest Academy Rishikesh)

पारंपरिक प्रचलित १०८ उपनिषदांपैकीं बहुसंख्य उपनिषदें वेदांताधिष्ठित आहेत. कांहीं शारीर-विज्ञान विषयक, कांहीं मंत्रविषयक, तर इतर कांहीं ध्यानविषयक आहेत असें म्हणतां येईल. कित्येक उपनिषदांत योगाच्या शारीर-मनोवैज्ञानिक (Psycho-Physical) प्रक्रियेचें तंत्र सविस्तरपणें विवरलें आहे. योग-कुंडलिनी उपनिषद् हें योगोपनिषदाच्या या वर्गांत पडतें. कृष्ण यजुर्वेदाचें तें एक अंग असून, त्यामध्यें तीन प्रकरणें आहेत. कुंडलिनी-योग हा त्यांतील प्रधान विषय आहे हें नांवावरूनच स्पष्ट होत आहे.

निरनिराळे इंद्रिय-संस्पर्श (Sensations) घेऊन, ते **संस्कार** व **वासना** यांच्या रूपानें मनाच्या ज्या भागांत स्मरणांत सांठविले जातात, त्या भागाचें-चित्ताचें पृथक्करण सुरुवातीस केलें आहे. या उपनिषदानुसार या वासना आणि **प्राण** हे चित्तवृत्तींना, चित्ताच्या क्रियांना कारणीभूत असतात. वासना आणि प्राण हे एकमेकांशीं संबंधित व एकमेकांवर अवलंबून असल्यामुळें, अर्थातच एकावर संयम साधल्यास दुसऱ्यावरहि ओघानेंच संयम साध्य होतो. प्राणाचें नियंत्रण आणि नियमन करतां आलें, तर वासनाहि ताब्यांत ठेवतां येतात, चित्तवृत्ती स्थिरावतात, चित्त निश्चल होतें. ही सुस्थिर निश्चलावस्था साध्य होण्यासाठीं हें उपनिषद् त्रिमुखी पद्धति सांगतें.

**१ मिताहार**—मोजकें, हलकें, प्रकृतीस मानवणारें व पुष्टिदायक अन्न घ्यावें. अन्नाच्या आधिक्याचा शरीरावर उगीच ताण येऊं देऊं नये. द्रव व घन अन्नाचें समतोल प्रमाण राखून पोटांत थोडी तरी जागा नेहमीं रिकामी ठेवावी.

**२ आसन**—पद्मासन आणि वज्रासन ह्या दोन आसनांचा या उपनिषदानें विशेष पुरस्कार केलेला आहे. त्यायोगें संवेदनाक्षम शक्तीच्या प्रवाहाचे शरीरांतील अभिसरण सुधारून, शरीरास एक प्रकारचें सुखकर स्वास्थ्य लाभतें.

**३ शक्ति-चालना**—पृष्ठवंशाच्या तळाशीं सुप्त असलेल्या कुंडलिनी शक्तीस जागृत करून चाळविणें. त्यासाठीं नाभीच्या पश्चिम भागीं असलेली सरस्वति नाडी क्रियाशील करण्याची

जरूरी आहे असें या उपनिषदाचें म्हणणें आहे. ठराविक वेळेपर्यंत पूरकाचा अवधि दीर्घ करण्यानें ही सरस्वति नाडी क्रियाशील होते. पूरकानंतर पोटाच्या स्नायूंचे विशिष्ट पद्धतीनें आकुंचन केल्यानें, कुंडलिनी शक्तीवर आघात होऊन ती चावळते. हीं प्रसरणाकुंचनें उजव्या बाजूकडून डाव्या बाजूकडे अशीं एकसारखीं करीत राहिल्यानें, जागीं झालेली कुंडलिनी शक्ति वर चढत चढत जाऊन, शेवटीं सुषुम्ना नाडीच्या तोंडांत प्रवेश करते.

कुंडलिनी शक्तीस जागृत करण्याच्या बाबतींत प्राणायामाचाहि बराच उपयोग होत असतो; त्यामुळें प्राणायामासंबंधानें या उपनिषदांत सुदीर्घ विवेचन केलेलें आहे. त्याचा थोडक्यांत निर्देश असा करतां येईल :––

गुदद्वाराजवळील स्नायु आकुंचित करून घेतल्यामुळें **अपान वायूची** अधोदिशेकडील गति अडविली जाते; नंतर त्या वायूस ऊर्ध्वदिशेकडेच वळावें लागतें. हा वायू नाभीप्रदेशांतील अग्नीजवळ पोंचतांच त्या अग्नीचें ज्वालेंत रूपांतर होतें. हा अग्नि आणि तप्तवायू, वरून खालीं येत असलेल्या प्राणाला मिळतात व सर्व मिळून अधोदिशेकडे वेगानें सरकूं लागतात. यामुळें शरीरामध्यें इतकी उष्णता निर्माण होते कीं, त्यायोगें सुप्त कुंडलिनी खडबडून जागीं होऊन उठते व फूत्कार करीत करीत ताठ उभी राहून सुषुम्नेच्या ब्रह्मद्वारनामक रंध्रांत प्रवेश करते. सुषुम्नेंत कुंडलिनीचा प्रवेश होतांच, प्राण आपणहून कुंडलिनीस सामील होऊन मनास निश्चलावस्था प्राप्त होते. ती स्थिर झाली असतां तिलाच आपण उन्मनी अवस्था म्हणतो. या जागृत कुंडलिनीशक्तीस अभ्यासानें पायरी पायरीनें मेरुदंडामधील एकेका ज्ञानतंतुकेंद्रांतून––चक्र अथवा कमळांतून––नेत नेत शेवटीं डोक्यामधील सर्वांत उच्च असलेल्या सहस्रार कमळांत स्थिर करतां येतें. तेथें स्थिर झाल्यावर साधकावर आनंद-वर्षाव होतो. या स्थितीस वरचेवर जाण्याच्या सतत अभ्यासानें अशी एक अवस्था प्राप्त होते, जीमध्यें असतांना देहभान नष्ट होऊन, केवळ दिव्यानंदानुभवच उरतो. देहभावना आणि व्यक्तिगत चेतना यांतील संबंध कमी कमी होत, शेवटीं तो पूर्ण तुटून, देहपात होऊन साधक मुक्त होतो.

या कुंडलिनी योगाच्या अभ्यासामुळें शरीरावर अतिशय ताण पडतो ही गोष्ट खरी. त्यामुळें ज्या कांहीं अनवस्था शरीरास भोगाव्या लागतात, त्या म्हणजे योगमार्गांतील प्रगतीच्या खुणा अथवा आवश्यक गोष्टी आहेत असें मानण्याकडे कांहींची प्रवृत्ति असते; पण ती बरोबर नाहीं. कारण योगाभ्यास करीत असतांना जे रोग झालेले दिसतात, त्यांच्या कारणांची वेगळीच यादी या उपनिषदांत दिली आहे; ती अशी: दिवास्वप्न, जागरण, वीर्यनाश, सामान्य-जनसंपर्क, मलमूत्रावरोध, कदान्न भोजन, प्रयास-प्राण, चिंतन (मानसिक ताण) इत्यादि.

कुंडलिनी-योगाभ्यासाची एक सर्वसामान्य पद्धति ठरलेली असली, तरी व्यक्ति विशेषा-नुसार वेगवेगळ्या प्रक्रिया व अभ्यासप्रकार अभ्यासिले जातात. या उपनिषदाच्या दुसऱ्या प्रकरणांत वर्णिलेली '**खेचरी मुद्रा**' ही अशीच एक भिन्न प्रकारची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेस 'लंबिका योग' अशीहि संज्ञा आहे. या प्रक्रियेंत, छेदन आणि दोहन या दोन क्रियांचा अंतर्भाव असतो.

जबड्याच्या खालच्या बाजूस जेथें जीभ मांसल भागानें जोडलेली असते, त्या संधिभागीं दर आठवड्यास तीक्ष्ण शस्त्रानें केंसासारखा सूक्ष्म छेद घेऊन, त्यावर हळदीची पूड दडपावयाची;

असें सहा महिने चालवावयाचें. त्यानंतर गाईची धार काढतांना आंचळें ओढतात त्याप्रमाणें जीभ लांबविण्यासाठीं जिभेस लोणी लावून तिचें दोहन चालवावयाचें. जिभेची लांबी पुरेशी वाढल्यानंतर ती मागें वळवून, अन्नद्वारापर्यंत मागें नेऊन नाकाच्या मागील पडद्याच्या बाजूनें ती डोक्याच्या दिशेनें लांब पसरवितांच श्वासोच्छ्वास आपोआपच बंद होतो.

ज्यांची जीभ स्वभावतःच अधिक लांब आहे, त्यांना छेदनक्रियेची फारशी जरूर पडत नाहीं. खेचरी विद्येच्या योगानें साधकास ज्या नाना शक्ती प्राप्त होतात त्या अशा : आकाशगमन, जमिनी-खालीं जिवंत राहणें इ० या खेचरी विद्येच्या साधनेचा स्वतंत्र मंत्रहि––मेलन मंत्रहि––आहे.

या मुद्रेला 'खेचरी' असें म्हणतात त्याचें कारण, ध्यानबिंदु उपनिषदांतील ८२ व्या श्लोकांत दिलेलें आहे. खेचरी अवस्थेंत असतांना, चित्त खे म्हणजे आकाशांत व चर म्हणजे विहरत असतें; त्याचप्रमाणें घशाच्या पोकळींतून वरच्या बाजूस कवटीच्या तळाशीं असलेल्या भोंकांत (खे) जिह्वा प्रवेश करते; या दोन्ही अर्थानें या मुद्रेस खेचरी असें नांव दिलेलें आहे.

शक्ति-चालन करण्यासाठीं उपयोगी पडणाऱ्या नाना प्रक्रियांच्या वर्णनानंतर सर्व योगांचा एकमेव उद्देश काय आहे याविषयींचें कथन या उपनिषदांत केलें आहे. एकमेव चेतनाशक्तीच्या नाना अवस्थांतून जात जात, एकमेव अखंड सच्चिदावस्था प्राप्त करून घ्यावयाची हें सर्व योगांचें ध्येय असल्याचें या उपनिषदांत प्रतिपादिलें आहे. या नाना अवस्था व्यक्तीमध्यें **विश्व, तैजस व प्राज्ञ** या रूपानें व्यक्त होत असून, विश्वामधील त्यांची अभिव्यक्ति **विराट्, हिरण्यगर्भ व ईश्वर** या नांवानें प्रसिद्ध आहे.

हें उपनिषद् शेवटीं उपसंहार करतें––अशब्द, अस्पर्श्य, अरूप व अव्यय असें एकतत्त्व शिल्लक उरतें.––तोच रस, जो शाश्वत व गंधहीन आहे, ज्याला आदि अंत नाहीं, जो महतो महान् आहे, जो ध्रुव आहे, अमल आहे आणि निरामय आहे.

अद्वैत वेदान्ताच्या उद्दिष्टास पोंचण्यासाठीं तांत्रिक योगाचा कसा उपयोग केला जाई तेंहि या उपनिषदांत जातां जातां सांगितलें आहे.

या उपनिषदास स्वामीजींनीं लिहिलेली प्रस्तावना व दिलेल्या टीपा फारच उपयुक्त व मार्गदर्शक आहेत. अधिकारी गुरूची सक्रिय मदत आणि प्रत्यक्ष मार्गदर्शन असल्याखेरीज, अननुभवी व्यक्तीनें ह्या योगाचें आचरण करण्याचें धाडस करूं नये, ही जी सावधगिरीची सूचना त्यांनीं केली आहे, ती आवश्यक आणि स्वागतार्हच आहे.

या आवृत्तीमध्यें संपूर्ण मूळ संस्कृत उपनिषद् दिलें असून, प्रत्येक श्लोकाचा मोकळा अनुवादहि समाविष्ट केला आहे. हें प्रकाशन अत्यंत उपयुक्त आहे. ––मा०पुं०पंडित.

२) Autobiography of Swamy Shivananda

ऋषिकेशाच्या स्वामीजींनीं स्वतःचें लिहिलेलें हें आत्मचरित्र. स्वामी सदानंद सरस्वति यांनीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें खरोखरीच मानव-निर्मित प्रस्तुत-अप्रस्तुतेच्या किंवा औध्दत्य-लीनता इत्यादि कल्पनांच्या बंधनापासून हें आत्मचरित्र अलिप्त आहे. आपल्या पूर्वाश्रमांतील घटना तसेंच दुःखी मानवतेच्या उद्धारार्थ चालू असलेलें आजचें जीवन यांचा आढावा निःसंकोचपणें व उघड उघड रीतीनें त्यांनीं घेतला आहे. ऋषीकेशच्या आश्रमांतील व्यवहार करतांना व तेथील व्यक्तींशीं वागतांना स्वामीजी किती सहानुभूतीची भूमिका घेऊं शकतात, हें तद्विषयक प्रकरणांतून स्पष्ट होत आहे. —मा.पुं.पंडित.

# आश्रम-वृत्त

या तिमाहींतील एक विशेष घटना म्हणजे आश्रमाच्या दिल्ली शाखेतर्फें राष्ट्रपति भवनास सादर करण्यांत आलेलें श्रीअरविंदांचें तैलचित्र. राष्ट्रपति भवनाच्या आर्ट गॅलरीमध्यें सुप्रसिद्ध व्यक्तींच्या तैलचित्रांमध्यें श्रीअरविंदांचें तैलचित्र नव्हतें. ही गोष्ट राष्ट्रपतींच्या लक्षांत आणून दिली असतां, आश्रमाच्या दिल्लीशाखेकडून तें मिळूं शकेल काय असें त्यांनीं विचारलें. तेव्हां आश्रमांतील कलावंत श्री. प्रमोदकुमार चटर्जी यांना श्रीमाताजींनीं समुचित असें तैलचित्र काढण्यास सांगितलें. श्री. प्रमोदकुमार यांनीं श्रीअरविंदांना राष्ट्रीय चळवळीच्या काळांत पाहिलेलें होतें. त्यावेळच्या एका फोटोवरून त्यांनीं अगदीं हुबेहुब व भव्य तैलचित्र रंगवून दिलें. १५ ऑगस्ट १९५९ रोजीं तें राष्ट्रपति भवनास सादर करण्यांत आलें. उपराष्ट्रपति राधाकृष्णन्, पंतप्रधान पंडित जवाहरलाल आणि शिवाय डॉ. सी.डी.देशमुख, डॉ.के.सी.रेड्डी. श्री. सुरेंद्रमोहन घोष, डॉ.बापूजी अणे. श्री.विश्वनाथ दास इत्यादि मंडळी उपस्थित होती. सर्वांचा मिळून लहानसा ध्यानाचा कार्यक्रम व श्री-अरविंदांना उद्देशून एक स्तोत्रगीत होऊन समारंभ पार पडला.

**शैक्षणिक** :—१० ऑगस्ट रोजीं निरनिराळ्या १२ भाषांमध्यें शिक्षक आणि विद्यार्थी यांचें वीररसप्रधान कवितांचें पठण झालें.

हिंदी विभागातर्फें सुरु झालेल्या भारतीय भाषा-परिचय व्याख्यानमालेंत श्री.रवीन्द्र खन्ना यांचें 'कवि इक्बाल' या विषयावर व सुप्रसिद्ध कानडी लेखक श्रीसिंपी लिंगण्णा यांचें 'कानडी लोकगीतें' या विषयावर व्याख्यान झालें. याच विभागातर्फें विद्यार्थी आणि शिक्षक यांचें निबंधवाचन झालें. 'नरसी मेहता' (गुजराथी) रामप्रसाद (बंगाली) व कबीर हे निबंधाचे विषय होते. प्रत्येक वाचनाच्या सुरुवातीस त्याची प्रस्तावना इंग्रजीमध्यें करण्यांत आली.

Mr. Frank W. Gilleland अमेरिकन तंत्रविशारद मंडळाचे कार्यकर्ते यांनीं 'Solar Energy' या विषयावर भाषण केलें.

कलकत्त्याच्या, सरोजिनी नायडू कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती लतिका घोष यांचें 'आधुनिक इंग्रजी काव्य' या विषयावर व्याख्यान झालें.

श्री.शिशिरकुमार मित्र यांनीं 'Resurgent India' या त्यांच्या आगामी पुस्तकांतील 'रवीन्द्रनाथ ठाकूर' 'जगदीशचंद्र बसू' आणि 'अवनींद्रनाथ ठाकूर' या तीन प्रकरणांचे वाचन केलें.

**शारीरिक शिक्षण** :—१९ जुलै रोजीं मैदानी खेळांचे विविध सामने सुरु झाले. या वर्षी श्रीमाताजी सामने पाहण्यास जातीनें उपस्थित नव्हत्या परंतु उद्घाटनाचे दिवशीं त्यांनीं दिलेला संदेश प्रथम वाचून दाखविण्यांत आला—

"भौतिक दृष्टीला दिसूं शकणाऱ्या बाह्य दृश्यांपाठीमागें अधिक प्रत्यक्ष आणि अधिक चिरस्थायी असें वास्तव अस्तित्व आहे. आज या अस्तित्वाच्या स्वरूपांत मी तुम्हांमध्यें उपस्थित आहे आणि मैदानीं खेळांचे सामने चालूं असतांनाहि नेहमीं मी उपस्थित राहीनच. शक्ति, सामर्थ्य, प्रकाश आणि चेतना तुमच्यामध्यें सतत उपस्थित राहून, ती तुम्हां प्रत्येकाच्या

ग्रहणक्षमतेनुसार तुमच्या कार्यांत यश आणि कोणत्याहि मनःपूर्वक प्रयत्नाचें अंतिम फळ जी प्रगति ती तुम्हांस प्राप्त करून देईल."

२२ ऑगस्ट पर्यंत सामने चालू होते. एकूण ३४० नांवें आलीं होतीं. 'डी कॅथलॉन' बरोबरच 'पेंटॅथॉलॉन' चा उपक्रम यंदा सुरु करण्यांत आला. शेवटीं रिले रेसेस व रस्सीखेच यांचे सामने झाले. १ सप्टेंबर रोजीं नावीन्यपूर्ण शर्यतीचा (Novelty races) कार्यक्रम फारच प्रेक्षणीय झाला. ५ सप्टेंबर रोजीं श्रीमाताजींच्या हस्तें पारितोषिक-वितरण समारंभ पार पडला.

मैदानी खेळांचे सामने चालू असले तरी इतर शारीरिक-शिक्षण-विभागांचेहि कार्यक्रम सुरु होतेच. बाहेरून आलेल्या सहा क्रिकेट-संघांशीं सामने होऊन, सर्व सामने आश्रम-क्रिकेट-संघानें जिंकले. आश्रमाच्या खेळाडूंचें 'क्षेत्ररक्षण' विशेष प्रशंसनीय होतें.

मद्रासच्या वाय्. एम्. सी. ए. च्या बास्केट बॉल संघाशीं झालेला सामनाहि आश्रमखेळाडूंनीं जिंकला. मद्रासच्या या संघामध्यें मद्रास प्रांताचे दोन अधिकृत खेळाडू (state players) होते.

**ग्रंथालय** :—या तिमाहीमध्यें ग्रंथालयास अनेक उद्बोधक व मूल्यवान् ग्रंथांचा लाभ झाला आहे. त्यांतील विशेष उल्लेखनीय म्हणजे गुजराथी ज्ञानकोशाचे भाग ६ ते ९; गीताप्रेस गोरखपूरचें महाभारत व बहुविध इतर हिंदी प्रकाशनें. मंगोलियन जीवन व कला विषयक फोटोंचा व रंगीत चित्रांचा मनोरंजक संग्रह मंगोलियाहून भेट म्हणून आला आहे.
आश्रमाच्या इंग्रजी व फ्रेंच नियतकालिकांतील लेखांची लेखकवार व विषयवार संपूर्ण यादी आतां तयार झाली आहे. आश्रम-ग्रंथालयाकडे सुमारें ३०० हून अधिक नियतकालिकें व ३० देशांकडून मासिकें, पुस्तिका व छायाचित्रें येत असतात. त्यांचा अद्यावत् संदर्भ पुरविणारा विभाग विद्यार्थ्यांना फारच उपयुक्त असून, त्यामुळें जागतिक परिस्थिति आणि जगांतील विविध क्षेत्रांमध्यें होत असणाऱ्या सुधारणा यांविषयीं विद्यार्थ्यांना अद्यावत् माहिती मिळणें शक्य झालें आहे.

**प्रदर्शन-विभाग** :—आंतरराष्ट्रीय फोटोग्राफीच्या पांचव्या प्रदर्शनाचें उद्घाटन आश्रमाच्या प्रदर्शन-भवनामध्यें १५ ऑगस्ट रोजीं होऊन, २३ ऑगस्टपर्यंत प्रदर्शन खुलें होतें. निरनिराळ्या ३५ राष्ट्रांकडून एकूण ४४४ फोटोग्राफरांचे १४०७ फोटो आले होते. सर्वच फोटोंचा दर्जा उच्च असला, तरी पारितोषिक देण्याइतका कोणताच फोटो सर्वोत्कृष्ट ठरूं शकला नाहीं. आश्रमवासी आणि नगरवासीयांनीं बहुसंख्येनें या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

**मनोरंजन** :—नाट्य-विभागांतील फ्रेंच विभागानें २९ ऑगस्ट रोजीं 'मोलियर' यांच्या 'ल बूरज्वा जांतिलोम' या सुप्रसिद्ध नाटकाचा अत्यंत यशस्वी प्रयोग करून दाखविला. आश्रमाच्या नाट्यगृहामध्यें १४०० हून अधिक लोक बसूं शकत नसल्यानें, फारशा ग्रामस्थ मंडळींना निमंत्रण देतां आलें नाहीं. पांडीचेरीचें चीफ कमिशनर, पांडीचेरीमधील फ्रेंच प्रतिनिधि आणि मद्रास येथील अमेरिकन व्हाईस कॉन्सल हीं उल्लेखनीय पाहुणेमंडळी नाटक पहाण्यास आली होती.

दुर्गापूजेच्या दिवशीं दुर्गासप्तशतींतील कांहीं स्तोत्रांचें गायन झालें व दसऱ्याच्या दिवशीं गुजराथी विद्यार्थिनींनीं, गुजराथी लोकगीतांच्या साथीवर 'गरबा' नृत्याचा कार्यक्रम केला.

**संकीर्ण** :—वरोरा व कोल्हापूर याठिकाणीं श्रीअरविंद व श्रीमातृकेंद्र स्थापन झालीं. वरोरा व अकोट येथील केंद्रांच्या स्वतःच्या जागेंत, केंद्रकार्यासाठीं इमारत बांधण्याचें काम चालू आहे. कोल्हापूर केंद्रांत होणाऱ्या प्रवचनादि कार्यक्रमांचा अहवाल व इतर लेख समाविष्ट असलेलें एक नियतकालिकहि प्रसिद्ध होऊं लागलें आहे.

वस्तुमात्रांत परमात्मा वसत आहे,
परमात्म्यांत वस्तुमात्र वसत आहे,
किंबहुना, सर्व वस्तुमात्र परमात्मस्वरूपच आहे.
वेदांताचें हें समीकरण आमच्या समृद्धतर व सर्वग्राही योगाची किल्ली होय.

★

समष्टीकरितां मंदगतीनें चालणाऱ्या विकासद्वारें निसर्ग जें कांहीं करूं इच्छितो, तेंच व्यष्टीकरितां शीघ्र उत्क्रांतीद्वारें योगसाधना प्राप्त करून देते.

——श्रीअरविंद

## १६ ऑक्टोबर १९५९

भगवंताच्या स्वयंभू अस्तित्वाशीं तूं एकरूप होशील,
आणि तो स्वत:च बनलेल्या या आश्चर्यमय जगाशीं,
आणि लवकरच सिद्ध होणाऱ्या एका दिव्य चमत्काराशीं देखील
तुला सरूपता प्राप्त होईल
आज 'अचेतन ईश्वर' असलेली प्रकृति
जेव्हां शुद्ध स्वच्छ होऊन चिरंतनाच्या प्रकाशांत परिणत होते,
तेव्हां तिचें पहाणें ही त्याचीच दृष्टि, तिचें चालणें हा त्याचाच
शक्तिमय पदक्षेप होतो
आणि आध्यात्मिक आनंदानें जीवन भरून जातें
आणि जडतत्त्व हें आत्म्याशीं स्वेच्छेनें करबद्ध होतें.
''सावित्री''

-- श्रीअरविंद

## ३१ ऑक्टोबर १९५९

(महाकाली-पूजा)

जी सचेतन शक्ति आणि विश्वदेवता असून, अनादि काळापासून सर्व-सृजनकर्त्री आणि परमात्म्याच्या सर्वशक्तिमत्वानें सुसज्ज अशी आहे, तिला अशक्य असें कांहींच नाहीं.

ती शक्ति कार्य करतांना, सर्व प्रकारचें अज्ञान आणि अंधता त्याचप्रमाणें तिच्यावर अंधश्रद्धेनें व अयोग्य प्रकारें विश्वास ठेवणाऱ्या सर्वांवरहि ती कठोरपणानें प्रहार करील आणि म्हणून श्रद्धेच्या बाह्य रूपांवरील आपल्या अत्याग्रही आसक्तीचा त्याग करण्यास आपण तयार झालें पाहिजे आणि उद्धारकर्त्या वास्तव सत्तेलाच केवळ चिकटून राहिलें पाहिजे.

-- श्रीअरविंद

## वाचकांस विनंति

दर्शनदिनास प्रसिद्ध होणारा प्रत्येक अंक प्रसिद्धीनंतर एक आठवड्यानें, म्हणजे अनुक्रमें २१ ऑगस्ट, १ डिसेंबर, १ मार्च आणि १ मे रोजीं रवाना केला जाईल. त्यापूर्वी वाचकांनीं पत्रव्यवहार करूं नये.

– संपादक

## मराठी प्रकाशनें


१ श्रीअरविंद-दर्शन (वार्षिक मुंबई सर्कल) किं २ रु.
२ योग व त्याचे उद्देश – श्रीअरविंद किं.१२ आणे
३ कारागृहांत श्रीकृष्ण दर्शन (उत्तरपारा भाषण) – श्रीअरविंद किं.४ आणे
४ 'वंदेमातरम्' (लेखसंग्रह) – श्रीअरविंद किं. ४ आणे
५ परम शोध – श्रीमाताजी किं. ६ आणे
६ चार तपस्या व चार मुक्ती – श्रीमाताजी किं. १२ आणे
७ महान् रहस्य (नाटिका) – श्रीमाताजी किं.१ रु.
८ श्रीअरविंदांचा संदेश व आश्रम कि.१२ आणे
९ बाळ गंगाधर टिळक – श्रीअरविंद किं. ८ आणे
१० खेडीं हा स्वराज्याचा पाया (व्याख्यान) – श्रीअरविंद किं. ४ आणे
११ दिव्य जीवन (संकलित वेचें) – श्रीअरविंद किं. २५ न.पै.
१२ सत्यगिरीचें आरोहण (नाटिका) – श्रीमाताजी किं. ५० न.पै.

ट.ख.वेगळा

श्रीअरविंद सर्कल ३९१ सदाशिव पुणे २.
'संजीवन कार्यालय' श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी